पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १३ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते २८ फेब्रुवारी २०२२

## अर्थसंकल्प :

## वरून उघडा, खालून नागडा



# वाचकांची पत्रे

## माहितीपूर्ण लेख

१ ते १५ फेब्रुवारीच्या अंकातील विजय नाईक यांचा 'पर्ल हार्बरच्या ऐतिहासिक राष्ट्रीय संग्रहालया'च्या भेटीवर आधारित लेख माहितीपूर्ण होता. घटनेच्या मुळाशी जाऊन त्यावर विस्ताराने लिहिण्याची पत्रकार विजय नाईक यांची लेखनशैली आम्हाला भावते. या लेखातून त्यांनी ऐंशी वर्षांपूर्वीच्या घटना जशाच्या तशा उभ्या केल्या. लेख उत्तम होता. लेखकाचे अभिनंदन.

**– संजय वाघमारे, पुणे**

## घटनादुरूस्तीतील गुंतागुंत कळली

पहिल्या घटनादुरूस्तीच्या अनुषंगाने त्रिपूरदमन सिंग यांनी लिहिलेल्या 'सिक्स्टिन स्टॉर्मी डेज' या पुस्तकाच्या अधारावर प्रा. अविनाश कोल्हे यांनी लिहिलेला लेख घटनादुरूस्तीतील गुंतागुंत आणि व्यक्त झालेली मतमतांतरे यांचा परामर्श घेणारा होता. पहिल्या घटनादुरूस्तीसंदर्भातील घडामोडींचा आढावा पुस्तकरुपाने घेणारे त्रिपूरदमन सिंग यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

**– संजय उगवणे, मुंबई**




## सहभोजनाचं महत्त्व त्यांना काय माहीत?

आजकालचे प्रश्नमध्ये 'यूपीच्या निवडणुकांमध्ये सहभोजनाचीही एंट्री' हा लेख भाजपच्या ढोंगी राजकारणावर प्रकाश टाकणारा होता. उत्तर प्रदेशात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतं मिळवण्यासाठी भाजपने वापरलेली ही क्लृप्ती आहे, हे कुणालाही कळते. सहभोजनाचं महत्त्व माहीत नसलेले लोक त्याचा आपल्या स्वार्थासाठी वापर करून घेत असल्याचे या लेखातून समजले.

**– महादेव जाधव, औरंगाबाद**

## एन.डी. पाटील यांचं कर्तृत्वच मोठं

महाराष्ट्राचा लढवय्या नेता एन.डी. पाटील यांच्यावर व्यक्तिविशेष सदरात लिहिलेला लेख खूप आवडला. निस्वार्थी आणि तत्त्वाधिष्ठित राजकारण करणारा त्यांच्यासारखा दुसरा नेता महाराष्ट्रात झाला नाही, होणारही नाही. त्यांच्यावरील हा लेख त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा होता.

**– अनुसया वाघ, विजय वाघ, नागपूर**

## महत्त्वाच्या घटनादुरूस्त्या समजल्या

प्रा. अविनाश कोल्हे यांच्या 'सकारात्मक बदलांसाठी घटनादुरूस्ती अनिवार्य' या लेखातून पहिल्या घटनादुरूस्तीचा इतिहास आणि काही महत्त्वाच्या घटनादुरूस्तींची माहिती समजली. लेख अभ्यासपूर्ण होता.

**– आनंद पाटील, नांदेड**

## कविता आवडल्या

१ ते १५ फेब्रुवारीच्या अंकात सावित्रीची लेक, छंद वाचनाचा आणि नामांतर लढा या तीन कविता प्रसिद्ध झाल्या. सामाजिक प्रश्नांवरील या कविता आम्हाला खूप आवडल्या. वाचनाचं महत्त्व विषद करणारी 'छंद वाचनाचा' ही प्रा.डॉ. द्वारका गिते-मुंडे यांची कविता अधिक भावली.

**– नामदेव गायकवाड, बीड, वंदना मोरे, हिंगोली**

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १३ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते २८ फेब्रुवारी २०२२


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ४ |
| कॉर्पोरेटधार्जिणा अर्थसंकल्प | – प्रो. सुखदेव थोरात | ६ |
| बेरोजगारी अन् शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अर्थसंकल्पात बगल | – गौतम कांबळे | ९ |
| कोरोनामुळे रोजगार गमावलेल्यांची निराशा | – प्रा.डॉ. विनोद मिश्रा | ११ |
| अर्थसंकल्पाने दिला सर्वसामान्यांच्या हाती भोपळा | – प्रतिनिधी | १३ |
| गोव्यात पाच जोड्या रिंगणात | – सुरेश स. नाईक | १५ |
| रेल्वेभरती घोटाळा आणि परीक्षार्थींचे आंदोलन | – भीमराव बनसोड | १९ |
| इतना सन्नाटा क्यूं... : थडगी बघ्यांची | – जयदेव डोळे | २२ |
| धर्म एक चक्रव्यूह : सामाजिक अन् धार्मिक विषमतेमुळे नैतिक अध:पतन | – बी.जी. वाघ | २५ |
| माहिती, ज्ञान आणि मनोरंजन : मराठी संस्कृती | – प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे | ३० |
| अमृतमहोत्सवी वर्षात महिला अन् गरिबांच्याही विकासाचा विचार व्हावा | – प्रवीण मोरे | ३२ |
| व्यक्तिविशेष : लता मंगेशकर : एक दंतकथा | – प्रतिनिधी | ३३ |
| आज–कालचे प्रश्न : | – पंक्चरवाला | ३६ |
| ग्रंथपरिचय : चळवळीची दिशा अन् दशेवर सडेतोड भाष्य करणारा ग्रंथ | – किरण डोंगरदिवे | ४० |
| कविता : महागाई – मारोती कसाब<br>मला फारसं वाईट वाटत नाही... – इंद्रजित घुले<br>हे तेच लोक होते.. – प्रदीप नारायण जाधव | | ४२ |
| ग्रेट थॉट्स | | ४३ |


**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड,
बराहपुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर,
औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

द पीपल्स पोस्ट
8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय


# जातींनी अडवलेला घोडा संविधानामुळे धावला

देशाला स्वातंत्र्य मिळालं. त्याची पंच्याहत्तरीही होतेय. आपण सगळे परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त झालो आहोत. या साऱ्या गोष्टी खऱ्या असल्या तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. फुले, शाहू महाराज यांना अपेक्षित असे-लेलं स्वातंत्र्य पण सर्वार्थानं आपल्यापर्यंत पोहोचू शकलेलं नाही. हे वास्तव मान्य करूनच आपल्याला मिळालेल्या आणि ७५ पाऱ्या ओलांडलेल्या स्वातंत्र्याकडे पहावे लागेल. परकीयांच्या सत्तेतून आपण मोकळे झालो पण भारतातला बहुसंख्य समाज जो ७५ वर्षांनीही मागास, दलित म्हणून ओळखला जातोय तो मात्र अजूनही इथल्या जाती, धर्माने केलेल्या व्यवस्थेत गुलामच आहे. याचाच अर्थ सामाजिक लोकशाहीचा पाळणा आपण हलवू शकत नाही. पाळणा तयार केला पण तो हलवण्यासाठी दोर नाही बांधला किंवा दोर ओढलाही नाही. राजकीय स्वातंत्र्य अगोदर की सामाजिक मुक्ती अगोदर या वादात सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणारे किती योग्य विचार करत होते, हे आजही सिद्ध होते. ज्यांनी राजकीय स्वातंत्र्याऐवजी सामाजिक स्वातंत्र्याचा आग्रह धरला होता त्यांना काही जातियवाद्यांनी, राजकारण्यांनी स्वातंत्र्याविरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी हे लक्षात घेतले नाही, की डॉ. बाबासाहेब मानव मुक्तीसाठी लढत होते. म्हणजे मोठ्या स्वातंत्र्यासाठी लढत होते. राजकीय स्वातंत्र्य ही तशी किरकोळ गोष्ट होती. हे म. गांधींनीही मान्य केले होते. निवडणुका, मतांच्या पेट्या आणि सत्ता उबवणाऱ्या खुर्च्या घेऊन स्वातंत्र्य आलेही. पण सामाजिक स्वातंत्र्यासाठीचा त्याच्या संघर्षासाठीचा नव्यानं बिगूल वाजवण्याची हिंमत या स्वातंत्र्याला करू दिली नाही. धर्माचे ठेकेदार, राजकीय सत्तेचे ठेकेदार आणि दलाल सातत्यानं अडथळा आणत होते. मागासवर्गीय, दलित म्हणजे आपले हक्काचे गुलाम या भावनेनं ते बघत आले. जातिव्यवस्थेवर घाव घालणाचा प्रयत्न करण्याऐवजी ती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. अस्पृश्य आणि त्यांना बाहेर ठेवणारे पारंपारिक नियम कोणी बदलण्याचा प्रयत्न केला नाही. सारे काही संविधानावर सोडून देण्यात आले. पण तिच्यातील तरतुदींची ठोस अंमलबजावणी करण्याची इच्छा नव्याने मालक बनलेल्या लोकांनी दाखवली नाही. गेल्या ७५ वर्षात असे एकही वर्ष आले नाही की जेव्हा दलितांवर ते दलित आहेत म्हणून अन्याय-अत्याचार झाला नाही.



बहिष्कार, खून, बलात्कार, अन्याय-अत्याचार घडतच राहिले. त्यात एक म्हणजे दलित नवरदेवाला लग्नाची वरात काढण्यास, नवे कपडे घालण्यास अनेक ठिकाणी बंदी होती. एवढेच काय मिशी वाढवल्यावरून, पगडी घातल्यावरून, गरबा नृत्यात भाग घेतल्यावरून, जनावरे किंवा क्रिकेटचा चेंडू सवर्णांच्या वस्तीत गेल्यावरूनही अनेक ठिकाणी दलितांवर अन्याय-अत्याचार झाले आहेत. दलितांची मते पाहिजेत पण त्यांना माणूस म्हणून प्रतिष्ठा द्यायची नाही, दलितांची मते पाहिजेत पण त्यांना जातीत कोंबून त्यांचा छळ बंद करायचा नाही, असं सातत्याने घडत आले आहे. कर्मठ समाजानेच त्यासाठीचे कायदे केले आणि ते मनगटाच्या, धर्माच्या, उच्चतेच्या जोरावर राबवले. आता राजस्थानचेच बघा. राजस्थान हा जसा वीर राजपुतांचा, क्षत्रियांचा प्रदेश आ-हेत तसाच तो मनुच्या पुतळ्याची पूजा करणारा, सती प्रथेच्या पुरूज्जीवनाचा प्रयत्न करणारा आणि दलित नवरदेवाला वरात काढण्यास बंदी करणारा आणि विशेष म्हणजे तुतारी वाजवून हिंदूत्वाचे पोवाडे गाणारा प्रदेश आहे. येथे स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे दलितांना लग्नाची वरात काढण्यास बंदी होती. गेल्या दहा वर्षांत असा प्रयत्न करणाऱ्या ७६ जणांना सवर्णांनी मारहाण केली होती आणि 'भाग बे अछूत' असं ठणकावून त्यांना पळवून लावलं होतं. हे आहे आपलं स्वातंत्र्य! ही आहे समता आणि बंधूता आणि ही प्रोढ धर्मनिरपेक्षता!! आंबेडकरी परंपरेचा पहिल्यांदा समाज सुधारणा हा विचार मान्य केला गेला असता तर कदाचित ही वेळ आली नसती पण सत्ताकेंद्रीत लोकशाहीमुळे आणि माणसाच्या वेदनांऐवजी डोकी मोजण्याच्या प्रकारामुळे हे घडत राहिले.

राजस्थानमध्ये सध्या काँग्रेसचे सरकार आहे. ते




कसे आले आणि कसे टिकून राहिले आहे याविषयी न बोल-लेच बरे. पण तेथे दलित मुख्यमंत्रीही आहे. असे मुख्यमंत्री आणि राज्यपाल यापूर्वीही अनेक राज्यातही होते. राष्ट्रपती पदावरही होते. पण सामाजिक सुधारणांचा घोडा कधी धावत नव्हता. भाजपपेक्षा आम्ही वेगळे आहोत हे दाखवण्याची संधी घेण्याचा प्रयत्न अखेर काँग्रेसने केला आणि त्यात त्यांना यश दलित म्हणजे अस्पृश्य ही भावना समाजाच्या मनात शेकडो वर्षे रुजवण्यात आली आहे. राजस्थानमधील मानसिकताही त्यास अपवाद नव्हती. चुकून एखाद्या नवरदेवाची वरात निघाली, की सवर्ण गोळा व्हायचे आणि वरातीवर हल्ला करायचे. विशेष म्हणजे, देवाचं नाव घेऊन हल्ला करायचे. राजस्थानमध्ये निदान वरातीचे तरी स्वातंत्र्य मिळाले म्हणून पोलिस बंदोबस्तात वरात काढायची असं सरकारनं ठरवलं. त्यासाठी तीस गावांची निवड करण्यात आली. 'पोलिस बंदोबस्तात वरात' या मोहिमेला नाव देण्यात आलं ऑपरेशन समानता. जी समानता स्वातंत्र्याने आणि संविधानाने ७५ वर्षांपूर्वी मान्य केली होती. ती आता शस्त्राच्या, वर्दीच्या, कायद्याच्या जोरावर आणण्यात येणार होती. त्याची रंगीत तालिम गेल्याच महिन्यात म्हणजे प्रजासत्ताकाच्या महिन्यात बुंदी या ठिकाणी घेण्यात आली. श्रीराम मेघवाल हा दलित तरूण नटून थटून घोड्यावर बसला. हातात तलवार, अंगात शेरवाणी अशा पेहरावात एखाद्या राजकुमाराप्रमाणे तो निघाला. वरातीत व्हीआयपी नेत्यांना नसतो एवढा बंदोबस्त. शस्त्रधारी पोलिस घेऊन ही वरात सुखरूप पोहोचली. जयभीमच्या घोषणामुळे अवघे अवकाश थरारावे असे चित्र. जयभीम म्हणजे जणू महान शक्ती... आत्मसन्मानासाठीचे भान... स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात निघालेली दलितांची पहिली वहिली मिरवणूक, इतिहासानं घेतलेलं एक नवं वळणं आणि त्यामागं असलेली भीमऊर्जा असं आणखी काही वर्णन करता येईल. ते जन्माला घालण्याचं श्रेय अर्थातच राजस्थानला देता येईल. पण हेही तितकंच खरं आहे, की सामाजिक सुधारणांसाठी असा बळाचा वापर करावा ला-गला. बळाकडून प्रबोधनाकडे असा सुंदर प्रवास सुरू झाल्यास दलितांच्या आत्मसन्मानाच्या वाटा आणखी मोकळ्या आणि आणखी सुंदर होतील.

भारतात केंद्रात आणि राज्यात कोणत्याही पक्षाचे सरकार येवो पण त्याला जातव्यवस्था जुमानत नाही. ती आपली अन्याय करणारी हत्यारे नेहमी वापरत असते. दलितांचा विकास म्हणजे आपला अविकास, दलितांना स्वातंत्र्य म्हणजे आपली गुलामी, दलितांना न्याय म्हणजे आपल्यावर अन्याय अशा एका खोट्या भ्रमात किंवा समजुतीत सवर्ण समाज आहे. त्यातूनच अशा घटना घडत राहतात. व्यवस्था कायदा किंवा संविधानालाही अनेकदा जुमानत नाही. ती सभा घेऊन संविधानावर भगवा रंग टाकते. ती निवडून आलेल्या दलितांना अनेकदा ग्रामपंचायतीचे कार्यालय देत नाही तर चोल्याप्रमाणे पायरीवर बसवते. अनेक राज्यांत अशा घटना अधूनमधून घडत असतात. देशाच्या पन्नास अश्वशक्तीचं इंजिन लावून त्याला पळवण्याचा, तो शायनिंग करण्याचा प्रयत्न करणारे कारभारीही अशा गोष्टींविषयी ब्र काढत नाहीत. त्यांना हिंदूत्व हवे आहे आणि जातव्यवस्था ही हिंदूत्वाची गरज असते. मी जातव्यवस्था मोडून टाकीन, आम्ही सारे भारतीय हे सूत्र वास्तवात आणेन यासाठी कुणाला काही फारसे करायचे नाही. पुतळा बसव, स्मारक कर आदी गोष्टींमुळे स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्यायाचे राज्य कधी येणार नाही. पुतथा उंचउंच आणि जात नीचनीच असेच घडत राहणार आहे. जातीवर प्रहार करणारे स्वातंत्र्य आपल्याला हवे आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करणारा समाज आपल्याला हवा आहे. तेथपर्यंत पोहोचायचे असेल तर कोणी पक्ष, कोणी नेता आपल्या मदतीला येणार नाही. तर संविधानातील तरतुदींची कठोर अंमलबजावणी याच सूत्राकडे आपल्याला जावे लागणार आहे. तसे झाले तर सगळ्या वराती बंदोबस्त घेऊन नव्हे तर आत्मसन्मान करत निघतील. हक्क आणि न्यायाचा जयजयकार करत निघतील. संविधानातील तरतुदींचा आधार घेतला की काय घडते याचे एक उदाहरण म्हणून राजस्थानकडे पाहू या.. संविधानातील तरतुदीं-चा दणका बसला, की घोडा धाऊ लागतो, सजू लागतो आणि नवरदेव या साऱ्या गोष्टीकडे आत्मसन्मान म्हणून पाहू शकतो.

•••



# कॉर्पोरेटधार्जिणा अर्थसंकल्प



प्रो. सुखदेव थोरात

**आर्थिक स्थिती सावरण्याकरता अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांनी योजलेल्या उपाययोजनांची दखल आणि त्याचा अनुभव यांची नोंद केंद्र सरकारने घेतलेली दिसत नाही. थेट रक्कम खात्यावर जमा करणे, रोजगाराच्या संधींना चालना देणे या उपाययोजनांतून या देशांनी वाढीसाठी पूरक धोरण राबवले. आमच्या सरकारने मात्र ही संधी गमावली आहे. पुरवठ्यापेक्षा मागणीच्या बाजूकडे अधिक प्रोत्साहन द्यायला पाहिजे होते. मागणी वाढली, की साहजिकच पुरवठा वाढू शकतो. त्यामुळेच हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटधार्जिणा अधिक आहे. वेतनदार कामगारांसाठी मात्र तो पूरक नाही. त्यामुळे कामगारांसाठी भवितव्य चांगले नाही.**

कोविड महामारीमुळे आर्थिक वाढीचा निर्देशांक असलेल्या औद्योगिक, व्यावसायिकसह विविध क्षेत्रांची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी होत असल्याने, ती खालावली गेली आहे.परिणामी, सामान्यांच्या प्राप्तीमध्ये हवी तशी वाढ होत नसल्याने आपण आर्थिक समस्येला तोंड देत आहोत. वाढीच्या मंदावलेल्या वेगामुळे बेरोजगारीमध्ये मोठी वाढ होत आहे. बेरोजगारी वाढल्याने साहजिकच कामगारांच्या वेतनात घट होत आहे. विशेषतः, खासगी क्षेत्रातील नियमित पगारदार, त्यातही ग्रामीण भागात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांना आणि हंगामी कामगारांना त्याचा फटका सोसावा लागत आहे. त्याचबरोबर फेरीवाले, स्वयंरोजगारीत मंडळी यांनाही फटका बसला आहे. या कमकुवत घटकाच्या प्राप्तीमध्ये घट झाल्याने साहजिकच जीवनावश्यक आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदीत घट झाली. परिणामी भुकेले, कुपोषित आणि गरिबीत जगणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. सरकारी यंत्रणेतील माहिती आणि विशेषतः आकडेवारीचे संकलन करणाऱ्या संस्था आणि यंत्रणा अत्यंत चाणाक्षपणे या बाबींकडे डोळेझाक करतात. तथापि, अनेक खाजगी सर्वेक्षणे अशा कामगार आणि त्यांच्या कुटुंबांची होणारी कुचंबणा मांडत आहेत. त्यांच्या समस्यांना तोंड फोडत आहेत. बिगरकृषी क्षेत्रात जसे की, उद्योग आणि सेवा क्षेत्र, तसेच त्याचवेळी खासगी क्षेत्रातील चलनवलनाला वेग यावा, याकरता त्याला प्रोत्साहन मिळून उत्पादनात वाढ होईल, ही स्थिती येण्याची प्रतीक्षा या घटकांना आहे. त्यांची मूळ समस्या ही तिथेच केंद्रीत झालेली आहे.

**असंघटित क्षेत्रातील बेरोजगारीत सर्वाधिक वाढ**

कमी प्राप्तीच्या घटकांतील बेरोजगारी हटवण्यासाठी आणि औद्योगिक क्षेत्रातील गतिमानतेसाठी, त्यांच्यातील मागणी वाढावी याकरता केंद्रीय अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केली आहे काय? त्याबाबत ठोस उपाययोजना केल्या आहेत, हे स्पष्ट करणारे घटक आढळत नाहीत. मोठ्या प्रमाणात बेरोजगारीला तोंड देणाऱ्या कामगारांचे काय? एकुणात बेरोजगारी आठ टक्क्यांवर पोहोचल्याचे विविध सर्वेक्षणांतून निदर्शनाला येत आहे. असंघटित क्षेत्रातील बेरोजगारीत सर्वाधिक वाढ झाली आहे. कामाची सुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षिततेपासून वंचित असलेल्या असंघटित क्षेत्रातील कामगारांची

आकडेवारी किती आहे? २०१७-१८ चा रोजगारविषयक सर्वे सांगतो, की बिगरकृषक वेतनावरील कामगारांची (नियमित पगारदार आणि हंगामी वेतन घेणारे कामगार) देशातील संख्या सुमारे ४८ टक्के आहे. या बिगरकृषक वेतनावरील कामगारांपैकी सुमारे ७० टक्के हे असंघटित वेतनदार कामगार आहेत. (यात कोणत्याही कंत्राटाशिवाय आणि एक वर्षाच्या कंत्राटावरील आणि कोणत्याही सामाजिक सुरक्षेशिवाय असे घटक येतात). उर्वरित ३० टक्के हे संघटित क्षेत्रात येतात. थोडक्यात, बिगरकृषक वेतनावरील कामगारांपैकी सुमारे तीन चतुर्थांश कामगार हे असंघटित क्षेत्रातील आहेत. असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण (८१ टक्के) हे सरकारी क्षेत्राच्या तुलनेत (३१ टक्के) खूपच अधिक आहे. याचाच अर्थ असाही आहे, की सरकारी क्षेत्रातीलही सुमारे एक तृतीयांश कामगार हे असंघटित क्षेत्रातील आणि कोणत्याही नोकरी आणि सामाजिक सुरक्षेविरहीत स्वरुपात जगत आहेत. असंघटित क्षेत्रात अनुसूचित जातीच्या कामगारांचे प्रमाण (८४ टक्के) हे अनुसूचित जमाती (७० टक्के), इतर मागासवर्गीय (७० टक्के) आणि उच्चवर्णीय (५४ टक्के) यांच्यापेक्षा अधिक आहे. खाजगी क्षेत्रातील असंघटित कामगारांचे सर्वाधिक प्रमाण हे पुन्हा अनुसूचित जातींत सर्वाधिक (८९ टक्के) असून, त्याखालोखाल अनुसूचित जमातींचे (८७ टक्के) आहे. सरकारी क्षेत्रातील असंघटित कामगारांतही अनुसूचित जातींचे प्रमाण सर्वाधिक ४४ टक्के असून, त्याखालोखाल अनुसूचित जमातीत ३६ टक्के आहे. असंघटित क्षेत्रातील मुस्लिमांचे प्रमाण हे इतर कुठल्याही समाजघटकांपेक्षा सर्वाधिक आहे. खाजगी असंघटित क्षेत्रातही त्यांचे प्रमाण अधिक आहे. राज्याराज्यांतील असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वेगवेगळे आहे.

**नोकरीची असुरक्षितता हीच मोठी समस्या**

असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये नोकरीची असुरक्षितता हीच सर्वात प्रबळ अशी समस्या आहे. २०१७-१८ मध्ये, बिगरकृषक कामगार घटकांतील सुमारे ८५ टक्के कामगार हे एक वर्षांच्या कंत्राटाशिवाय किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या कंत्राटावर होते. याचाच अर्थ हा, की १५ टक्के कामगार हे एक किंवा त्याहून अधिक वर्षाच्या कालावधीच्या कंत्राटावर होते. कंत्राटाशिवाय किंवा/ आणि एका वर्षापर्यंतच्या कंत्राटावरील कामगारांचे सर्वाधिक प्रमाण हे पुन्हा अनुसूचित जातींचेच (८९ टक्के) होते. त्याखालोखाल अनुसूचित जमाती (८७ टक्के), इतर मागासजाती (८६ टक्के) आणि उच्चवर्णीयांचे (७६ टक्के) होते. धार्मिक निकषाचा विचार करता, मुस्लिमांमध्ये रोजगाराची शाश्वती सर्वात कमी म्हणजे ९१ टक्के होती. म्हणजेच, कंत्राटाशिवाय किंवा एकपेक्षा कमी वर्षाच्या कंत्राटाने प्रभावीत होणाऱ्यांचे प्रमाण अनुसूचित जाती, जमाती आणि मुस्लिमांमध्ये इतर समाजघटकांपेक्षा अधिक होते. उलट, मुस्लिमांमध्ये एकापेक्षा अधिक वर्षे काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण नीचांकी (७.५ टक्के) असून, त्याहून अधिक अनुसूचित जाती (१० टक्के) आणि अनुसूचित जमातीत (१३ टक्के) आहे. या प्रकारात उच्चवर्णीयांचे प्रमाण लक्षणीयरित्या अधिक म्हणजे २१ टक्के आहे. असंघटित क्षेत्रातील हंगामी कामगार सामाजिक सुरक्षिततेपासून वंचित राहतात. कोणत्याही स्वरूपाची सामाजिक सुरक्षा नसलेल्या कामगारांचे प्रमाण ६५ टक्के एवढे प्रचंड आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि मुस्लिमांमधील हेच प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षाही अधिक असून, ते सर्वसाधारणपणे ७१-७२ टक्क्यांच्या आसपास राहते. उलट, किमान एक सामाजिक सुरक्षितता असलेल्यांचे प्रमाण मुस्लिमांमध्ये नीचांकी (१३ टक्के) असून, त्यावर अनुसूचित जाती (१६ टक्के), अनुसूचित






## सामाजिक सुरक्षिततेपासून वंचित राहण्याची वेळ

थोडक्यात, देशात मोठ्या प्रमाणात बिगरकृषक कामगार घटक (नियमित आणि हंगामी वेतनावरचे कामगार) हे असंघटित क्षेत्रामध्येच आहेत. याच घटकांना व्यापक प्रमाणातील नोकरीतील आणि सामाजिक अशा दोन्हीही स्तरांवरील असुरक्षिततेला तोंड द्यावे लागत आहे. उच्चवर्णीय आणि इतर मागास घटकांच्या (ओबीसी) तुलनेत असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मुस्लिम या समाजघटकांतच अधिक आहे. कंत्राटाशिवाय किंवा एकापेक्षा कमी वर्षासाठी कंत्राट असलेल्यांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मुस्लिम समाजघटकांचे प्रमाण अधिकाधिक असल्याने, त्यांनाच नोकरीतील असुरक्षिततेला अधिक तोंड द्यावे लागते. भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी किंवा वैद्यकीय विम्याशिवाय राहण्याची, म्हणजे सामाजिक सुरक्षिततेपासून वंचित राहण्याची वेळ स्वाभाविकपणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मुस्लिम समाजघटकांवर अधिक येते.

जमाती (२० टक्के) आणि इतर मागासवर्गीय (२४ टक्के) यांचा क्रम लागतो.

**मागणीला प्रोत्साहन दिले नाही**

रोजगाराच्या चांगल्या संधींमध्ये वाढ आणि खास सार्वजनिक रोजगाराकरता उपाययोजना यांद्वारे या कामगार घटकांचे उत्पन्न कसे वाढेल, या दृष्टीने उपाययोजना केल्या पाहिजेत. तसेच खासगी क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होऊन ते अधिक सशक्त होतील, अशा स्वरुपाच्या उपाययोजना राबवाव्यात. यामुळे मागणीला प्रोत्साहन मिळेल आणि त्याद्वारे नवचैतन्याचे धुमारे फुटतील, असे काहीही अर्थसंकल्पाने केलेले नाही. अर्थसंकल्पातीलच आकडेवारीवर नजर टाकूया. मागणीला प्रोत्साहन देणाऱ्या आणि औद्योगिक उत्पादनाला चालना देणाऱ्या सरकारी सार्वजनिक गुंतवणुकीचे प्रमाण अत्यल्प आहे. एकूणच वाढ ही फक्त १.७५ लाख कोटी रुपये एवढीच आहे. २०२१-२२ मधील ३७.७० लाख कोटी रुपयांवरून २०२२-२३ मध्ये ३९.४५ लाख कोटी रुपयांवर ती गेली. म्हणजेच केवळ ४.६ टक्केच वाढ आहे. महागाई दरापेक्षाही ही वाढ कमीच आहे. एका अर्थाने, सरकारच्या खर्चातच घट दिसते आहे. मागणीत फारशी वाढ होणार नाही. साहजिकच अर्थव्यवस्थेच्या वाढीवर त्याचे परिणाम दिसतील.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसारख्या सार्वजनिक रोजगार देणाऱ्या योजनेवरील खर्चासाठी सरकारने केलेल्या तरतुदीची स्थिती काय आहे? कोविडच्या काळात सरकारने नरेगा योजनेतून रोजगारासाठी विशेष तरतूद केल्यामुळे हंगामी कामगारांना मदतीचा हात मिळू शकला, हंगामी कामगारांना १०० दिवसांपेक्षा कमी काळ रोजगार मिळाला. पण त्यामुळे भुकेपासून त्यांचा बचाव तरी होऊ शकला ना. तथापि, २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात नरेगासाठीच्या तरतुदीला कात्री लावून ती ७३,००० कोटी रुपये केली आहे. ही तरतूद २०२१-२२ मध्ये ९८,००० कोटी रुपये आणि २०२०-२१ मध्ये १,११,००० कोटी रुपये होती. त्याचा ग्रामीण भागातील हंगामी कामगारांवर परिणाम होईल आणि त्याने त्यांच्या व्यथांमध्ये वाढच होऊ शकेल. आणखी त्रासदायक बाब म्हणजे, अर्थसंकल्पात शहरी भागातील सुशिक्षित कामगारांचा तसेच असंघटित क्षेत्रातील हंगामी कामगारांचा विचार केला गेलेला नाही.

**...तर नागरी अर्थकारणाला चालना मिळेल**

माझ्यासह अनेक लोक शहरी भागासाठी नरेगासारखी रोजगाराची योजना राबवावी, या विचाराचा सातत्याने पुरस्कार करत आहेत. अशा स्वरुपाच्या उपाययोजनांमुळे मागणीला प्रोत्साहन मिळून नागरी अर्थकारणाला चालना मिळू शकते. असंघटित आणि हंगामी कामगारांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मुस्लिम समाजातील कामगार मोठ्या संख्येने आहेत, याची दखलही अर्थसंकल्पात घेतली गेलेली नाही. इतर समाजघटकांपेक्षा याच समाजघटकांत बेरोजगारांची संख्या अधिक आहे. अनुसूचित जातींसाठीच्या खास योजना आणि अनुसूचित जमातींच्या उपयोजनेत या बाबीची खास अशी दखल घेतली गेलेली नाही.

सरकारी गुंतवणुकीत वाढ करणे किंवा सार्वजनिक रोजगाराच्या योजनांसाठीच्या तरतुदीत वाढ करणे किंवा शहरी बेरोजगार



युवकांकरता नवीन योजना निर्माण करणे, अशी मागणीला प्रोत्साहन देणारी कोणतीही पावले या अर्थसंकल्पात उचलली गेलेली नाहीत. त्यांनी केवळ पुरवठ्याच्या बाजूकडे लक्ष दिलेले आहे. त्यांनी खाजगी उद्योगांना उत्पादन वाढीसाठी चालना दिलेली आहे. अर्थसंकल्पात अनेक करसवलती आहेत, तसेच इतर उपाययोजनाही केलेल्या दिसतात. सरकारला खाजगी क्षेत्रातून प्रतिसादाची अपेक्षा आहे. आधीच्या दोन वर्षांतील अनुभव पाहता, ही काही रास्त अपेक्षा आहे, असे म्हणता येत नाही. खाजगी क्षेत्राची उत्पादने आणि सेवा यांना मागणी वाढत नसल्याने खाजगी क्षेत्रातून गुंतवणूकही वाढत नाही. मागणीच नसल्यामुळे ते त्यांच्या आहेत त्या क्षमतांचाही पुरेपूर वापर करू शकत नाहीत. त्यामुळेच मागणी वाढल्याशिवाय वाढत्या उत्पादनाला काहीच अर्थ नाही, हेच खरे आहे.

त्याचा निष्कर्ष हा आहे, की जर उत्पादनात भरीव वाढ दिसली नाही तर, रोजगारात वाढ होणार नाही. साहजिकच कामगारांच्या प्राप्तीमध्ये वाढ होणार नाही आणि अंतिमतः मागणीच कमी राहील. या सर्व परिस्थितीमुळे मंदीचे वातावरण निर्माण होईल आणि त्यामुळे कोविडच्या आपत्तीतून सावरायला विलंब लागू शकतो. आर्थिक स्थिती सावरण्याकरता अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांनी योजलेल्या उपाययोजनांची दखल आणि त्याचा अनुभव यांची नोंद केंद्र सरकारने घेतलेली दिसत नाही. थेट रक्कम खात्यावर जमा करणे, रोजगाराच्या संधींना चालना देणे या उपाययोजनांतून या देशांनी वाढीसाठी पूरक धोरण राबवले. आमच्या सरकारने मात्र ही संधी गमावली आहे. पुरवठ्यापेक्षा मागणीच्या बाजूकडे अधिक प्रोत्साहन द्यायला पाहिजे होते. मागणी वाढली, की साहजिकच पुरवठा वाढू शकतो. त्यामुळेच हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटधार्जिणा अधिक आहे. वेतनदार कामगारांसाठी मात्र तो पूरक नाही. त्यामुळे कामगारांसाठी भवितव्य चांगले नाही. इंग्रजी **K** अक्षराप्रमाणे लोकांच्या प्राप्तीची स्थिती दिसत आहे. अर्थव्यवस्थेची तशी वाटचाल दिसत आहे, म्हणजे श्रीमंत घटकांच्या प्राप्तीत अधिकाधिक वाढ होत असताना, कामगार आणि गरिबांच्या प्राप्तीत मात्र घट होताना दिसत आहे. समाजातील असमानता अधिकाधिक वाढत जाईल आणि **K** अक्षराच्या एकमेकांपासून दूर जाणाऱ्या रेषांप्रमाणे ही दरी अधिकाधिक रुंदावत जाईल. •••

**(लेखक विद्यापीठ अनुदान आयोगाचे पूर्वाध्यक्ष आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आहेत)**



गौतम कांबळे

# बेरोजगारी अन् शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अर्थसंकल्पात बगल

**केंद्रीय अर्थसंकल्पात जशी वीज, शिक्षण, आरोग्य आणि घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी पुरेशी तरतूद केलेली नाही, तद्वतच मनरेगासारख्या महत्त्वाच्या योजनेसाठीही अपुरी तरतूद आहे. उलट मनरेगासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत सलग दुसऱ्या वर्षी केंद्र सरकारने कपात केली आहे. पीक वीमा योजनेचीही तीच गत आहे. त्यामुळे बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अर्थसंकल्पात महत्त्व दिल्याचे दिसत नाही.**



२०२२ नंतरची पंचवीस वर्षे डोळ्यासमोर ठेऊन हा अर्थसंकल्प तयार केल्याचे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी नमूद केले आहे. अशा दीर्घकाळाबद्दलचे विख्यात अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्स यांचे भाष्य फारच मार्मिक आहे. ते म्हणतात, 'दीर्घकाळ पहायला कुणीही जिवंत नसतो'. याचा अर्थ पंचवीस वर्षांनंतर या अर्थसंकल्पातील इच्छेप्रमाणे घडले की नाही हे सांगणारा कुणीही जिवंत नसेल. म्हणून त्या जबाबदारीतून सगळेच मोकळे असतात. त्यामुळे वर्तमानकाळात जबाबदारीने बोलण्यातील भीती किंवा दक्षता राहत नाही. बिनधास्तपणे रेटून बोलता येते. दुसरे असे, की प्रत्येक सामान्य माणूस हा आशेवरच जगत असतो. त्यामुळे आज त्या जगण्यासाठी पुरेसा रोजगार-संपत्ती-आरोग्य-घर नसेलही, मात्र पंचवीस वर्षांनी मिळेल, अशी धूसर आश्वासने अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मिळत असतील तर तो आजचा अभाव, दुःख सहन करतो, प्रश्न विचारत नाही आणि हेच व्यवस्थेच्या संचालकांना हवे असते. या अर्थसंकल्पावरून व्यवस्थेच्या संचालकांचे असेच मनसुबे असल्याचे संकेत स्पष्ट होताना दिसतात.

**बेरोजगारी कमी करण्यासाठी फारशी तरतूद नाही**

कोरोनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या लाटांचे अभूतपूर्व संकट सहन करणाऱ्या लोकांचे जीवन आणि त्यांच्या उपजीविकेला आधार देणारा परिपूर्ण धोरणाचा आराखडा म्हणून या अंदाजपत्रकाबाबत लोकांची अपेक्षा होती. त्यातील मागील तीन वर्षातील ग्रामीण समाजावर शहरी समाजातील अतिरिक्त श्रमशक्तीचा 'शहरांकडून खेड्यांकडे' स्थलांतरित झालेल्या या श्रमशक्तीचा भार वाढतो आहे. या श्रमशक्तीला ग्रामीण क्षेत्रामध्ये सामावून घेण्यासाठी हा अर्थसंकल्प काय विशेष-अधिकच्या सोयी-सवलती-योजना देतो, याकडे सर्वांचे लक्ष होते. तसे पाहिले तर, अर्थसंकल्प हा देशापुढील आर्थिक समस्यांना दिला गेलेला राजकीय प्रतिसादच असतो. तरीसुद्धा देशातील एका बाजूने वाढती बेरोजगारी आणि वाढती महागाई यावर मात करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पातील काही तरतुदी तरी मदत करतील, अशी ग्रामीण समाजाची जनभावना असणे स्वाभाविक आहे. देशातील १२-१३ टक्के बेरोजगारीचा वेग पाहता, ती कमी करण्यासाठीची वाटचाल अर्थसंकल्पात फारशी दिसत नाही, असे खेदाने म्हणावे लागते.

**भुरळ पाडणाऱ्या तरतुदी**

२०२१-२२ च्या तुलनेत (३४.८३ लाख कोटी रु.) २०२२-२३ चे केंद्रीय अंदाजपत्रक (३९.४५ लाख कोटी रु.) मोठे आहे, हे चांगलेच आहे. त्यामध्ये ग्रामीण विकासाचा विचार करता वीज, पाणीपुरवठा, शिक्षण, तंत्रशिक्षण, आरोग्य, घरे, कौशल्यनिर्मिती यात काही वाढ होण्याला वाव आहे. त्यामुळे ग्रामीण जीवन सावरायला दिलासा मिळणार आहे. यादृष्टीने सौरऊर्जा विकासावर दिलेला भर, पायाभूत सुविधांसाठी मोठी गुंतवणूक, देशात ग्रामीण रस्त्यांच्या जाळ्यासाठी केलेली तरतूद, ६२ लाख लोकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, कृषी महाविद्यालये सुरू करणे, डोंगराळ भागात प्रवास-पर्यटनाला दिलेली चालना या तरतुदी आश्वासक वाटतात. तसेच छोट्या उद्योगधंद्यांसाठी २ लाख कोटी रुपयांची तरतूद, देशात २ लाख अंगणवाड्या अद्ययावत करणे, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी घरांसाठी ४८,००० कोटी रुपयांची तरतूद, नळाद्वारे ३.८ कोटी घरांमध्ये पाणी, आत्मनिर्भर भारत योजनेतून १६ लाख नोकऱ्या, तेलबियानिर्मितीला प्राधान्य, ५ नदीजोड प्रकल्पांची उभारणी, ६० कि.मी. रस्त्यांचा रोप वे, व्हायब्रंट व्हिलेजसाठी प्रस्ताव, घरेलू उत्पादक कारखान्यांसाठी ९०

हजार कोटी रुपये, ड्रोन तंत्रज्ञान संशोधनास शेतीमध्ये मान्यता, स्थानिक भाषांमध्ये मुलींना शिकवण्याची घोषणा, १ लाख कोटींचे व्याजमुक्त कर्जवाटप या तरतुदी भुरळ पाडणाऱ्या आहेतच. मात्र प्रत्यक्षात काय आहे, हे पाहिल्यास निराशाच समोर येते.

कृषी क्षेत्र व ग्रामीण भागासाठी तुटपुंज्या तरतुदी, तर काही तरतुदींमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत कपात केल्याचे दृष्टीस येते. उदा. म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेसाठी २०२०-२१ मध्ये १,११ हजार कोटी रु, २०२१-२२ मध्ये ९८ हजार कोटी रुपये तर २०२२-२३ मध्ये ७३ हजार कोटी रुपये एवढी तरतूद केली आहे. म्हणजे सलग दोन वर्षे मनरेगासाठीच्या तरतुदीत सरकार कपात करत आले आहे. शेतमालाच्या हमी भावातही २०२१-२२ मध्ये ३,५९६ तर २०२२-२३ मध्ये १,५०० अशी घट करण्यात आलेली आहे. मध्यान्ह भोजन योजनेसाठी २०२०-२१ मध्ये १३,४०० कोटी, २०२१-२२ मध्ये ११,५०० कोटी तर २०२२-२३ मध्ये १०,२०० कोटी इतकी कमी तरतूद आहे. शेतीच्या योजनांसाठी २०२१-२२ मध्ये १२,३५९ कोटी तर २०२२-२३ मध्ये १०,४३३ म्हणजे २,००० कोटींनी कमी तरतूद आहे. इंधनावरील सबसिडी २०२१-२२ मध्ये ३८,४५५ कोटी रुपये होती, २०२२-२३ मध्ये फक्त ५,८१३ कोटींचीच तरतूद आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीतही मागील दोन वर्षांपासून ६८,००० कोटींचीच तरतूद आहे. पीक विमा योजनेत २०२१-२२ च्या तुलनेत या अर्थसंकल्पात ५०० कोटींची कमी तरतूद आहे. २०२१-२२ मध्ये खतांवरील अनुदानासाठी १.४० लाख कोटी रुपयांची तरतूद होती. २०२२-२३ मध्ये हा निधी १.०५ लाख कोटी म्हणजे ३५,००० कोटी रुपयांनी कमी झाला आहे.

**शिक्षण, आरोग्य, घरांसाठी अपुरी तरतूद**

वीज, शिक्षण, आरोग्य व घरे यांची ग्रामीण क्षेत्रातील गरज व त्यासाठीची तरतूद पुरेशी नाहीच. ग्रामीण भागातील घरांचा विचार करता ती नियोजित व स्वच्छ नाहीतच. त्यावर ग्रामीण समाजाचे आरोग्य व उत्पादकता अवलंबून आहे. दुसरीकडे, मोठ्या खाजगी उद्योगांनी (कॉर्पोरेट सेक्टर) लहान वस्तूंच्या उत्पादनावर इतके आक्रमण केले आहे, की 'बिस्किटे मुंबईस्थित कंपन्यांनी भाजावी व देशभर विकावी', हे ग्रामीण समाजाच्या दृष्टीने तरी हितावह व तर्कशुद्ध नाही. १९३०-४० च्या दशकात अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्स म्हणाले होते, की अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्यांची ब्रिटिश शहरांवर इतकी घट्ट पकड झाली होती, की त्यांना 'आम्हाला आमचा ब्रेड तरी भाजू द्या' अशी मागणी करावी लागली. नेमके हेच चित्र आज भारतातील ग्रामीण समाजाचे झाले आहे. हे चित्र बदलण्याची इच्छाशक्ती या अंदाजपत्रकात दिसत नाही.

**कौशल्यप्राप्तीही वाया जाईल**

ग्रामीण तरूणांचे शिक्षणाचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढले. मात्र रोजगाराअभावी त्यांच्यासमोर सॅच्युरेशन पॉईंट आला. शिकूनही आपण चांगल्या स्थितीत येऊ शकत नाही, असे त्याला वाटते. आज उद्योगधंदे सगळ्या कंपन्यांनी बळकावले. त्यांच्यासमोर ग्रामीण तरूण आज हतबल झाले आहेत. त्यामुळे कौशल्यप्राप्तीनंतरही ते स्वतःचा रोजगार उभारू शकत नाहीत. त्यामुळे आज त्यांचे शिक्षण जसे वाया गेले तसे उद्या कौशल्यप्राप्तीही वाया जाईल. ती वाया जाऊ नये यासाठी अंदाजपत्रकात कोणतीही विशेष तरतूद नाही. ग्रामीण लोकसंख्या देशात अजूनही ६० टक्के आहे, तर प्रश्न बहुसंख्य समाजाचाच आहे. २०२१ च्या कॅलेंडर वर्षात गरिबांचे उत्पन्न ३५ टक्क्यांनी कमी झाले, तर श्रीमंतांचे उत्पन्न सुमारे ८ पटीने वाढले. याची दखल अंदाजपत्रकाने घेतली नाही. २०२१-२२ च्या आर्थिक पाहणी अहवालातील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे भारतात उत्पादनक्षम वयाची लोकसंख्या ९४ कोटी तर रोजगार शोधण्यासाठी स्वतः प्रयत्न करणाऱ्यांचे (लेबर फोर्स पार्टीसिपेशन रेट) प्रमाण ३७.५ टक्के म्हणजे ५२ कोटी आहे. याची नोंद घेताना अर्थशास्त्रज्ञ पी. चिदंबरम म्हणतात, ''हाताला काम, गरजूंचे कल्याण आणि संपत्तीनिर्माणातून नवोन्मेषाला गती ही त्रिसूत्री देशाला आवश्यक ठरली असती. तिच्यातील संपत्तीच्या भागाकडेच यंदाच्या अर्थसंकल्पाने लक्ष पुरवले, तेही संचयापुरतेच. अर्थसंकल्पाला कथित मानवंदना कोण देते, यावरूनही ते स्पष्ट झालेच...'' म्हणजेच ना काम, ना कल्याण.. फक्त संपत्ती हाच या अर्थसंकल्पाचा अंतस्थ हेतू होता, हे दिसते. या अर्थसंकल्पातील दुसरा उपेक्षित वर्ग सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योजकांचा आहे. देशातील ६.३५ कोटी लोकसंख्येचा हा वर्ग भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. यात काम करणारी श्रमसंख्या ११.१ कोटी म्हणजे देशातील एकूण रोजगाराच्या ३० टक्के आहे. त्यांचा राष्ट्रीय उत्पनात २८ टक्के वाटा आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान यातील ९२ टक्के वर्गाने सरकारने थेट मदतीचे पॅकेज द्यावे, अशी अपेक्षा 'लोकल सर्कल' या संस्थेअंतर्गत केली होती. अर्थमंत्र्यांनी यावर्षीदेखील थेट मदतीची मागणी मान्य केली नाही. याउलट त्यांनी कर्जाधारित योजनेचा विस्तार केला. एक अमेरिकन अर्थविश्लेषक या अंदाजपत्रकाबाबत भाष्य करताना म्हणतात, की 'संपत्ती गरिबांकडून मध्यमवर्गीयांकडे व मध्यवर्गीयांकडून श्रीमंत वर्गाकडे खेचून न्यायला मदत करणे, हा मानस या अंदाजपत्रकाचा आहे'.

**घोषणांच्या अंमलबजावणीबाबत शंका**

मागील दोन वर्षांत कोरोनाकाळात शेतीक्षेत्राने विकासदरातील वाढ कायम ठेवत अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान दिले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अर्थमंत्री किमान आधारभूत किमतीवर खरेदीची हमी देण्यासाठी गेस धोरण किंवा कायद्याची भाषा करतील अशी अपेक्षा होती, ती त्यांनी फोल ठरवली. '२०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू' अशी घोषणा प्रधानमंत्र्यांनी वारंवार केली आहे. या संदर्भात किती प्रगती झाली व शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढले का, याबाबतचा खुलासा अर्थमंत्र्यांनी करण्याची अपेक्षा होती. तीसुद्धा पूर्ण झाली नाही. मात्र या अर्थसंकल्पात शहरातील रोप वे, ड्रोन शेती इत्यादी दिखाऊ घोषणांचा पाऊस पाडण्यात आला. या योजनांची गत मोठा गाजावाजा करून राबवण्यात आलेल्या स्मार्ट सिटी योजनेसारखीच तर होणार नाही ना, अशी शंका येते.

ग्रामीण समाजाने गावामध्ये राहणे हे जर या अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेत पाप असेल, तर ६० टक्के लोकांना हे पाप करावे लागते, हे वास्तव आहे. ऑटोमेशन व रोबोटायझेशनमुळे यांच्यासाठी पुरेसा रोजगार उपलब्ध होत नाही म्हणून यावर मूलभूत तरतुदी करण्याचे काम अंदाजपत्रकात करावे लागते, त्याचे चिंतन दिसत नाही. यासाठी गावाची स्वयंपूर्णता नव्याने परिभाषित करण्याची गरज आहे. आज आपण नियोजन सोडून दिले तर मग आपले ग्रामीण विकासाचे नवीन मॉडेल काय आहे, याचे संकेत अंदाजपत्रकातील तरतुदीत दिसत नाहीत.

सरकारने घोषणा केल्या मात्र त्याची अमंलबजावणी होईल की नाही, याबद्दल शंका आहे. ●●● **(लेखक सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत)**



प्रा.डॉ. विनोद मिश्रा

# कोरोनामुळे रोजगार गमावलेल्यांची निराशा



**कोरोना महामारीने सामान्यांचे जगणे अधिक कठीण आणि कष्टप्रद केले असले तरी, त्यावर तोडगा म्हणून बेरोजगार झालेल्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही. त्यामुळे कोरोनामुळे रोजगार गमावलेल्यांची निराशा या अर्थसंकल्पाने केली आहे.**

कोरोना महामारी आणि त्याच्या जोडीला आलेल्या आर्थिक समस्येने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यावर अनेक अर्थाने विपरित परिणाम केले. रोजगार, सामाजिक सुरक्षितता, आरोग्य आणि हिंसाचाराची समस्या या सगळ्यांना त्यांना कमी-अधिक प्रमाणात तोंड द्यावे लागले. कोविड-१९ची महामारी आणि त्याचमुळे करावे लागलेले लॉकडाऊन व इतर उपाययोजनांमुळे कधी नव्हे एवढी बेरोजगारी वाढून तिने कळस गाठला. रोजगाराच्या गमावलेल्या संधी आणि लॉकडाऊनमुळे उद्योग बंद पडल्याने शहरांकडून गावाकडे असे उलट स्थलांतर सुरू झाले. अनुसूचित जाती आणि आदिवासी यांच्या हलाखीत लॉकडाऊन आणि उलट स्थलांतराने अधिकच भर पडली. त्यांच्यावर त्याचा विपरित परिणाम झाला. या समाजघटकाला रोजगाराच्या संधी गमवाव्या लागल्यामुळे तो दारिद्र्याच्या खोल दरीत लोटला गेला. २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात या समाजघटकाच्या बेरोजगारीवर आणि गमावलेल्या उपजीविकेच्या साधनांबाबत काहीतरी उपाययोजना केल्या जातील, अशा मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, त्याला या अर्थसंकल्पाने हरताळ फासला आहे. उलट, हा अर्थसंकल्प गरिबांच्या बाजूने अधिक राहील, असे वाटले असताना अधिक श्रीमंतधार्जिणा झाला आहे. देश सध्या ज्या बेरोजगारीच्या समस्येला तोंड देत आहे, त्याची दखलही घेतली गेली नाही.

**असमानता आणखी वाढवली**

वाढती बेरोजगारी आणि वाढती असमानता अशा दोन्हीही आघाड्यांची अर्थसंकल्पाने दखलही घेतलेली नाही. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करण्यासाठी सरकारने संपत्ती कर (वेल्थ टॅक्स) आणलेला नाही. महामारीने सामान्यांचे जगणे अधिक कठीण आणि कष्टप्रद केले असले तरी, त्यावर तोडग्याद्वारे मदतीचा हात देणे सरकारने टाळले आहे. सरकारने परदेशी विद्यापीठांना नियमनमुक्त देशांत प्रवेश दिल्यामुळे दलित आणि वंचित, शोषित समाजघटकातील विद्यार्थी आणि श्रीमंत विद्यार्थी यांच्यात एकसमान पातळीवर होणारी स्पर्धादेखील असमानतेच्या पातळीवर पोहोचली आहे. यामुळे वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजघटकांना रोजगाराच्या संधी आणि शिक्षणाच्या संधी याबाबत असलेली असमानता अधिक वाढवली आहे.

अनुसूचित जातींकरता कल्याणकारी योजना आणि उपक्रम राबवणाऱ्या, तसेच अंमली पदार्थांचे व्यसन सोडण्याकरता प्रयत्न करणाऱ्या तसेच ज्येष्ठ नागरिक आणि इतरांकरता विविध योजना, उपक्रम राबवणाऱ्या सामाजिक न्याय आणि समाजकल्याण खात्याकरता अर्थसंकल्पात ११,९२२.५१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात हीच तरतूद १०,५१७.६२ कोटी रुपयांची होती, नंतर ती १०,१८० कोटी रुपयांपर्यंत वाढवली गेली. सामाजिक न्याय आणि समाजकल्याण खात्याच्या काही योजनांना कात्री लावली गेली, जसे की, उच्चशिक्षित गुणवत्ताप्राप्त युवकांकरता असलेल्या शिष्यवृत्तीसाठीची (श्रेयस) तरतूद २०२१-२२ च्या सुधारित नियोजनात ४५० कोटी रुपयांवरून ३६४ कोटी रुपये एवढी कमी केली गेली. इतर मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकासाठीच्या (ईडब्ल्यूएस) श्रेयसच्या रकमेतही

२०२१-२२ मध्ये १३० कोटी रुपयांवरून ८० कोटी रुपयांपर्यंत घट करण्यात आली. एकूणच, केंद्राच्या विविध योजना आणि प्रकल्पांकरता २०२१-२२ मध्ये असलेली १,३९५ कोटी रुपयांची तरतूद कमी करून, २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ९६९.५० कोटी रुपये करण्यात आली.

**एससी, एसटीसाठीच्या तरतुदीत अत्यल्प वाढ**

अनुसूचित जातींकरता २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात एकूण केलेली तरतूद १,४२,३४२.३६ कोटी रुपये असून, २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील १,२६,२५९ कोटी रुपयांच्या तरतुदीपेक्षा ती १६,००० कोटी रुपयांनी अधिक आहे. अनुसूचित जातींकरता असलेल्या पोस्टमॅट्रिक स्कॉलरशिपच्या (पीएमएस-एससी) रकमेत भरीव वाढ केली असल्याने, सामाजिक न्याय आणि समाजकल्याण विभागासाठीच्या आर्थिक तरतुदीत १३ टक्क्यांची वाढ दिसत आहे. केंद्रपुरस्कृत योजना आणि केंद्राच्या क्षेत्रीय योजना पाहता, अनुसूचित जातींकरता करण्यात आलेली तरतूद ही केवळ ८.८ टक्क्यांनी वाढलेली दिसते. देशभरातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा विचार करता ही तरतूद अतिशय तोकडी अशीच आहे. २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अनुसूचित जमातीकरता केलेली आर्थिक तरतूद ही ८९,२६५.१२ कोटी रुपये आहे. गतवर्षीच्या अर्थसंकल्पात या समाजघटकासाठी केलेल्या तरतुदीच्या तुलनेत यावेळी १२ टक्के वाढ करण्यात आली आहे. गतवर्षीच्या अर्थसंकल्पात याच समाजघटकाकरता केंद्रपुरस्कृत योजना आणि केंद्राच्या क्षेत्रीय योजनांकरता केलेल्या तरतुदीशी तुलना करता, यावेळच्या अर्थसंकल्पात केलेली वाढ ही केवळ ५.५ टक्के असल्याचे लक्षात येते.

नियोजन, अंमलबजावणी आणि नियंत्रण या आघाड्यांवर आदिवासी उपयोजना (टीएसपी) खूप आव्हानांना तोंड देत आहे. या योजनेकरता मंत्रालयाच्या पातळीवर तरतुदीचे केले जाणारे नियोजन हे गरजा पाहून करण्याऐवजी केवळ प्रतिकात्मकता या स्वरुपात केले जाते. त्यासाठी त्या समाजाचा सक्रीय सहभाग असतो. राज्य आणि जिल्हा पातळीवर समर्पित अशी नियंत्रण यंत्रणा नसल्यामुळे आदिवासी उपयोजनेच्या कार्यवाहीचे मूल्यमापन आणि नियंत्रण अतिशय जुजबी असेच असते.

**अल्पसंख्यांकांसाठी कोणतीही योजना नाही**

२०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अल्पसंख्यांकांकरता कोणतीही योजना जाहीर केलेली नाही की, त्यांचा साधा उल्लेखदेखील केलेला नाही. या अर्थसंकल्पात अल्पसंख्यांकविषयक मंत्रालयाकरता ४ टक्के म्हणजेच २१० कोटी रुपयांची वाढ केलेली आहे. त्यातही प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमासाठीच्या (पीएमजेव्हीके) तरतुदीत केलेल्या वाढीमुळे ही तरतूद वाढलेली दिसते. एकूण केंद्रीय अर्थसंकल्पाशी तुलना करता, या खात्याकरता करण्यात आलेली तरतूद ०.१२ टक्क्यांवर घसरली आहे, २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात हीच तरतूद ०.१४ टक्के होती.

दलित, आदिवासी आणि धार्मिक अल्पसंख्यांक यांच्यासारख्या समाजातील दुबळ्या, कमकुवत घटकांकरता त्यांचे महत्त्व लक्षात घेऊन भरीव तरतूद २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अपेक्षित होती.



## आदिवासींमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी योजना

सरकारने व्हेंचर कॅपिटल फंड फॉर शेड्यूल्ड ट्राईब्ज ही नवीन योजना जाहीर केली असून, त्याद्वारे आदिवासींमधील उद्योजकता आणि इनोव्हेशन व ग्रोथ टेक्नॉलॉजीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. आतापर्यंत ही योजना अनुसूचित जातींकरताच मर्यादित होती. आदिवासी उद्योजकांमधील स्टार्टअप्सच्या कल्पक योजनांना यामुळे इनक्युबेशन (व्यवसायवृद्धीचे पूरक पर्यावरण) उपलब्ध करून दिले जाणार आहे. या योजनेद्वारे आदिवासी समाजातील उद्योजकतेला प्रोत्साहन, त्यांच्यातून नवउद्योजक उभे राहावे, त्यांनी संपत्ती निर्माण करून समाजाला बळ द्यावे, यशस्वी आणि फायदेशीर व्यवसाय करावा, हा त्यामागील हेतू आहे. त्याउलट अनुसूचित जातींकरता रोजगार निर्मितीसाठी २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अत्यंत तोकडी अशी तरतूद करून ती केवळ २२.९७ कोटी रुपये केली आहे. हीच तरतूद गतवर्षीच्या अर्थसंकल्पात १७०.९६ कोटी रुपये होती. त्याचप्रमाणे अनुसूचित जमातीकरता हीच तरतूद २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात केवळ ११.३ कोटी रुपये केली असून, ही तरतूद गतवेळच्या अर्थसंकल्पात ८९.५ कोटी रुपये होती.

तथापि, या समाजघटकांच्या योजनांकरता केलेली तरतूद उलट घटलेलीच दिसते. मदरसा आणि अल्पसंख्यांकांच्या योजनांसाठीची तरतूदही कमी केली आहे. प्राईम मिनिस्टर्स स्पेशल स्कॉलरशिप स्कीम (पीएमएसएससी) आणि एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल्स यासाठीच्या तरतुदीत वाढ केली असली तरी, तीदेखील नगण्यच आहे.

अनुसूचित जातींचे कल्याण तसेच अनुसूचित जमातींचे कल्याण याकरता निती आयोगाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, त्यांच्या लोकसंख्येनुसार त्यांच्याकरता आर्थिक तरतूद केली पाहिजे. तथापि, वर्षानुवर्षे केंद्र सरकार त्याचे पालन करताना दिसत नाही. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचा विचार करता, त्यांच्यासाठीच्या तरतुदीत अनुक्रमे ४०,६३४ कोटी रुपये आणि ९,३९९ कोटी रुपयांचा अनुशेष दिसतो आहे. •••

**(लेखक इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज् या संस्थेत सहयोगी प्राध्यापक आहेत)**

# अर्थसंकल्पाने दिला सर्वसामान्यांच्या हाती भोपळा

**आयकरात कोणतीही सवलत न देता केंद्र सरकारने मध्यमवर्गीयांची निराशा केली. एकीकडे श्रीमंतांच्या चैनीचे हिऱ्याचे दागिने स्वस्त करताना सर्वसामान्यांची गरजेची वस्तू असलेली छत्री मात्र २० टक्के जादा कर लावून महाग केली आहे. थोडक्यात, या अर्थसंकल्पाने सर्वसामान्यांच्या हाती भोपळाच दिला आहे.**

**प्रतिनिधी**




खरे तर, मोदी सरकारच्या या अर्थसंकल्पातून फारशी अपेक्षा नव्हतीच. पण व्यावसायिक वापराचे सिलिंडर ९१.५० रुपयांनी स्वस्त करण्यात आले. यामुळे हे व्यावसायिक आपल्या हॉटेलांतून ज्या खाद्यपदार्थांचा व्यवसाय करतात ते खाद्यपदार्थ ते स्वस्त करतील, अशी अपेक्षा ठेवता येत नाही. कारण एकदा महाग झालेली वस्तू पुन्हा स्वस्त होईल याची शक्यता जवळजवळ नसतेच, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. शिवाय त्यांना इतरही खर्चाची बरीच तोंडमिळवणी करावी लागते. त्यामुळे या अर्थसंकल्पातून सर्वसामान्य जनतेच्या हाती काहीच लागले नाही.

**सर्वसामान्यांची छत्री महाग, तर हिरे स्वस्त**

या अर्थसंकल्पात हिऱ्यावरील ५% कस्टम ड्युटी कमी केल्यामुळे हिरे स्वस्त होतील. पण सर्वसामान्य लोक हिरे खरेदी करत नाहीत, तर उन्हाळ्यात नसली तरी पावसाळ्यात त्यांना छत्रीची गरज असते. पण त्यावर त्यांनी २० टक्के जादा कर लावल्यामुळे त्या छत्र्या मात्र महाग होणार आहेत. हा सर्वसामान्य लोकांवर अन्यायच आहे, असे म्हटले पाहिजे.

अर्थसंकल्पाच्या एक दिवस आधीच देशभरातील शेतकऱ्यांनी विश्वासघात दिवस पाळलेला होता. सरकारने एमएसपी कायद्यासंबंधाने कमिटी स्थापन करण्याचे शेतकरी संघटनांना जे आश्वासन दिले होते, त्याची पूर्तता न करणे हेही यामागे एक कारण होते. निदान आता तरी सरकारने एमएसपी कायद्याबद्दल कमिटी नेमण्याची आवश्यकता होती. पण तसे न करता ठराविक धान्यावरील ठराविक एमएसपी शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा करण्याची घोषणा केली. पण घरगुती वापराच्या सिलिंडरवरील सबसिडी जशी एक प्रकारे नष्टप्राय झाली आहे, तसेच याबाबतही घडण्याची शक्यता आहे. त्याचाही लाभ शेतकऱ्यांना फारसा होणार नाही.

**घर आणि नळाद्वारे पाणी हे स्वप्नच राहणार**

८० लाख घरे बांधण्यासाठी ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद करत असल्याची घोषणा अर्थमंत्र्यानी केली आहे. अशा घोषणा यापूर्वीच्या अर्थसंकल्पातही करण्यात आल्या होत्या. तशी अर्थसंकल्पीय तरतूदही केली होती; परंतु त्यातील रकमाही आतापर्यंत पूर्णपणे खर्च झालेल्या नाहीत. त्यामुळे जाहीर केलेली घरबांधणीची उद्दिष्टपूर्ती झालेली नाही. हे अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशीच रविशकुमार यांनी त्यांच्या प्राइम टाईममध्ये आकडेवारीनिशी सिद्ध केले आहे.

'हर घर नल से जल' योजनेनुसार २०२२ मध्ये ३.८ कोटी कुटुंबांना दररोज नळाद्वारे पाणी पोचवण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये ६० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे निव्वळ गोरगरीब लोकांसाठीची तरतूद आहे. पण जिथे शहरी भागातील उच्च मध्यमवर्गीयांच्याही नळाला सहा दिवसांतून एकदा पाणी मिळते, तेथे या गोरगरिबांना दररोज नळाद्वारे पाणी कसे मिळेल, हा प्रश्नच



आहे. अर्थसंकल्पात आयकरात कोणतीही सवलत न दिल्यामुळे मध्यमवर्गीयांचीसुद्धा निराशाच झाली आहे. एलआयसीचा आयपीओ काढणे म्हणजे ती एक प्रकारे विक्रीला काढण्याचे, त्याच्या खाजगीकरणाचे पुढचे पाऊल ठरणार आहे.

**बेरोजगारांची चेष्टा**

हा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वीच्या एक आठवडा अगोदरपासून रेल्वेभरती बोर्डाच्या परीक्षेतील घोटाळ्यामुळे बिहार, उत्तर प्रदेश या राज्यांतून परीक्षार्थींनी रेल रोकोसारखे फार मोठे आंदोलन केले होते. त्यांच्यावर झालेल्या पोलिसी दडपशाहीमुळे हे आंदोलन देशातील सर्व प्रसारमाध्यमांमध्ये ठळकपणे चर्चेत होते. यातून देशातील बेकारीचा प्रश्न किती गंभीर आहे व त्यासंबंधाने युवकांमध्ये किती नाराजी आहे, हे सिद्ध झाले आहे. असे असतानाही या अर्थसंकल्पामध्ये देशाच्या ग्रामीण व शहरी भागातील सुशिक्षितांमध्ये असलेल्या बेकारीच्या प्रश्नासंबंधाने जवळजवळ कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. केवळ ६० लाख लोकांना येत्या वर्षात नोकऱ्या देण्यात येतील, असे मोघम आश्वासन देण्यात आले आहे. पण यापूर्वी पंतप्रधानांनी दरवर्षी दोन कोटी तरुणांना रोजगार देण्याची जी घोषणा केली होती, त्यातून पूर्णपणे माघार घेऊन आता दरवर्षी ६० लाख लोकांना रोजगाराची घोषणा करणे म्हणजे एक प्रकारे माघारच घेण्यासारखे आहे. त्या दोन कोटीचे काय झाले, हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्याचबरोबर या ६० लाखाचेही तसेच होणार आहे, हेही निश्चित.

ग्रामीण बेरोजगारीवर तात्पुरता का होईना, पण एक उपाय म्हणून मनरेगाची घोषणा केंद्र सरकारने यूपीए-२ च्या काळातच केली होती; परंतु ही यूपीए-२ ची योजना म्हणजे एक प्रकारचे या सरकारचे स्मारकच आहे, असे म्हणून पंतप्रधानांनी त्यांची हेटाळणी केली होती. पण या अर्थसंकल्पात तर ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी मागील वर्षी व त्यापूर्वीच्याही वर्षात जेवढ्या रकमेची तरतूद केली होती, तेवढीही तरतूद या अर्थसंकल्पात केली नाही. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी ९८ हजार कोटीची तरतूद होती, पण यावर्षी त्यात कपात करून ७३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यावरून केंद्र सरकार देशातील बेकारीच्या प्रश्नाला अजिबात महत्त्व देत नाही, हेच दिसून येते. खरे तर, हे सरकार देशातील श्रमिक, दलित, पीडित, शोषित आणि महिलांच्या कोणत्याच प्रश्नाबद्दल गंभीर नाही. त्यामुळेच वाढत्या महागाईची यांना चिंता नाही. तसेच त्यांच्या आरोग्याचीही काही चिंता नाही. कोरोनाची साथ ज्या बेफिकीरपणे हाताळली, त्यातून हे दिसून आले आहे. शिक्षणाचीही तशीच गत आहे. पण बेकारीचा प्रश्न असाही त्यांच्या दृष्टीने दुर्लक्षितच आहे, त्याचे कारण काय असावे?

एक तर युवक बेरोजगार राहिल्यामुळे ज्या भाजपचे व आरएसएसचे हे सरकार आहे, त्या भाजपला व त्याच्या आयटी सेलसाठी, अगदी स्वस्तात विरोधकांना ट्रोल करण्यासाठी तरुण मिळणार नाहीत. तसेच देशात कोठे ना कोठे, कोणत्या ना कोणत्या निवडणुका असतातच. त्यात अंध भक्तांची व स्वयंसेवकांची गरज असते. गरज पडल्यास दंगली करण्यासाठीही त्यांची आवश्यकता असते. तेव्हा यासाठी लागणारे तरुणही यांना या बेरोजगारांतूनच अगदी स्वस्तात मिळू शकतात. अन्यथा बेकारांना जर नोकऱ्या लागल्या तर ते दंगलीसारख्या जोखमीच्या, ज्यातून त्यांच्या नोकऱ्या धोक्यात येऊ शकतात, अशा गोष्टीत उतरणार नाहीत. तसेच निवडणुकांमध्ये वन बूथ टेन युथ किंवा हर हर मोदी, घर घर मोदी असे म्हणत घरोघरी प्रचार करण्यासाठी त्यांना स्वस्तात स्वयंसेवकही मिळणार नाहीत. हे काम करण्यासाठी जेवढे पैसे या तरुणांना द्यावे लागतात, त्यापेक्षा कितीतरी जास्त पैसा भाजपकडे निवडणूक निधी म्हणून आलेला आहे.

उपलब्ध माहितीनुसार, २०१९-२० या आर्थिक वर्षात १८ मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना एकूण तीन हजार ४४१ कोटींची रक्कम निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देणगी म्हणून मिळाली. या एकूण रकमेपैकी ७५ टक्के रक्कम भाजपच्या खात्यात आली. याप्रमाणे भाजपला मिळालेल्या रकमेत अनेक पटींनी वाढ झाली आहे. त्याशिवाय हिशेब देणे बंधनकारक नसलेल्या पी.एम. केअर फंडाचीसुद्धा प्रचंड रक्कम त्यांच्याकडे जमा आहे. या त्यांच्या आर्थिक मजबुतीतून या तरुणांना ते वरील कामी अत्यंत कमी पैशात राबवून घेऊ शकतात. पण याच तरुणांना जर नोकऱ्या लागल्या तर अशा कमी पैशात ते काम करू शकणार नाहीत. यासाठी या देशात बेकारी राहणे भाजप आणि आरएसएससाठी आवश्यक आहे. स्वस्तात स्वयंसेवक मिळविण्यासाठी ते त्यांना गरजेचे आहे. त्यामुळे बेकारी ही एक प्रकारची यांची राखीव फौजच आहे, असे म्हणावेसे वाटते. म्हणूनच हे सरकार बेकारीचा प्रश्न फारसा गांभीर्याने घेत नाहीत, असे दिसून येते. •••




# गोव्यात पाच जोड्या रिंगणात

**सुरेश स. नाईक,**
**गोवा**

**गोव्याच्या राजकारणात आतापर्यंत बाबूश व जेनिफर मोन्सेरात हे एकच दांपत्य होते. मागील निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर जिंकून भाजपमध्ये गेलेले हे दांपत्य. जेनिफर या सावंत सरकारमध्ये मंत्री होत्या. यावेळी दोघांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविली. यंदाच्या निवडणुकीत अशा पाच जोड्या रिंगणात उतरल्या आहेत.**

गोवा विधानसभेच्या चाळीस जागांसाठी राजकीय पक्ष व अपक्ष मिळून ३०१ उमेदवारांनी जनतेचा कौल मागितलेला असून त्याचा निकाल दहा मार्च रोजी लागणार आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, आम आदमी पार्टी, महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, तृणमूल काँग्रेस यांसह रिव्होल्युशनरी गोवन्स यांनी मोठ्या चुरशीने ही निवडणूक लढविलेली आहे. सर्व चाळीसच्या चाळीस जागा लढविणारा भाजप हा एकमेव पक्ष असून त्याखालोखाल आपने ३९, आरजीने ३८ जागा लढविल्या. २०१७ च्या निवडणुकीत तीन जागा मिळविणाऱ्या, सरकार स्थापनेत काँग्रेसऐवजी भाजपला साथ देणाऱ्या आणि नंतर भाजपकडून लाथ खाल्लेल्या गोवा फॉरवर्डने यावेळी काँग्रेसशी निवडणूकपर्व युती केली असून त्या पक्षाने तीन तर काँग्रेसने ३७ जागा लढविल्या आहेत. त्यातही मागील निवडणुकीत निवडून आलेल्या गोवा फॉरवर्डच्या तीनपैकी एक आमदार भाजपला सामील झाला आहे, दुसऱ्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढविली आहे. गोवा फॉरवर्डचे प्रमुख विजय सरदेसाई यांनी त्या दोघांच्या बदली अन्य दोन जागांवर आपले उमेदवार देऊन निवडणूक लढविली आहे.

**सर्वेक्षणात भाजपला अनुकूलता**

भाजप सुरुवातीपासून फार जोमात आहे. दहा वर्षे सलग सत्ता राबविता आल्याने त्याचा उत्साह आणि पुन्हा बहुमत जिंकण्याचा आत्मविश्वास अजोड आहे. केंद्रात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजपचीच सरकारे असल्याने हे डबल इंजिनचे सरकार असल्याने गोव्याचा विकास घडविता आला, तशी गोव्याला समृद्ध करण्यास पुन्हा डबल इंजिनचे सरकार (काँग्रेसनेते त्याला ट्रबल इंजिन म्हणतात) आणण्याचे आवाहन भाजपच्या स्थानिक व केंद्रीय नेत्यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राजनाथ सिंह, स्मृती इराणी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व गोव्याचे प्रभारी देवेंद्र फडणवीस आदी दिग्गजांनी भाजपचा प्रचार सर्वव्यापी करून टाकला. त्यात मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी लावलेला प्रचाराचा धडाका, विरोधकांवर केलेला हल्लाबोल यातून भाजपचा मोठाच बोलबाला झाला. काही यंत्रणांनी केलेल्या सर्वेक्षणांत भाजपला अनुकूलता दर्शविलेली आढळते. त्यामुळेही भाजपचीच हवा होण्यास मदत झाली. मतदानाच्या अलीकडे हे सारे दिसते तितके गोड निघेल का, अशी शंका उत्पन्न झालेली जाणवली.

**खाणीसंबंधी घोषणेचा भाजपवर परिणाम होणार**

भाजपने आपला निवडणूक जाहीरनामा अन्य पक्षांच्या नंतर प्रसिद्ध केला. तीन गॅस सिलिंडर मोफत देण्याची, दयानंद निराधार योजनेंतर्गत दिले जाणारे अर्थसाह्य तीन हजार रुपये करण्याची, खाणी तीन महिन्यांत सुरू करण्याची आश्वासने भाजपने दिली आहेत. ही आश्वासने मतदारांना, विशेषतः गॅस सिलिंडर, पेट्रोलच्या दरवाढीमुळे मेटाकुटीस आलेल्या मध्यमवर्गाला किती दिलासा देऊ शकतील याविषयी शंका आहे. मनोहर पर्रीकर विरोधी पक्षनेते असताना त्यांनीच खाण उद्योगात ३५ हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा अहवाल दिला होता. त्यानंतर खाणी बंद करणयात आल्या. त्या पुन्हा सुरू करण्याची आश्वासने व घोषणा गेल्या दहा वर्षांत डझनावारी वेळा करण्यात आल्या. प्रत्यक्षात त्या खऱ्या झालेल्या नाहीत. (आता तर विरोधी पक्षनेते दिगंबर कामत, जे त्याकाळी खाणमंत्री होते, यांनी सदर अहवाल प्रसिद्ध करण्याचे आव्हान दिले आहे.) त्यामुळे खाणीसंबंधीच्या घोषणेचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता अधिक आहे.

भाजपने अन्य पक्षांतील नेत्यांच्या केलेल्या आयातीमुळे, जिंकण्याच्या क्षमतेच्या आधारे दिलेल्या उमेदवाऱ्यांमुळे भाजपचा चेहरा हा भाजपचा राहिलेला नाही. सासष्टी तालुका ख्रिस्तीबहुल असून तिथे भाजपला कौल मिळालेला नाही. काँग्रेसमधून दहाजण एकगठ्ठा भाजपमध्ये आले, त्यात सात ख्रिस्ती आमदार होते. त्यातील तीन सासष्टीमधील होते. वेळ्ळी, नुवेच्या आमदारांना तिकीट नाकारले. त्यातल्या एका ठिकाणी अन्य ख्रिस्ती उमेदवाराला तिकीट दिले. याशिवाय कुडतरी येथे नव्या ख्रिस्ती उमेदवाराला तिकीट दिले आहे. जुन्या आमदारांना भाजपच्या उमेदवारीवर जनतेचा कौल मिळणार नाही म्हणून त्यांना तिकीट नाकारून नव्यांना तिकिटे दिली आहेत. भाजपला ख्रिस्ती जनता स्वीकारते की नाही त्याची आजमाईश याठिकाणी होणार आहे. भाजपच्या पुढच्या वाटचालीसाठी ही आजमाईश दिशादर्शक ठरणार आहे.

**लोकमानस जिंकण्याच्या दिशेने काँग्रेसची भरारी**

निवडणुकीच्या ऐन तोंडावर गलितगात्र झालेल्या, नेतेमंडळी सोडून गेल्याने निर्नायकी म्हणावी अशी स्थिती झालेल्या काँग्रेसने मतदानाचा दिवस जवळ येतायेता लोकमानस जिंकण्याच्या दिशेने मोठी भरारी घेतलेली दिसून आली. काँग्रेसच्या तेरा आमदारांनी पक्ष सोडून भाजपमध्ये शिरकाव केला. त्यानंतरही निवडणूक जाहीर झाल्यानंतर आणखी तिघांनी पक्ष सोडला. या पक्षांतरामुळे काँग्रेसवरचा लोकांचा विश्वास उडाला. काँग्रेसचे उमेदवार निवडून देणे म्हणजे भाजपला मागील दाराने आमदारांचा पुरवठा करायचा असा मतप्रचार सुरू झाला. त्यातून काँग्रेसची अडचण झाली. लोकांच्या मनातून हा समज दूर करण्याचे आव्हान काँग्रेसच्या नेतृत्वापुढे उभे ठाकले. पक्ष सोडून गेलेल्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही ही भूमिका जाहीर करण्याबरोबर लोकांची तशी समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न काँग्रेसने केला आणि बोलल्याप्रमाणे पक्ष सोडून गेलेल्यांना पुन्हा पक्षात न घेता नवीन उमेदवारांना संधी दिली. बहुतेक सारे आमदार सोडून गेल्यानंतर माजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे, दिगंबर कामत व आलेक्स रेजिनाल्ड हे तिघेच पक्षात राहिले. अकस्मात रेजिनाल्ड तृणमूलमध्ये गेले, महिभरातच पुन्हा काँग्रेसमध्ये परतायला निघाले. त्यांनाही पुनर्प्रवेश नाकारून काँग्रेसने आपला निर्धार पक्का असल्याचे दाखविले. गोव्याचे प्रभारी पी. चिदंबरम, दिनेश गुंडूराव यांच्यासह प्रदेशाध्यक्ष गिरीश चोडणकर, आमदार दिगंबर कामत



## ‘आप’ स्थित्यंतर घडवणार नाही

पहिले तीनशे युनिट वीज मोफत, बेरोजगारांना भत्ता, प्रत्येक कुटुंबाला वर्षाला दहा लाख रुपयांपर्यंत लाभ, मोहल्ला क्लिनिकची स्थापना अशा घोषणा करीत, दिल्ली मॉडेलचा हवाला आणि गोव्याच्या समृद्धीचे आश्वासन देत आम आदमी पार्टीने मतदारांना मोठ्या प्रमाणात आकर्षित केले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अनेक वेळा गोव्याचा दौरा केला. तसे डिजिटल व्यासपीठावरून मतदारांशी वैयक्तिक संपर्क प्रस्थापित करून मतदारांशी जवळीक निर्माण केली. गोव्यात भंडारी समाजाची लोकसंख्या सर्वाधिक असूनही भंडारी समाजाचा मुख्यमंत्री का नाही असा भावनिक सवाल करून भंडारी समाजाचा पाठिंबा एकवटण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री भंडारी समाजाचा देणार असल्याचे सांगून पुढे अमित पालेकर या तरुणाला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून प्रस्तूत केले. आपच्या या भूमिकेला अनुकूल-प्रतिकूल प्रतिसाद प्रकटला. भंडारी समाज असा एका पक्षाला बांधून घेता येण्यासारखा नाही आणि तसे साध्य करायचे झाले तर त्याला मोठ्या अवधीची गरज आहे. आपकडे असा अवधीही नव्हता, तळागाळात पोहोचेल अशी कार्यकर्त्यांची फळीही नव्हती. भंडारी समाजातील लोक अतिशय प्रामाणिक म्हणून ओळखले जातात. अनेकांच्या अनेक नेत्यांशी, राजकीय पक्षांशी निष्ठा रुजू झालेल्या आहेत, त्या अवचितपणे बदलणे कठीण आहे. त्यामुळे आपचे हे कार्ड मोठे स्थित्यंतर घडवू शकणार नाही. न बाहेरचा पक्ष हे लेबल सोडल्यास पक्षाची म्हणून छान प्रतिमा निर्माण केली आहे. त्यांच्या कथनातील प्रामाणिकपणाही मतदारांना आकर्षित करणारा आहे. परंतु शेवटच्या मतदारापर्यंत पोचून त्याला मतदान केंद्रावर येऊन आपले मत देण्यास उद्युक्त करू शकणारी, तसे घडण्याची हमी घेणारी कार्यकर्त्यांची मोठी यंत्रणा आपकडे नसल्याने आपच्या मतांच्या टक्केवारीत वाढ होईल, निर्णायक विजयासाठी ती पुरेशी पडेल असे खात्रीशीरपणे म्हणता येत नाही.



यांनी काँग्रेसची ढासळलेली छबी पुनर्स्थापित करण्याच्या केलेल्या प्रयत्नांना यश आलेले दिसले. राहुल गांधी, प्रियंका गांधी यांनी प्रचारात सहभागी होऊन काँग्रेसला ऊर्जा पुरविली. सुरम्य, सुसंस्कृत, संतुलित, सुविद्य, समृद्ध, सुरक्षित, स्वानंदी गोवा असा सातर्सेकराचा संकल्प जाहीर करण्याबरोबरच सत्तेत आल्यास पेट्रोलचे दर लिटरला ऐंशी रुपये करण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे. त्याचा अनुकूल परिणाम झालेला जाणवतो. निवडणूक प्रचाराच्या प्रारंभी मोडीत काढण्यात आलेल्या काँग्रेसने भाजपवर मात केली आहे. त्याचा दृश्य परिणाम अर्थातच निवडणूक निकालानंतर दिसेल.

**भाजपच्या नकाराने उत्पल पर्रीकर यांचे पारडे जड**

दिवंगत संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांचे पुत्र उत्पल पर्रीकर यांच्या उमेदवारीच्या विषयावरून गोव्याची विधानसभा निवडणूक राष्ट्रीय स्तरावरील चर्चेत एकदम ठळक झाली. पोटनिवडणुकीत पणजीची जागा जिंकून काँग्रेसमधून आणखी नऊ जणांसह भाजपमध्ये आलेले बाबूश मोन्सेरात यांना तिकीट नाकारणे भाजप नेतृत्वाला अवघड वाटले. पणजीसह ताळगाव, सांता क्रूझ व सांत आंद्रे या मतदारसंघांवर बाबूशचे वर्चस्व चालते. यातील पहिल्या दोन मतदारसंघात बाबूश यांची पत्नी व सहकारी आमदार आहेत. उत्पल हे सक्रीय राजकारणात नव्हते. पर्रीकर यांचा मुलगा म्हणून त्यांना उमेदवारी द्यावी असे काही नाही, अशी पक्षाची भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. अन्य ठिकाणी उमेदवारी देण्याची लालूच त्यांना दाखवण्यात आली. त्याला न बधता उत्पल उमेदवारीवर ठाम राहिले. अखेरीस अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली. निवडून आल्यानंतर ते भाजपला पाठिंबा देतील या प्रचाराला आपण अपक्षच राहू, या ठाम उत्तराने त्यांनी विराम दिला. तत्त्वे आणि मूल्यांसाठी निवडणूक लढवीत असल्याची



भूमिका त्यांनी मांडली. त्याला लोकांचा प्रतिसाद मिळाला. काँग्रेसची उमेदवारी मिळण्याची अपेक्षा असलेले पणजीचे माजी महापौर उदय मडकईकर यांनी उमेदवारी न मिळाल्याने उत्पल यांना पाठिंबा जाहीर केला. शिवसेनेचे उमेदवार शैलेंद्र वेलिंगकर यांनीही उत्पल यांना पाठिंबा जाहीर केला. मनोहर पर्रीकर यांचे कार्यकर्ते ठामपणे उत्पलच्या बाजूने उभे राहिलेले दिसले. भाजपने तिकीट दिले असता जेवढा पाठिंबा उत्पलला मिळाला असता, त्यापेक्षा अधिक पाठिंबा भाजपच्या नकाराने उत्पल

## फालेरो यांच्यावर तृणमूलची भिस्त

तृणमूल काँग्रेसचा भर त्याच्याकडील निवडून येण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांवर जास्त आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधून तृणमूलमध्ये आलेले चर्चिल आलेमाव, त्यांच्या कन्या वालंका, आधी भाजप, मग गोवा फॉरवर्ड व आप असा प्रवास करीत तृणमूलमध्ये दाखल झालेले किरण कांदोळकर, त्याहीपेक्षा त्यांच्या पत्नी कविता कांदोळकर असे काही यशाची आशा दाखवणारे मोहरे तृणमूलकडे आहेत. आधीचे काँग्रेसचे नेते लुईझिन फालेरो यांचे मुत्सद्दी राजकारण ही तृणमूलसाठी जमेची बाजू आहे. आरजीने संपूर्ण गोव्यात आपली हवा निर्माण केली आहे. त्यांच्याकडे मुरब्बी राजकारणी असे कुणी नाही. ध्येयेवादी लोकांची फौज आरजीचे प्रमुख मनोज परब यांनी उभी केली आहे. या निवडणुकीतील हा डार्क हॉर्स आहे. गोव्याचा सर्वात आधीचा मगोप यावेळी चारेक ठिकाणी जिंकण्याची आशा करू शकतो. निवडणुकीच्या या स्पर्धेत कुणीही किती जोर लावला, तरी आताच्या हवामानाचा अंदाज भाजप-काँग्रेस यांच्यात मुख्य स्पर्धा असल्याचा आहे. भाजपला वाटते तितके यश सुलभ नाही, असेही वारे आहे.



यांना मिळाला. बाबूशविरोधी स्पर्धेत उत्पल एकदम वर चढले असून बाबूशपुढे त्यांचे आव्हान उभे झाले.

**लक्षवेधी निवडणूक**

माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर भाजपने उमेदवारी नाकारल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढले. मनोहर पर्रीकर संरक्षणमंत्री झाल्यानंतर पार्सेकर यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपवले गेले. २०१७ च्या निवडणुकीत पार्सेकर यांचा काँग्रेसचे दयानंद सोपटे यांनी पराभव केला. विद्यमान मुख्यमंत्री असूनही झालेला पराभव मानहानीकारक होता. पार्सेकर हे पक्षाच्या राज्यातील तीन संस्थापकांपैकी एक. पुढे संधी मिळेल या आशेने पक्षाशी एकनिष्ठ राहिले. पोटनिवडणुकीत सोपटे भाजपच्या तिकिटावर विजयी झाले. त्यावेळी ती पोटनिवडणूक असल्याचे सांगून पार्सेकर यांची तिकीट नाकारल्याबद्दल समजूत काढण्यात आली. आता मुख्य निवडणुकीतही तिकीट नाकारल्याने त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. पराभव झाल्यास राजकारणसंन्यास घेण्याची घोषणा त्यांनी केली आहे. पार्सेकरांच्या भूमिकेमुळे ही लढत लक्षवेधी ठरली

**पाच दांपत्ये रिंगणात**

गोव्याच्या राजकारणात आतापर्यंत बाबूश व जेनिफर मोन्सेरात हे एकच दांपत्य होते. मागील निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर जिंकून भाजपमध्ये गेलेले हे दांपत्य. जेनिफर या सावंत सरकारमध्ये मंत्री होत्या. यावेळी दोघांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविली. यंदाच्या निवडणुकीत अशा पाच जोड्या रिंगणात उतरल्या. भाजपचे आमदार मायकल लोबो हे त्यांची पत्नी डिलायला लोबो यांना भाजपने तिकीट नाकारल्याने त्यांच्यासह पक्ष सोडून काँग्रेसमध्ये दाखल झाले. त्या दोघांनाही काँग्रेसने उमेदवारी दिली. लोब हे कळंगूटचे आमदार होते, तरी बार्देश तालुक्यातील अन्य चार मतदारसंघात त्यांचा प्रभाव आहे.

२०१७ नंतर काँग्रेस सरकार घडवण्यात अपयशी ठरल्यानंतर सर्वांत आधी पक्ष सोडून भाजपमध्ये उडी घेतलेले विश्वजित राणे व त्यांच्या पत्नी दिव्या यांनी भाजप उमेदवारीवर निवडणूक लढविली. दिव्या यांच्यासाठी पर्ये हा मतदारसंघ निवडण्यात आला. विश्वजित यांचे वडील प्रतापसिंह राणे पर्येचे प्रतिनिधित्व करीत आलेले आहेत. आमदार म्हणून त्यांनी यंदा पन्नास वर्षे पूर्ण केली. त्यांनी निवडणूक लढवू नये, लढविल्यास आपण त्यांच्याविरुद्ध उभे राहू अशी धमकी विश्वजित यांनी जाहीरपणे दिली होती. त्यांनी निवडणूक लढवू नये म्हणून देवेंद्र फडवीस यांनी त्यांची भेट घेतली. राज्य सरकारने त्यांना आजीवन कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा प्रदान केला. अखेरीस गृहकलह नको म्हणून निवडणूक लढविणार नसल्याचे सांगत प्रतापसिंह राणे यांनी माघार घेतली.

भाजपचे माजी आमदार किरण कांदोळकर यांनाही त्यांच्या पत्नी कविता यांच्यासाठी उमेदवारी हवी होती. ती नाकारल्याने त्यांनी भाजप सोडून गोवा फॉरवर्ड, नंतर आपमध्ये प्रवेश केला. तिथे डाळ न शिजल्याने तृणमूलमध्ये दाखल होऊन दोघांसाठी तिकीट मिळविले.

उपमुख्यमंत्री बाबू कवळेकर यांनाही पत्नी सावित्री यांच्यासाठी भाजपचे तिकीट हवे होते. ते न मिळाल्याने त्यांनी पत्नी सावित्री यांना अपक्ष म्हणून निवडणुकीत उतरविले.

तृणमूलचे चर्चिल आलेमाव व त्यांची कन्या वालंका या पितापुत्रींची जोडी तसेच मगोपचे सुदिन व त्यांचे बंधू दीपक हे रिंगणात होते.

**काँग्रेस उमेदवारांच्या शपथा**

पक्षांतर आणि राजकीय नेत्यांची पक्षबदलू वृत्ती यामुळे गोवा देशभर बदनाम झालेला आहेच, स्थानिक लोकही या प्रकारांना विटले आहेत. त्यांची नाराजी व उमेदवारांविषयीचा अविश्वास दूर करण्याचे मोठे आव्हान विशेषतः काँग्रेसला पेलावे लागले. काँग्रेसचे निवडून आलेले आमदार पक्षांतर करून भाजपसारख्या पक्षातच जाणार असतील तर काँग्रेसला मत का द्यावे, असे मोठे नकारात्मक वातावरण काँग्रेसबाबतीत निर्माण झाले होते. त्यावर तोडगा म्हणून काँग्रेसच्या सर्व उमेदवारांनी देऊळ, चर्च व मशिदींमध्ये जाऊन निवडून आल्यानंतर पक्षांतर करणार नसल्याची शपथ घेतली. राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पक्ष सोडणार नसल्याची प्रतिज्ञा घेतली. काँग्रेसप्रमाणे आपवर पक्षबदलू नेते बाळगल्याचा आक्षेप नाही. तरी आपला प्रामाणिकपणा दाखविण्यासाठी आपनेही उमेदवारांकडून पक्षांतर न करण्यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र लिहून घेतले. पक्षाच्या या प्रयत्नांचा सकारात्मक प्रभाव निवडणूक वातावरणावर निश्चितपणे पडला. काँग्रेसने पक्षांतर केलेल्यांना पुन्हा पक्षात घेणार नसल्याचे लोकांना दिलेले वचनही पाळले. त्यामुळेही काँग्रेसबद्दलच्या अविश्वासाला ओहोटी लागून भरवशाचे वातावरण साकारले. भाजप हाच पक्षबदलूंचा पक्ष बनल्याचा विरोधाभासही वातावरणावर छाप ठेवून गेला. •••

**(लेखक गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार आहेत)**



भीमराव बनसोड

# रेल्वेभरती घोटाळा आणि परीक्षार्थींचे आंदोलन

**सरकारी नोकरी मिळवून सुखेनैव आयुष्य जगता यावं म्हणून विद्यार्थी आयुष्यातली अनेक वर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यात घालवतात. पण पेपरफुटीमुळे परीक्षा वारंवार पुढं ढकलल्या जात असल्यामुळे प्रामाणिक विद्यार्थी नैराश्यात जातो, रस्त्यावरही येतो. अलीकडेच रेल्वेभरती परीक्षेतील घोटाळ्यामुळे बिहार, उत्तर प्रदेशातील विद्यार्थ्यांनी आंदोलन करून काही रेल्वेगाड्यांना लक्ष्य केले. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणली पाहिजे. पैसे देऊन नोकरी मिळवण्याच्या प्रयत्नात लाखो लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारे मूठभर पैसेवाले आणि 'माये'पोटी त्यांना साथ देणाऱ्या घोटाळेबाज अधिकाऱ्यांना भरती यंत्रणेतून बाहेर केले, तरच हे शक्य आहे.**

रेल्वे बोर्डाच्या परीक्षांमध्ये झालेल्या धांदलीमुळे संतप्त होऊन मुख्यत: उत्तर प्रदेश व बिहार राज्यांतील परीक्षार्थींनी आपला असंतोष रेल्वे रोको आंदोलन करून व्यक्त केला. पण या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष दडपशाहीमुळे आंदोलनाला हिंसक वळण मिळाले. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे तेथील पोलिसांनी परीक्षार्थींच्या वसतिगृहात जाऊन त्यांच्या रूममधून तसेच लॉजमधून पकडून त्यांना अमानुष मारहाण केली. ही घटना प्रजासत्ताक दिनाची आहे. त्यानंतर या आंदोलकांनी बिहारमध्ये एका रेल्वेची जाळप-ोळ केली. कदाचित सरकारलासुद्धा दडपशाही करण्यासाठी अशा निमित्ताची गरज असते, याचे भान आंदोलकांनी ठेवणे आवश्यक होते. पण आंदोलनाने असे हिंसक वळण घेण्यापूर्वीच उत्तर प्रदेशच्या पोलिसांनी प्रयागराज येथे ज्या रितीने या विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केली, त्यामुळे यूपी व दिल्ली पोलिसांनी यापूर्वी जेएनयूच्या वसतिगृहात व अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या लायब्ररीत घु-सून विद्यार्थ्यांवर केलेल्या अमानुष मारहाणीची आठवण झाली. याबाबत काही विचारवंतांकडून असे म्हटले जाते, की त्यावेळी जेएनयूचे विद्यार्थी डाव्या विचारसरणीचे असल्यामुळे तसेच अलिगढ विद्यापीठातील विद्यार्थी एका विशिष्ट धर्माचे असल्यामुळे इतर समाजाने या दडपशाहीकडे दुर्लक्ष केले. पण आता तर रेल्वे बोर्डाची परीक्षा दिलेले हे विद्यार्थी सर्वच जाती-धर्मांचे आहेत. आता त्यांच्यावरसुद्धा अशा घोर दडपशाहीचा अंमल झालेला आहे.

**...तर आताचा प्रसंग टळला असता**

जेएनयू अथवा अलिगढ मुस्लिम विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर झालेल्या दडपशाहीच्या वेळी जर समाजाने त्याची योग्य दखल घेतली असती, तर कदाचित हा प्रसंग आता सर्वच जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांवर आला नसता, असे बोलले जाते. काही प्रमाणात या बाबतीत तथ्य असेल; पण हे म्हणणे पूर्णता सत्य नाही. कारण जेएनयूच्या वसतिगृहात रात्रीच्या वेळी घुसून आरएसएसच्या गुंडांनी



पोलिसांच्या मदतीने विद्यार्थी, विद्यार्थिनींना जी अमानुष मारहाण केली होती, त्याचा समाजमनावर विपरित परिणाम झाला होता. प्रातिनिधिक स्वरुपात याचे उदाहरण सांगायचे झाल्यास, अलीकडेच मरण पावलेले बॉलीवूडमधील एक सिनेनट ऋषी कपूर यांनी अशी मारहाण टीव्हीवर पाहिल्यानंतर मला रात्रभर झोप आली नाही, अशी प्रतिक्रिया दिली होती. त्याचबरोबर बॉलिवूडमधील सध्याची प्रसिद्ध अभिनेत्री दीपिका पदुकोण यांनीसुद्धा जेएनयूच्या विद्यार्थ्यांना झालेल्या मारहाणीमुळे विद्यार्थ्यांना सहानुभूती दर्शविण्यासाठी जेएनयूला भेट दिली होती. त्या तेथे प्रत्यक्षात काही बोलल्या नसल्या तरी तेथे उपस्थित राहून एक प्रकारची आपली सहानुभूती त्या विद्यार्थ्यांबाबत व्यक्त केली होती. या काही प्रातिनिधिक पण ठळक प्रतिक्रिया आहेत. त्यावेळी दीपिका पदुकोण यांच्या सिनेमावर बहिष्कार घालण्यापर्यंत जातीयवादी, धर्मांध शक्तींनी घोषणा केली होती, हेही आपल्याला विसरून चालणार नाही.

**चुकीची कारणमीमांसा**

रेल्वे बोर्डाच्या परीक्षांबद्दल हे एवढे विपरित का घडले याची कारणमीमांसा प्रसारमाध्यमातून व सोशल मीडियातूनसुद्धा झाली आहे, ती वरवरची कारणमीमांसा आहे. रेल्वे बोर्डानेही जी प्रतिक्रिया

व्यक्त केली व त्याचे जे कारण त्यांनी सांगितले, तेदेखील चुकीचेच होते.

रेल्वे भर्ती बोर्डाने नॉन-टेक्निकल पॉप्युलर कॅटेगरी (NTPC) च्या ३५,००० पदांच्या भरती परीक्षेचा (CBT-1) निकाल १४ जानेवारी रोजी जाहीर केला होता. यामध्ये ७,०५,४४६ उमेदवारांना CBT-2 साठी निवडण्यात आले होते. सात लाख उमेदवारांऐवजी सात लाख रोल नंबर निवडण्यात आल्याचे सांगत अनुत्तीर्ण उमेदवारांनी निकालाचा निषेध केला. यापूर्वी एका पदासाठी १० उमेदवार होते. आता १० पदांसाठी एक उमेदवार असल्याचा आरोप परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी केला. त्यांच्या मते, काही उमेदवारांना एकापेक्षा जास्त स्तरांवर यशस्वी घोषित करणे चुकीचे आहे.

आंदोलक विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, रेल्वे बोर्डाने अधिसूचनेत सांगितले होते, की संगणक आधारित परीक्षेचा पहिला टप्पा केवळ पात्रता परीक्षा असेल आणि संगणक आधारित परीक्षेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी २० पट अधिक पदांची निवड केली जाईल; परंतु तसे केले गेले नाही. विद्यार्थ्यांचे म्हणणे असे आहे, की रेल्वेभरती मंडळाने अधिसूचित रिक्त जागांच्या चार ते पाच वेळा परीक्षेसाठी उमेदवारांची निवड केली आहे.

**नाराजीची दखल न घेतल्याने असंतोष**

रेल्वेच्या जवळपास ३५ हजार पदांसाठी १.२५ कोटी इच्छुक उमेदवारांनी अर्ज केले होते. रेल्वेने सर्व उमेदवारांच्या अर्जांची छाननी केली. स्क्रिनिंग प्रक्रियेसाठी सामान्य परीक्षा घेण्यात आली. यालाच संगणकीय टेस्ट-१ किंवा CTBT-1 असेही म्हटले जाते. रेल्वे बोर्डाने या पदांची घोषणा जानेवारी २०१९ मध्ये करून परीक्षेची संभाव्य तारीख सप्टेंबर २०१९ दिली होती. पण ही परीक्षा पुन्हा मार्च २०२० पर्यंत लांबली. यानंतर लॉकडाऊन लागल्याने पुन्हा ती स्थगित करण्यात आली. अखेर कॉम्प्युटरबेस्ड टेस्ट-१ (CTBT-1) डिसेंबर २०२० ते जुलै २०२१ दरम्यान सात टप्प्यांमध्ये आयोजित करण्यात आली. CTBT-1 परीक्षेचा निकाल १४-१५ जानेवारी २०२२ ला घोषित करण्यात आला. यावर नाराजी म्हणून या विद्यार्थ्यांनी एक कोटी ट्विट केले होते; परंतु केंद्र सरकारने व रेल्वेभरती बोर्डाने त्याची अजिबात दखल घेतली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांतील असंतोष आणखीनच वाढला. निकाल जाहीर झाल्याच्या दहा दिवसानंतर त्यांच्यातील असंतोष वरीलप्रमाणे व्यक्त झाला. त्यामुळे एकीकडे आरआरबीच्या नॉनटेक्निकल पॉप्युलर कॅटेगरीज (NTPC) च्या ३५ हजार पदांसाठी पुढील राऊंडच्या परीक्षा अर्थात कॉम्प्युटरबेस्ड टेस्ट-२ (CTBT-2) १५ फेब्रुवारी २०२२ मध्ये आयोजित होणे अपेक्षित होते; पण रेल्वेने उमेदवारांच्या आंदोलनानंतर तूर्तास या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.

दुसरीकडे, रेल्वे मंत्रालयाकडून या विद्यार्थ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार म्हणून रेल्वे मंत्रालयाने अधिकृतरित्या नोटीस जारी केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की रेल्वे रुळांवर आंदोलन करणे, रेल्वे वाहतूक विस्कळीत करणे आणि मालमत्तेचे नुकसान करणे यांसारख्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये सामील असणाऱ्यांना रेल्वेत नोकरीवर घेण्यात येणार नाही. खरे तर, हजारो विद्यार्थी या आंदोलनात उत्स्फूर्तपणे सामील झाले होते. पण विशेष एजन्सीच्या साह्याने या आंदोलनातील व्हिडिओचा तपास केला जाणार आहे. त्यानंतर बेकायदेशीर कृत्यामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांविरोधात कारवाई केली जाईल. अशा विद्यार्थ्यांना रेल्वेत नोकरीसाठी आजीवन बंदीही घालण्यात येईल, असाही दम दिला आहे. खरे तर, असे काही घडण्यापूर्वीच रेल्वेने या परिक्षार्थींना योग्य वेळी परीक्षा घेऊन नोकऱ्या दिल्या असत्या, तर हा प्रकार कदाचित घडला नसता.

**पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांत नैराश्य**

सरकारकडून, सरकारी प्रसारमाध्यमांतून व रेल्वे मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांतील व युवकातील असंतोषाची वरीलप्रमाणे जी कारणे सांगितली जातात, ती उथळ, वरवरची व खरेतर निमित्तमात्र आहेत. पण खरे कारण असे आहे, की आपल्या देशातील बेकारीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. बरेच युवक, विद्यार्थी बँकांच्या, रेल्वेच्या, प्राध्यापकपदाच्या व इतर निरनिराळ्या परीक्षा देण्यातच अर्धेअधिक आयुष्य घालवीत असतात. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसली तरी त्यांच्या घरचे लोक आपला मुलगा नोकरीला लागेल, पुढे चालून आपले व त्याचेही भविष्य उज्ज्वल होईल या भावनेने आपल्या पोटाला चिमटा देऊन, आपल्या घरी असेल नसेल ते किडुकमिडूक विकून, त्या मुलांची परीक्षा फी, त्यासाठी लागणारी पुस्तके इत्यादी साहित्याची भरपाई करीत असतात. वारंवार होणाऱ्या मुलाखतीसाठी लागणाऱ्या प्रवास खर्चाचीही सोय करावी लागते. अशा कितीतरी परीक्षा, कितीतरी मुलाखती, कितीतरी मुलांनी

## जनता असंवेदनशील नाही

अलिगढ विद्यापीठाच्या वाचनालयातील विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष मारहाणीचासुद्धा जनमानसावर जसा परिणाम झाला होता, तसाच कोरोनाकाळात राज्यकर्त्यांनी दाखविलेली बेफिकिरी, शेतकरी आंदोलकांवर केलेली दडपशाही या सर्व बाबींचा परिणाम म्हणूनच आज यूपीमध्ये भाजपच्या आमदारांना, नेत्यांना व उमेदवारांना शहरी व ग्रामीण भागातून, त्यांच्या मतदारसंघातूनसुद्धा मोकळेपणाने आपला प्रचार करता येत नाही. त्यांच्यातल्या नामांकित पुढाऱ्यांना ज्या त्या ठिकाणावरून लोक पळवून लावतात. अशा घटनासुद्धा सध्याचे राज्यकर्ते कितीही असंवेदनशील असले तरी जनता मात्र तशी असंवेदनशील नाही, हेच दाखवून देतात. याचा अर्थ जनतेत धर्मांध भावना अजिबातच नाही, असाही कोणी याचा अर्थ घेऊ नये. आता रेल्वे बोर्डाच्या परीक्षार्थींवर झालेल्या अमानुष दडपशाहीचा, त्यांना झालेली अटक व त्यांच्यावरील गंभीर खटल्यांचाही असाच परिणाम होणार आहे. याचेसुद्धा राजकीय परिणाम सत्ताधाऱ्यांना भोगावे लागतील, अशा प्रतिक्रिया बिहारच्या विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावरून व्यक्त केल्या आहेत. विद्यार्थ्यांशी पंगा घेणे जगभरातील अनेक राज्यकर्त्यांना व आपल्या देशातील राज्यकर्त्यांनासुद्धा महागात पडलेले आहे. तीच बाब इथून पुढेही घडणार आहे, असेच त्यांच्या या प्रतिक्रियेतून सूचित होते.

दिलेल्या आहेत. बऱ्याचदा अशा परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द होऊन पुढे ढकलल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केलेली तयारी पूर्णपणे वाया जाते व त्यांना तीच तयारी पुन्हा करावी लागते; परंतु वर्षानुवर्षे अशा परीक्षा देऊनही नोकरी मात्र लागत नाही. परीक्षा पास झाली तरी नियुक्तीचे पत्र मात्र मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. अशा आपाधापितच बऱ्याच जणांचे नोकरीचे वयही उलटून जाते. त्यामुळे एकंदरच देशातील विद्यार्थी, युवकांमध्ये एक प्रकारे नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकीकडे हे जळजळीत वास्तव, तर दुसरीकडे देशातील राज्यकर्ता वर्ग व सध्या सत्तेत असलेले त्यांचे हितचिंतक भाजपसारखे पक्ष, त्या पक्षाच्या नरेंद्र मोदींसारख्या पंतप्रधानांनी २०१४ साली निवडणूक प्रचारातून, मी सत्तेत आल्यानंतर दर वर्षी दोन कोटी तरुणांना नोकऱ्या देईन असे हजारोंच्या सभेमध्ये जाहीर आश्वासन दिले होते; परंतु प्रत्यक्षात त्यांनी जाहीर केलेली नोटाबंदी, त्यानंतर कोरोनामुळे अचानक लावलेले लॉकडाऊन इत्यादी अनेक कारणांमुळे दरवर्षी कोट्यवधी तरुण बेरोजगार होत आहेत. सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे, होत्या त्यांच्याही नोकऱ्या चालल्या आहेत. अशा परिस्थितीत नवीन नोकऱ्या तर निर्माण होत नाहीत; पण जुन्यांच्या आहे त्या नोकऱ्या जात आहेत. रोजगार मिळत नसल्यामुळे तरुणांमध्ये असंतोष पसरणे साहजिक आहे. परीक्षेतील गोंधळासारखे निमित्त मिळून या असंतोषाचा स्फोट होतो. तो स्फोट या रेल्वेभरतीमध्ये झालेल्या घोटाळ्यातून उघड झाला आहे, एवढेच आपल्याला या बाबतीत म्हणता येईल.

सध्या देशातील बेरोजगारीची परिस्थिती किती बिकट आहे, हे पुढील आकडेवारीवरून दिसून येईल.

### भारतातील बेरोजगारीचे चित्र

| अ.क्र. | पाहणी कालावधी | ग्रामीण भाग | शहरी भाग |
|---|---|---|---|
| १ | १९७७-७८ | ७.७ | १०.३ |
| २ | १९८३ | ७.९ | ९.५ |
| ३ | १९७८-८८ | ५.३ | ९.४ |
| ४ | १९९३-९४ | ५.६ | ७.४ |
| ५ | १९९९-२००० | ७.२ | ७.७ |
| ६ | २००४-२००५ | ८.२८ | ८.२८ |

चौकटीतील आकडेवारी ही वर्ध्याच्या लोक महाविद्यालयात २०१८-१९ मध्ये झालेल्या अर्थशास्त्रीय सेमिनारमध्ये प्रा. प्रफुल्ल पिजाई यांनी सादर केलेली आहे. अर्थात, ही आकडेवारी १७-१८ वर्षांची जुनी असली तरी बेकारीचा वाढता ट्रेंड पाहता ती २०२२ पर्यंत कितीतरी प्रमाणात वाढली असेल याचा अंदाज येऊ शकतो. अनंत बागाईतकर यांनी ७ जून २०२१ च्या दैनिक सकाळमधील 'बेरोजगारीची लाट थोपवा' या लेखात लिहिले, की महिन्याच्या अखेरीस उपलब्ध आकडेवारीनुसार, देशातील सध्याचे बेरोजगारीचे प्रमाण १४.७ टक्क्यांवर पोहोचले आहे. बेरोजगारीचे प्रमाण दोन आकडी संख्येत जाणे ही कोणत्याही प्रकारे चांगली बाब नाहीच; एक प्रकारे ती असाधारणही मानली जाते. गेल्या वर्षी कोरोना संसर्गाला सुरुवात झाल्यानंतर देशव्यापी कडक लॉकडाऊन लागू केला होता. त्यावेळी बेरोजगारीचे प्रमाण दोन आकड्यांत पोहोचले होते. नंतर एप्रिल-२०२१ पर्यंत ते पुन्हा आठ ते नऊ टक्क्यांच्या आसपास आले; परंतु मेमध्ये बेरोजगारीने पुन्हा उसळी मारलेली दिसते. मेच्या अखेरपर्यंत हे १४.७ टक्क्यांवर गेले. ही बाब असाधारण मानावी लागेल, असा इशारा अर्थतज्ज्ञ महेश व्यास यांनी दिला आहे. या नव्या असाधारण स्थितीमधील चिंताजनक बाबीकडे निर्देश करताना त्यांनी, शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातही बेरोजगारी वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे.

### विद्यार्थ्यांनी सावध असले पाहिजे

देशात वाढत असलेली मोठ्या प्रमाणावरील बेरोजगारी हे विद्यार्थ्यांतील आणि युवकांतील असंतोषाचे खरे कारण आहे. अगदी अलीकडेच रेल्वेभरती परीक्षेत झालेला घोटाळा हे त्या विद्यार्थ्यांतील असंतोषाबाबतचे निमित्त आहे. विद्यार्थ्यांनी आपला हा असंतोष शेतकरी आंदोलनाप्रमाणे सनदशीर व शांततेच्या मार्गाने व्यक्त केला पाहिजे, असा त्यांना सल्ला दिला जातो व तो सल्ला योग्यही आहे. काही जणांनी असाही इशारा दिला आहे, की सत्ताधारी पक्ष, संघटनातील काही लोक अशा आंदोलनात घुसून अशा हिंसक घटना घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत असतात. त्यापासून या आंदोलकांनी सावध राहिले पाहिजे. कारण अशा हिंसक घटनांचे निमित्त करून सरकारला अशा आंदोलकांवर घोर दडपशाही करण्यासाठी व या दडपशाहीला उर्वरित जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी अशा हिंसक घटनांचा उपयोग होत असतो, याचेही भान आंदोलकांनी ठेवले पाहिजे.

पण शेतकरी आंदोलन हे पूर्णपणे संघटित आंदोलन होते. आंदोलक शेतकऱ्यांच्या आपापल्या राज्यात, विभागात व जिल्ह्यात लहान मोठ्या का असेना पण स्वतंत्र शेतकरी संघटना आहेत. या सर्व शेतकरी संघटनांनी मिळून आपला एक संयुक्त किसान मोर्चा बनवला. या संयुक्त मोर्चाचे नेतृत्व स्वीकारून या शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी सरकारच्या घोर दडपशाहीला पुरून उरत ३७८ दिवसांचे तीव्र आंदोलन केले. केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयसिंह टेणी व त्याच्या मुलाच्या टोळीने आंदोलकांवर जीपगाडी घालून चार शेतकऱ्यांना ठार मारले आणि या आंदोलनाला हिंसक वळण लावण्याचा प्रयत्न केला. पण तो प्रयत्न या आंदोलकांनी उधळून लावला.

शेतकरी आंदोलनाप्रमाणे विद्यार्थ्यांचे हे आंदोलन संघटितपणे नव्हते, तर ते रेल्वे बोर्डाच्या परीक्षेच्या निमित्ताने उफाळून आलेले उत्स्फूर्त आंदोलन होते आणि कोणतेही उत्स्फूर्त आंदोलन दडपून काढण्यासाठी कोणत्याही शासनाला सोपे जाते. म्हणून काही तात्कालिक निमित्ताने असे उत्स्फूर्त आंदोलन होत असले, तरी त्याच्या अनुभवाची विद्यार्थ्यांनी नोंद घेतली पाहिजे. आपल्या सध्या असलेल्या संघटनांचा संघटितपणे उपयोग करून घेऊन किंवा नव्याने अशा विद्यार्थी संघटनांची एखादी आघाडी बनवूनच आपण अशा उत्स्फूर्त आंदोलनाला संघटित स्वरूप देऊ शकतो आणि ते आंदोलन शांततेने चालवू शकतो, याची नोंद विद्यार्थ्यांनी घेतलेली बरी राहील, असे वाटते. •••

**(लेखक कामगार चळवळीतील कार्यकर्ते आहेत)**



इतना सन्नाटा क्यूं...

# थडगी बहिऱ्यांची



जयदेव डोळे

**आज सगळ्या चळवळी, हालचाली बंद आहेत. सामाजिक जाणीव तर सोडाच, पण आपण माणूसपणही विसरत चाललो आहोत. म्हणूनच तर रस्त्यावरच्या अपघातात सापडलेल्या लोकांच्या मदतीसाठी धावून जाण्याऐवजी अपघाताचं शूटिंग करून सोशल मिडियावर टाकण्यात लोकांना मोठेपणा वाटतो. मुलीची छेड काढणाऱ्याला अडवण्यापेक्षा तिथून निघून जाणं पसंद केलं जातं. 'मला काय देणं घेणं' आणि 'चलता है' प्रवृत्तीची माणसं आज बघ्याच्या भूमिकेत वावरताना दिसतात. समाजाच्या या निष्क्रिय मानसिकतेवर प्रकाश टाकणारं हे सदर वाचकांच्या सेवेत.**

इमाम साहिब रहीमचाचा कुठून तरी एकटेच येत आहेत. एका घोळक्यातही ते काठी टेकत टेकत बसंती बसंती म्हणत शिरतात. चाचा आल्यासरशी तो घोळका म्हणजे जमाव एकदम शांत होतो. घोळक्याच्या मधोमध रहीमचाचांच्या मुलाचे, म्हणजे अहमदचे, गब्बर सिंगने एका घोड्यावर टाकून ठेवलेले प्रेत जय आणि वीरू यांनी उतरून ठेवले आहे. बसंती चाचांना काही प्रतिसाद देत नाही. मग प्रेतापाशी एक गुडघा वाकवून बसलेला वीरू त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्या हाताला धरून प्रेतापाशी नेऊ लागतो. 'इतनी खामोशी क्यूं है यहां?' असा पुन्हा एक प्रश्न चाचा करतात. काठी टेकत टेकत पुढे जाताच त्यांचा पाय एका जागी ठेचकाळतो. ते चकित होऊन आधी काठीने व नंतर हातांनी चाचपडतात. तो मृतदेह त्यांच्या लाडक्या मुलाचा अहमदचा असतो. करूण अशा शहनाईचा स्वर सर्वत्र घुमतो अन् ती जीवघेणी शांतता संपते.

**बहुतेक बहिरी माणसे कमी बोलतात**

मृत्यू असाच साऱ्यांना शांत करतो. मरण म्हणजे सगळे आवाज थांबतात. छातीतल्या ठोक्यांचा, कानातल्या वाऱ्याचा, घशातल्या खाकरण्याचा, नाकातून श्वास आत जोरात खेचायचा, डोके खाजवताना फक्त खाजवणाऱ्यालाच ऐकू येणारा नखांचा, असे कितीतरी आवाज येईनासे झाले, की माणूस बहिराच होतो का? सभोवताल गप्पगप्प वाटू लागला तर आपलेच कान नादुरूस्त झाले असे समजावे काय? होते असे कधीकधी. माणूस म्हणजे एक प्रकारचे यंत्रच. त्यात कधी बिघाड होतोच. पण त्याला तो जसा जबाबदार, तसा नसेलसुद्धा. पण माणसाचे समज असे केलेत की त्याला वाटू लागते, असेल बुवा आपलीच काही गडबड! मग आपली चूक झाल्याचे वाईट वाटून घेत तो गप्प राहतो, कमी बोलतो. बहुतेक बहिरी माणसे कमी बोलतात. बोलतही नाहीत खूपदा. ऐकूच नाही येत म्हटल्यावर बोलणार काय अन् कुणाशी? परंतु 'शोले' मधला तो जमाव चिडीचूप झालेला असतो. त्यामागे एक दहशतसुद्धा होती. डाकू गब्बरने

पाठवलेला तो एक भयंकर संदेश होता. त्याने रामगढवासी थंडगार पडले होते. समोर एक थंडगार प्रेत अन् त्याच्याभोवती जमलेला थंडगार घोळका. म्हणूनच रहीमचाचा विचारतात, ‘काहो, एवढी शांतता कशाची?’ अपराधभावना माणसाला बोलू देत नसते. तसे ते रामगढवासी अपराधी होते का? अहमदच्या खुनात त्यातला कुणीच सामील नव्हता. तरीही ते गप्पगार होते. समोर मृत्यू पाहताच भल्याभल्या माणसांची बोबडी वळते. धिप्पाड व धडधाकट माणसे एखादा मुडदा पुढ्यात आला तर अचानक मूक होतात, स्तब्ध होतात. जणू त्यांच्याच हातून काही वाईट घडले!

**रस्त्यावरचे सारे लोक असतात बघे**

या अशा मूक व निमूट जमावाकडे एक अंध माणूस चालत येतो अन् त्यांनाच विचारतोय झालंय काय? अशी शांतता का? अंधाने दृष्टी असणाऱ्यांना विचारणे अन् ते सगळे बघे होऊन बसलेले! बघ्या माणूस निदान कानात कुजबूज करून तरी सांगतो, त्याने काय बघितले ते; परंतु अवघे बघे हतबल झालेले असताना कुण्या अंधाने विचारले काय, कुण्या डोळे असणाऱ्याने विचारले काय. ते गप्पच राहणार. कारण आपला काहीसुद्धा वाटा समोरच्या या दृश्यात नाही असा पुरावा त्यांना द्यायचा असतो. आम्ही तटस्थ आहोत; आम्ही निरपराध आहोत; आम्हाला काय, कसे, कुठे, का घडले ते माहीत नाही. समोर फक्त जे तुम्ही पाहत आहात, तेच आम्ही पाहत आहोत, असा त्यांचा जबाब तयारही असतो. तिथे आहोत अन् तिथे नाहीही आहोत, असा बचाव त्यांना करायचा असतो. त्यांना म्हणजे तमाम बघ्यांना.

कधी बघ्या झाला आहात तुम्ही? रस्त्यांवरचा प्रत्येक पादचारी तसा एक बघ्या असतोच. चालताना, वळताना, रस्ता ओलांडताना त्याला बघावे लागतेच. इतकेच काय, रस्त्याच्या कडेला असणारे स्थिर झालेलेही बघेच असतात. चहा टपरीवाला, पानपट्टीवाला, पेपरविक्रेता, पाणीपुरीवाला, कापड दुकानदार किंवा फुलवाला! कोणी दुकानाच्या काचेमधून रस्ता न्याहाळतो, तर कुणी गिऱ्हाईकाची वाट बघत. गप्पा मारत उभे असलेले सज्जनही बोलता बोलता इकडे तिकडे नजर फेकत असतात. त्यामुळे रस्ता म्हणा, वाहतूक म्हणा; त्यावरची प्रत्येक हालचाल कुणी ना कुणी टिपत असतो. कधी त्या टिपण्याला एखादा हेतू असतो, कधी सारे निर्हेतूक चाललेले असते. बघ्याबघ्यांतही प्रकार असतात. काही निखळ बघे. काही आमचा काही संबंध नाही असे म्हणत चालते होणारे. काही जण सारे काही नीट बघून ध्यानात ठेवून जाणारे. तसे पाहिल्यास रस्ता काही मुक्कामाची जागा नसते. मुक्कामाकडे नेणारा तो रस्ता. त्यामुळे रस्त्यांवरचे सारे लोक बघे असतात. निरीक्षण, अभ्यास वा नोंद ते करीत नाहीत.

**अळीमिळी गुपचिळी**

या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी बातम्या देणाऱ्या टीव्हीवाल्यांची फार सोय केली. संध्याकाळी प्रत्येक वाहिनी या क्लोज सर्किटवाल्या बातम्या जमवते आणि आपल्याला दाखवते. म्हणजे बघा! आधीच सगळे बघे. त्यात त्या यांत्रिक बघ्याचे बघे. कहर आहे का नाही? आणखी एक. मोबाईलमधले कॅमेरे सरसावणारे आणखी बघे तयार होत आहेत. रस्त्यावर काही घडायचा अवकाश, ही मोबाईल कॅमेरापटू मंडळी ‘त्या’ रस्त्यावर जे चालले आहे ते त्या भिंगात साठवायची धडपड सुरू करतात. तेवढेच नाही, साठवलेले ते एखाद्या गरजू अन् गब्बर वाहिनीला विकूनही टाकतात. स्वतः ही गब्बर होतात अन् नामांकितही. गर्दीतली माणसे आता काही घडले रे घडले, की मोबाईलचा कॅमेरा सुरू करून जे दिसतेय ते व्हिडिओबंद करतात अन् देतात पाठवून चॅनलला. चॅनेलमधून साऱ्यांनी पाहिल्यावर पुन्हा ‘सारं कसं शांत शांत’! दाखवून झालेय आमचे, आता संबंधितांनी त्यावर कारवाई करावी. म्हणजे पुन्हा तसेच. हे पाहणार, तेच व्हिडिओ काढणार आणि स्वतः काही तोंड उघडणार नाहीत. मग रहीमचाचा म्हणणारच ना, का बरे सारे बोलायचे बंद? आम्ही नाही त्यातले, व्हिडिओ कामाला लावले असे त्यांचे म्हणणे.

आता मूळ मुद्यावर येऊ. ‘इतना सन्नाटा क्यूं है भाई?’ हा तेव्हाचा म्हणजे



ऐन १९७५ च्या आणीबाणीत प्रदर्शित झालेल्या 'शोले'चा संवाद त्याही काळी नागरिक, पत्रकार, माध्यमे, न्यायसंस्था, विचारवंत आदी बोलक्यांनाच जणू उद्देशून म्हटलेला होता! तसा तो आज 'बोलती बंद क्यूं है भाई?' अशा हेटाळणीने तरी म्हटला तरी पुरता लागू पडेल एवढी शांतता आज पसरलेली आहे. आता ही बोलती बंद म्हणजे दातखिळ म्हणायची का? की समजून उमजून पत्करलेले मौन? किंवा अळीमिळी गुपचिळी, अशी एकमेकांना सांभाळून घेणारी ती निःशब्दता आहे?

प्रत्येक समाजात एक बोलका वर्ग असतो, असे सांगितले जायचे. प्रसिद्धीमाध्यमांना साधारणपणे त्यांच्यापासून चार हात लांब राहायला सांगितले जायचे. कारण तीच ती नावे सर्व विषयांत टपकत राहिली असती. पत्रकार तर स्वतःला मूकनायक म्हणवून घेणारे. 'व्हॉईस ऑफ द व्हॉईसलेस' अशी तारीफ स्वतःच स्वतःची करणारे. आवाज उठवला, तोंड उघडले, वाचा फोडली, शब्दांत ओतले, दुःखाला शब्द दिले, वेदनांना स्वर दिला इत्यादी अलंकारिक वर्णने करीत राहायचे. पिचलेल्यांत जायचे रहीमचाचा होऊन अन् विचारायचे इतना सन्नाटा क्यूं है? गर्दीत घुसायचा अन् विचारायचा, काय झालं? आजकाल तोही मूकप्रेक्षक होऊन बसला आहे! क्रियाशून्य अथवा निष्क्रिय बनला आहे. अबोल, शांत, अवाक्, ढिम्म!

राजकारण भाषेवर उभे असते. तिथे आधी सांगतात, मग करतात. आधी विचार, कल्पना, स्वप्ने, वचने आणि शपथा येतात. नंतर अंमलबजावणी, कृती आणि प्रत्यक्षता. साहजिकच बोलणे हा लोकशाहीचा पाया. नुसते बोलणे नव्हे, तर वाद, संवाद आणि चर्चा यांतून घडते ते राजकारण. लोकशाहीत राजकारण असते. हुकूमशाहीत त्याला स्थानच नाही. लोकशाहीत विरोधी पक्ष, प्रतिपक्ष असतो. हुकूमशाह विरोधी पक्षाचे अस्तित्वच ठेवत नाही. म्हणजे सध्या भारतात लोकशाही राज्यव्यवस्था चालवणारे राजकारण शिल्लक आहे का? संवाद नाही की चर्चा, सल्लामसलत नाही की विचारविनिमय. सारा मामला एकतर्फी, एकेरी आणि एकापुरताच. मोदी हे पंतप्रधान, मोदी म्हणजे भारत, मोदी सरकार म्हणजे भारत आणि मोदी सरकारवर टीका म्हणजे भारतावर टीका! म्हणजे राष्ट्रद्रोहच.

कुणी मांडले हे समीकरण? सांगायला कशाला पाहिजे! हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व असा सिद्धांत मानणाऱ्यांनी. राष्ट्र आणि धर्म या दोन स्वतंत्र गोष्टी असतात, हे काय त्यांना माहीत नसते? प्राचीन काळात कधी क्षत्रिय ब्राह्मणांचे ऐकायचे, तर क्षत्रियांचे ब्राह्मण. एकावे दोघांचे, करावेही दोघांचेच. भले हा न्याय आता पुनरुज्जीवित झाला आहे. त्यामुळे सोयीनुसार मौन कसे, कुठे, कुणी पाळायचे हे ते दोघे ठरवतात. कुणी बोलू लागले तर त्याला गप्प कसे करायचे, याचे डाव आखतात. त्यात सफलही होतात. चीन, रशिया, उत्तर कोरिया, म्यानमार हे देश उघडपणे लष्कर, हुकूम आणि एकाधिकार यांची एकत्रित 'शाही' आहेत. तिथे शांतता, मौन, गप्प राहणे सक्तीचे आहे.

लोकशाही भारताची २०२५ पर्यंत या साऱ्या देशांसारखीच अवस्था व्हायला निघाली आहे. ती होईपर्यंत आपण थांबायचे की काही हालचाल करायची?

## बघ्यांच्या नालायकीमुळे आले क्लोज सर्किट टीव्ही

आपल्याच नादात चालणाऱ्यांना आपण सोडून देऊ. बिचारे त्यांच्या विश्वात गर्क असतात, नाही तर गांजलेले असतात. त्यांना आपण बघे म्हणू नये. त्यांचे विचार त्यांना काही बघू देत नसतात. मनात घोळणारे शब्द ओठांवर येत नसतात. त्यांच्या डोक्यातले विश्वच त्यांना एवढे गुंगवते, की ते जिथून चालत आहेत ते जग त्यांना फक्त चालण्याची जागा वाटत राहते. बघ्या म्हणूनही त्यांचा काही उपयोग नसतो अन् ते स्वतःला बघ्या बनवायला तयारही नसतात. समजा ते रामगढात चालत चालत पोहोचले आणि त्या घोळक्याजवळून जाऊ लागले तर ते लोकांच्या पाठी बघतील. हूँ करतील आणि आपली वाट तुडवू लागतील. उद्या बातम्यात सांगतील इथे काय झाले ते, असा साळसूद विचारही ते करत असतील. आपल्याला कुणी बघू नये अन् मी काही बघू नये असा खास कातडीबचावू पवित्रा सावरत त्यांची वाटचाल चालू असते. अहमद मेला काय, रहिमचाचा एकटे पडले काय, गब्बरने असा भयंकर 'संदेसा' धाडला काय, त्यांना काही फरक पडत नसतो. अशा या निरूपयोगी बघ्यांची नालायकी पाहूनच बव्हंश देशांची सरकारे रस्तोरस्ती क्लोजसर्किट टीव्ही कॅमेरे बसवून टाकतात. काय घडले ते सांगण्यासाठी आता माणूस निकामी ठरल्याचे तमाम सरकारांनी जणू जाहीर केले आहे. हे सीसीटीव्ही कॅमेरे म्हणजे बघ्यांची टिंगल! बघ्यांची थडगी म्हटले तर चालेल? तसेच म्हणू या. थडगी तशी जमिनीवर असतात. अर्धा भाग दृश्य असतो त्याला थडगे अन् अर्धा जमिनीत गाडलेला भाग ते स्मशान. शहरात जिथे एखादी कबर अथवा थडगे उभे असते, तिथे जुन्या काळी स्मशान असणार. नाही तर आजच्यासारख्या पोलिस ठाण्यासमोर अंत्यविधी किंवा ग्रामपंचायत कार्यालयापुढे मृतदेहावर अंत्यसंस्कार असे प्रसंग त्याकाळी घडले असतील का? नसणार. स्मशान नाही म्हणून रस्त्यावर अंत्यविधी उरकायची त्या काळी काय गरज? जमिनी ढापणारे पुढारी आणि जमिनीची टंचाई या गोष्टी नसतील तेव्हा. त्यामुळे अशी चौकाचौकात तशीच सफेदी होतहोत जीर्ण झालेली थडगी तिथे स्मशान होते म्हणूनच असणार. तर हे सीसीटीव्ही आहेत हवेतली थडगी बघ्यांची, असे म्हणू या. बिचारे अहोरात्र रस्ते निरखत असतात. आता पुरे, दमला असाल असे त्यांना कुणी म्हणत नाही. घुबडाच्या स्थिर डोळ्यांसारखा एकटक रस्ता न्याहाळत असतात सारे.

चला, तोंड तरी हलवूया. म्हणजे वाजवूया. कुठेकुठे सन्नाटा निर्माण झाला आहे, त्याचा मागोवा घेत आवाज काढत राहू या.....

●●●

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत)**

**(हे सदर येथून पुढे दर महिन्याच्या दुसऱ्या अंकात प्रसिद्ध होईल.)**

# सामाजिक अन् धार्मिक विषमतेमुळे नैतिक अध:पतन



बी.जी. वाघ

**येशू ख्रिस्ताने श्रीमंतीचा व श्रीमंतांचा धिक्कार केलेला आहे, तो काही नैतिक भूमिकेतून. महात्मा गांधीजींचेही विचार तसेच होते; परंतु देशात सामाजिक व धार्मिक विषमता आहे आणि त्यामुळे देश नैतिकदृष्ट्या अध:पतीत झाला आहे, हे त्यांनी लक्षात घेतले नाही. याचे कारण विचारांपेक्षा त्यांचा श्रद्धेवर जास्त भर होता. या देशाला विकासापेक्षा धर्माचे महत्त्व जास्त वाटत आले आहे. गांधी-आंबेडकरांमध्ये धर्मासंबंधी मूलभूत वैचारिक मतभेद होते. ते 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये आले आहेत.**



सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'Annhilation of Caste' हे पुस्तक म्हणजे एक युगप्रवर्तक सामाजिक दस्तऐवज आहे. डॉ. आंबेडकर राजकीय दार्शनिक (Political Philosopher) होते. त्यांचा धर्मशास्त्रांचा गाढा अभ्यास होता. वेद-उपनिषदांवर, गीतेवर भाष्य करणारे हिंदू तत्त्वज्ञ पुष्कळ झाले; परंतु त्यांची उडी वर्णव्यवस्थेपलीकडे गेली नाही. त्यांनी परंपरा नाकारल्या नाहीत. गुरुपरंपरेतून फक्त मठ व महंत निर्माण होतात. पारंपरिक विचारधारा एकाच विचारबद्ध व्यवस्थेला जन्म देतात. त्याचा सत्याशी (Truth) काही संबंध नसतो. तो शोध असतो ईश्वराचा किंवा निराकार अशा परब्रह्माचा; परंतु त्याचा संबंध कर्मकांडांशीच असतो. तर्कविवेक, विज्ञान याला विरोध करणे म्हणजे कर्मकांड. त्याला अध्यात्माच्या पातळीवर नेले जाते. जे. कृष्णमूर्तींनी म्हटले आहे, की 'जेव्हा तुम्ही सत्याचे अनुसरण करता, तेव्हा तुम्ही दुसऱ्या कोणाचेही अनुसरण करू शकत नाही. सत्य आणि ईश्वर या संकल्पना समानार्थी नाहीत.' महात्मा गांधींनी म्हटले होते, की 'जेव्हा सत्य आणि ईश्वर यांच्यात संघर्ष होईल, तेव्हा मी सत्याच्याच बाजूने उभा राहीन.'

**धर्म गतिमान असले पाहिजेत**

**Knowing others is wisdom, knowing the self is enlightenment. -Tao Te Ching**

हा अध्यात्माचा पाया आहे. तो सर्व धर्मांना लागू आहे. म्हणून धर्म अनेक असतील; परंतु अध्यात्म एकच असते, असे म्हटले जाते. अध्यात्माचा मार्ग हृदयातून जातो. प्रेम हे त्याचे मूलतत्त्व आहे. एखादा धर्म चांगला किंवा वाईट हे कसे ठरवायचे? त्याचा मार्ग हृदयातून जात असेल तरच तो चांगला धर्म. हिंदू धर्माची मीमांसा करताना डॉ. आंबेडकरांनी सत्य, ज्ञान, सद्सद्विवेकाबरोबर समाजाच्या व राष्ट्राच्या हिताचाही विचार केला आहे. गांधीजींच्या सत्याच्या प्रयोगांत अंत:स्फूर्तीला आणि श्रद्धेलाच जास्त महत्त्व आहे. त्यांचा आतला आवाज महत्त्वाचा आहे; परंतु तो नेहमी बरोबरच असेल, असे नाही. तर्क आणि विवेकाने ते तपासून घेणे आवश्यक असते. ते अंत:प्रेरणांचा कौल प्रमाण मानतात आणि त्यालाच त्या वेळेपुरते सत्य मानतात. त्यामुळे त्यांच्या विचारांत पुष्कळदा सुसंगती दिसत नाही. त्यामुळे धर्माची चिकित्सा करताना ते सत्यापेक्षा श्रद्धेवर जास्त भर देतात. साहजिकच गांधी-आंबेडकरांच्या विचारपद्धतीत मूलगामी असा फरक आहे. डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे, की 'विचार काळाप्रमाणे व अनुभवांप्रमाणे बदलले पाहिजेत. कारण सातत्य हा गाढवाचा गुण असतो.' गांधीदेखील निरंतर बदलत आले आहेत; परंतु काही सामाजिक, धार्मिक वा राजकीय कारणांमुळे

हिंदू धर्माची चिकित्सा करताना त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या नेमकी विरोधी भूमिका घेतली आहे. त्यामुळे हिंदू समाजाचे व राष्ट्राचेही नुकसान झाले आहे. सत्य हे निरंतर प्रवाही असले पाहिजे, असे बुद्ध मानतो. सत्य म्हणजे काही साचलेले डबके नव्हे, तो एक गतिमान प्रवाह आहे. धर्मदेखील गतिमान असले पाहिजेत. डॉ. आंबेडकरांची हीच भूमिका होती. बुद्धाची ज्ञानाची व सत्याची संकल्पना नेमकी वैदिकांच्या विरोधी होती. बुद्धाचे ज्ञान हे अनुभव, तर्क, विवेक व विज्ञानावर आधारित होते. बुद्धाने असे काहीही सांगितले नाही, जे विज्ञानाच्या विरोधी आहे. निसर्ग आणि विज्ञान एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. निसर्गात विज्ञानाशिवाय काहीही नाही. विज्ञानाचे अध्यात्म म्हणजेच बौद्ध धर्म आहे.

**भारताचा इतिहास पराभवाचा**

वैदिकांच्या सत्य व ज्ञान या संकल्पना काल्पनिक गृहीतकावर उभ्या होत्या. त्यामुळेच बुद्ध आणि वैदिकांत संघर्ष झाला. डॉ. बाबासाहेबांची भूमिका बुद्धाप्रमाणेच विज्ञाननिष्ठ होती. त्यामुळे त्यांनी केलेली धर्मचिकित्सा आजही ज्वालाग्राही वाटते. प्रत्यक्षात ती अत्यंत तर्कनिष्ठ, समाजहिताची, सुसंवादी व सौम्य आहे. डॉ. आंबेडकर बंडखोर होते; परंतु त्यांच्या बंडखोरीने विवेकावर कधीही मात केली नाही. बुद्धाने म्हटले, 'जे सत्य आहे त्याला सत्य माना, जे असत्य आहे त्याला असत्य.' परंतु त्यासाठी प्रज्ञेचा विकास व्हावा लागतो. व्यक्तीच नव्हे, तर समाजही प्रज्ञाशील असावा लागतो. डॉ. आंबेडकरांनी त्यासाठी आग्रह धरला होता. प्रज्ञेचा अर्थ आहे सत्याला जाणण्याची माणसाची बौद्धिक क्षमता. तिचा निरंतर विकास व्हावा लागतो. भारतीय वर्णव्यवस्थेने माणसाची नैतिक व बौद्धिक प्रगती होऊ दिली नाही. त्यामुळे भारताचा इतिहास हा पराभवाचा इतिहास ठरला. समाज गतिमंद आणि मतिमंद झाला. समाजातील बहुसंख्य वर्गांचे अभिव्यक्ती, विचार व बुद्धीचे स्वातंत्र्य हिरावले गेले. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सामाजिक न्याय याऐवजी वर्णव्यवस्थेच्या पायावर समाजाची निर्मिती झाली. त्यामुळे उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याच समाजबांधवांना, शूद्रांना कधी समतेने वा ममतेने वागवले नाही. त्यामुळे समाज शतखंडित झाला व राष्ट्र पारतंत्र्यात ढकलले गेले.

डॉ. आंबेडकरांनी या समाजव्यवस्थेची, धर्माची, धार्मिक मूल्यांची सखोल समीक्षा केली आहे. टॉलस्टॉयने गांधीजींना आपल्या पत्रात लिहिले की, 'ब्रिटिशांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केले आणि असंख्य अत्याचार केले. कारण भारताची परंपराही अत्याचार सहन करण्याची व इतरांवर (दुर्बलांवर) अत्याचार करण्याचीच आहे. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांना फारसा विरोध केला नाही.' गांधीजी त्यामुळे अंतर्मुख झाले. भारतातल्या सवर्ण हिंदूंनी येथील अस्पृश्यांवर अनन्वित अत्याचार केल्याचे त्यांना माहीत होते. तरीही त्यांना डॉ. आंबेडकरांची भूमिका का मान्य नव्हती, हे समजून घ्यावे लागेल. गांधीजींचा आधुनिक ज्ञानविज्ञान व तत्त्वज्ञानाचा अभ्यास नव्हता. एक गीता वाचल्यानंतर दुसरा ग्रंथ वाचण्याची मला आवश्यकता भासली नाही, असे त्यांनी म्हटले आहे. ते कर्मयोगी होते. त्यांचा कर्मवाद त्या गीतेतून आला होता, जी वर्णाश्रमधर्माचे समर्थन करते. त्यामुळे त्यांच्या विचारांत विसंगती असली, तरी ते अप्रामाणिक होते, असे म्हणता येणार नाही.

## वर्णव्यवस्थेला सनातन म्हणणे, गांधीजींची गंभीर चूक

गांधीजींनी सन १९२१ मध्ये 'नवजीवन'मध्ये लिहिले की, 'I belive that if Hindu society has been able to stand, it is because it is founded on the caste system. To destroy the caste system and adopt the Western European social system means that, Hindus must give up the principle of hereditary occupation which is the soul of caste system. Hereditary principle is an eternal principle. To change it is to create disorder. I have no use for Brahmin if I can not call him Brahmin for my life. It will be chaos if everyday a Brahmin's is changed in Shudra's and Shudra is to be changed into a Brahmin.'

गांधीजींचे हे वक्तव्य वर्णाश्रमधर्माच्या प्रेमातून आले होते. त्यांनी असेही म्हटले होते, की 'हिंदू संस्कृतीचे फूल म्हणजे ब्राह्मण आहे आणि मी त्याला कोमेजू देणार नाही.' गांधीजींच्या या भूमिकेवरून डॉ. आंबेडकरांचा लढा किती जीवघेणा होता, हे आपल्या लक्षात येते. गांधीजी ज्या कायद्याला सनातन (Eternal law) म्हणतात, तो फक्त हिंदूंपुरताच मर्यादित आहे. जगात कोठेही जन्मजात जातीयता नाही. शाश्वत कायदा पुन्हा निसर्गाचाच असतो व तो वैश्विक असतो. म्हणजेच तो साऱ्या मानवजातीला लागू असतो. मानवी कायदे (धर्मदेखील) कधीही शाश्वत नसतात. कारण ते मानवनिर्मित असतात. त्यामुळे वर्णव्यवस्थेला 'सनातन' म्हणणे ही गांधीजींची गंभीर चूक होती. सद्सद्विवेक असलेला माणूस या व्यवस्थेला कधीही मान्यता देणार नाही. बहुसंख्य हिंदूंना जी व्यवस्था अपमानित करते, त्यांना समान संधी, शिक्षण नाकारते व उलट त्यांच्यावर अत्याचार करते, तिला न्याय्य म्हणता येणार नाही. हिंदू धर्मात केवळ जन्म घेतल्यामुळे त्याला किंवा तिला निरंतर शिक्षा देणेच आहे. भारतात वर्णव्यवस्थेप्रमाणे केवळ दोनच जाती होत्या. एक ब्राह्मण आणि दुसरी शूद्र. क्षत्रियांना परशुरामाने त्यांच्या वंशासकट नष्ट केले होते. तिसरी अतिशूद्र म्हणजे माणसे नव्हतीच. जनावरांना जेवढे हक्क होते, तेवढेही त्यांना नव्हते. या व्यवस्थेने भारतात आजही हजारो प्रश्न निर्माण केलेले आहेत.

**भारताच्या व्यवस्थेत प्रचंड असमतोल**

ारताइतकी धार्मिक, सामाजिक विषमता जगात कोठेही नाही. त्यासंबंधी निरनिराळे अहवाल दरवर्षी प्रकाशित होतात. मानवाधिकारांचे सर्वांत जास्त उल्लंघन भारतातच होते. भूक निर्देशांकात, सुखी देशांच्या यादीत, धार्मिक स्वातंत्र्य असलेल्या देशांच्या यादीत भारताचा नंबर तळाशी लागतो. धर्मच या समस्येचे मूळ आहे. भारताच्या प्रशासकीय, राजकीय व आर्थिक व्यवस्थेत प्रचंड असमतोल आहे आणि या व्यवस्थेविरुद्ध सामान्य जनता बंड करीत नाही, यालाही कारण येथील जातिव्यवस्थाच आहे. सर्व सत्ता ब्राह्मण आणि वैश्य या दोन वर्गांतच केंद्रित झाली आहे. भारताच्या

शंभर श्रीमंत व्यापाऱ्यांकडे देशातील साठ टक्के संपत्ती केंद्रित झाली आहे. भारताचे धार्मिक धोरणही हेच लोक ठरवतात. उच्च व सर्वोच्च नोकऱ्यांतील ब्राह्मणांचे प्रमाण ७० टक्के आहे. टेलिव्हिजन, वृत्तपत्रे, सर्व प्रकारची चॅनल्स, प्रसिद्धीमाध्यमे यांतील ८० टक्के लोक ब्राह्मण-बनियाच आहेत. इंग्रजी प्रेस पूर्णपणे ब्राह्मणांच्या ताब्यात आहेत-तिचे मालक मात्र शेठजी आहेत-ज्या उद्योगसमूहांत कुठलेही आरक्षण नाही. तरीदेखील दलित-वंचितांच्या आरक्षणाविरोधात हेच लोक तक्रार करतात. न्यायव्यवस्थेत एससी/एसटी/ओबीसी यांचे प्रमाण एक टक्कादेखील नाही. याच लोकांविरुद्ध न्यायव्यवस्था सातत्याने विरोधी भूमिका घेत असते. सुप्रीम कोर्ट शासनाला विचारते, 'आरक्षण कुठपर्यंत?' आणि याच न्यायव्यवस्थेत ब्राह्मण नव्वद टक्के आहेत, याबाबत कोर्ट कुठलाही विचार करीत नाही. एकदा के.आर. नारायणन् या दलित राष्ट्रपतीने न्यायालयीन आरक्षणाबाबत वक्तव्य केल्याबद्दल सर्व वृत्तपत्रांनी (इंग्रजी/स्थानिक), चॅनलसनी राष्ट्रपतींची यथेच्छ बदनामी केली. सुप्रीम कोर्टातील एका प्रसिद्ध वकिलाने म्हटले, 'Any reservation in judiciary is a threat to independance and the rule of law.' हा दांभिकपणाही वर्णव्यवस्थेतूनच येतो. ज्याला हे लोक 'मेरिट' म्हणतात, तो वर्णव्यवस्थेतून आलेला अहंकारच आहे. आयआयटीमधील एका प्राध्यापक महिलेने अनुसूचित जाती-जमातीच्या मुलांचा अपमान केला व जातीविषयक अपशब्द उच्चारले म्हणून नुकतेच तिला निलंबित करण्यात आले आहे. उच्चवर्णियांचा जातिवाद शिक्षणामुळे कमी न होता तो वाढला आहे. याचे कारण ते जातीपासून मुक्त झाले नाहीत. 'मेरिट' हे कधीही जन्मावर अवलंबून नसते. ते संधी, शिक्षण आणि समतावादी शिक्षणपद्धती यावर अवलंबून असते. त्यामुळे 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट' हे पुस्तक पुन्हा मुळापासून अभ्यासण्याची गरज आहे. जातिव्यवस्थेमुळे उच्चवर्णीय हिंदूंची न्यायबुद्धीच नष्ट झालेली आहे, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

गांधीजींनी म्हटले होते, 'Caste is another name of control. Caste puts a limit on enjoyment. Caste does not allow a person to transgress caste limits in persuit of his enjoyment. That is meaning of such caste restricts as interdining and intermarriages. These being my views I oppose to all those who are out to destroy the caste system.'

गांधीजींसारख्या असामान्य आणि प्रतिभावंत नेत्याची ही भूमिका डॉ. आंबेडकरांना चीड आणण्यासारखीच होती. नेहरूंना या प्रश्नात लक्ष घालायला वेळ नव्हता. राजेंद्रप्रसाद, पटेलांसारखे नेते तर कर्मठ हिंदूच होते. गांधीजींनी पुढे आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. त्यांनी स्वतःच्या मुलाचे लग्न एका ब्राह्मण मुलीशी लावले. त्यांच्यातील हे बदल फार कूर्मगतीने झाले. तेदेखील डॉ. आंबेडकरांशी त्यांचा संघर्ष झाल्यामुळेच.

**रामराज्य, ग्रामस्वराज्य अन्यायाचे उदात्तीकरण करणाऱ्या कल्पना**

गांधी-आंबेडकरांच्या या संघर्षामुळेच पुढे काँग्रेस सामाजिकदृष्ट्या थोडी गतिशील झाली. घटना समितीतही त्याचे पडसाद उमटत राहिले. पुढे हिंदू कोड बिलाच्या वेळेस गांधीजी



## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना

ब्रिटिश कुठल्याही प्रकारची अस्पृश्यता, भेदभाव पाळत नव्हते. हिंदू राजे मात्र वर्णाश्रमधर्माचे कठोर पालन करीत. शिक्षणाचाही प्रसार होत होता. स्वामी अच्युतानंद हरिहर, बाबू मंगुराम अशी काही महत्त्वाची नावे होती. महाराष्ट्रातही किसन फागुजी बनसोडेंसारखे दलित नेते समाजात जागृती करीत होते. त्यांत डॉ. बाबासाहेबांचे वडील रामजी सुभेदारही होते. बाबू मंगुराम यांनी आदिधर्माची चळवळ सुरू केली. आपण हिंदू किंवा शीख नसल्याची घोषणा त्यांनी केली. पुढे ते बाबासाहेबांचे सहकारी झाले. पुणे कराराच्या वेळी त्यांनी डॉ. आंबेडकरांना जाहीर पाठिंबा दिला. दक्षिणेकडेही आदिद्रविड चळवळ जोरात सुरू होती. त्याचे नेतृत्व पेरियार किंवा रामासामी नायकर यांच्याकडे होते. काँग्रेसचे सर्व लक्ष मात्र हिंदू-मुस्लिम ऐक्याकडे होते. त्याशिवाय स्वातंत्र्य मिळणे शक्य नव्हते. १९०९ साली मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाला. त्यामुळे त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा वाढत गेल्या. तरी मुस्लिम आणि अस्पृश्य यांचे प्रतिनिधित्व काँग्रेसच करते, असा हट्ट गांधीजींनी धरला. सवर्ण हिंदू हे मुस्लिम आणि अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व कसे करू शकतात, असे डॉ. आंबेडकरांनी विचारले होते. काँग्रेसने खिलाफत चळवळीला पाठिंबा देऊन हिंदू अतिरेक्यांना जागृत केले व मुस्लीम पुरोगाम्यांना एकाकी पाडले, असा आरोप त्या वेळी होत होता. याच काळात हिंदू अतिरेक्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांनी हिटलर व मुसोलिनीकडून प्रेरणा घेतली होती. संघाचे गोळवलकर यांनी 'Our Nationhood Defined' या पुस्तकात लिहिले आहे की, "To keep up the purity of the nation and its culture, Germany shocked the world by her purging the country of Semitic races – the Jews. National pride at its highest has been manifested here. Germany has also shown how well-nigh impossible it is for races and cultures, having differences going to the root, to be assimilated into one united whole, a good lesson for us in Hindustan to learn and profit by"

या विचारसरणीचे मूळ शुद्ध आर्यवंशाच्या भ्रामक श्रेष्ठत्वात आहे. प्रत्यक्षात असा कुठलाही आर्यवंश नाही. ते एक 'मिथ' आहे. आपण यापूर्वी त्याची चर्चा केली आहे. एकोणिसाव्या शतकात मॅक्सम्युलरने त्याचा प्रथम वापर केला आहे. त्यामागील तत्त्वज्ञान नित्शेचे आहे. आपण ते 'मनुस्मृती'तून घेतले आहे, असे त्याने म्हटले आहे.


हयात नव्हते. राजकीय दबावामुळे नेहरूंना निर्णय घेता येत नव्हता. राजेंद्रप्रसादांनी आपली हिंदुत्ववादी भूमिका स्पष्ट केली. त्यावेळी डॉ. आंबेडकर उद्विग्नतेने म्हणाले,

'To leave inequality between class and class, between sex and sex, which is the soul of Hindu society, and to go on passing legislation relating to economic problems is to make a farce of our constitution and to build a palace on a dungheap.' 'आपण समाजातील विषमता कायम ठेवून घटनेची अंमलबजावणी करणे म्हणजे शेणाच्या ढिगावर इमारत बांधण्यासारखे आहे. ती घटनेची थट्टा आहे.' डॉ. आंबेडकरांच्या विचारांत आणि कृतीत सुरुवातीपासून आश्चर्यकारक सुसंगती, तर्कविवेकशुद्धता होती. तिचा सामना करणे काँग्रेसला शक्य नव्हते. गांधीजींसारख्या धुरंधर नेत्यालाही ते शक्य झाले नाही. गांधीजींची रामराज्याची व ग्रामस्वराज्याची कल्पना जातिव्यवस्थेला बळकट करणारीच होती. ते त्यांचे एक स्वप्न (Utopia) होते; परंतु या दोन्ही संस्था संस्थात्मक अन्यायाचे उदात्तीकरण करणाऱ्या होत्या. डॉ. आंबेडकरांनी साहजिकच त्यांना विरोध केला.

दलितांचा प्रश्न काँग्रेसच्या एकूण राजकारणामध्ये त्यांना महत्त्वाचा वाटत नव्हता. बहुसंख्य सवर्ण हिंदू समाज गांधी-नेहरूंच्या काँग्रेससोबत होता. सामाजिक सुधारणांची आवश्यकता आता कोणाला वाटत नव्हती. पुणे करारानंतर डॉ. आंबेडकर राजकीयदृष्ट्या वाढणार नाहीत, याची काळजी मात्र ते घेत होते. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली होती. त्याचे राजकीय परिणाम मात्र काँग्रेसला धोकादायक ठरणार होते. १८८१ ते १९४१ या कालावधीत धर्मांतरांमुळे हिंदू लोकसंख्येचा समतोल बिघडलेला होता. सापेक्षतेने इस्लाम, शीख, ख्रिश्चन यांची लोकसंख्या वाढलेली दिसत होती. अस्पृश्य मोठ्या प्रमाणात धर्मांतर करण्याची शक्यता होती. मोठ्या प्रमाणात सवर्ण हिंदू शीख धर्मात प्रवेश करू इच्छित होते. त्यांना सनातन धर्मात (वेदोक्त) ठेवण्यासाठीच आर्य समाजाची निर्मिती झाली होती. जातपात तोडक मंडळ आर्य समाजाशी निगडित होते. आर्य समाज अस्पृश्यता मानत नव्हते; परंतु वर्णव्यवस्था मानत होते. शुद्धी चळवळींचा (स्वामी श्रद्धानंद) हेतूदेखील राजकीयच होता. त्यामुळे अस्पृश्यांतून काही समाजसुधारक पुढे आले. त्याचे श्रेय ब्रिटिश राजवटीला जाते.

### प्रत्येक गोष्टीत धर्म आणल्याने दांभिकता वाढते

हिटलरने हिंदूंना आर्यवंशीय न मानता 'कनिष्ठ प्रतीचे गुलाम लोक' असे म्हटले आहे. हिंदूंवर राज्य करण्याची त्याची मनीषा होती. 'आर्य' या मिथचा वापर धूर्त लोकांनी वंशवादाचे समर्थन करण्यासाठी केला आहे. गांधीजींनीही दक्षिण आफ्रिकेत असताना, वंशवादाचे समर्थन करणारी काही विधाने केली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील तरुणांमध्ये मागील काही दशकांत गांधीजींविषयी असंतोष निर्माण झाला होता. त्याची सविस्तर चर्चा अरुंधती रॉय यांच्या 'The doctor and the saint' या प्रदीर्घ लेखात आलेली आहे. कारण गांधीजी साम्राज्यवादी ब्रिटिशांना दुखावू इच्छित नव्हते. बऱ्याच उच्चवर्णीय हिंदूंना ब्रिटिश आपलेच वाटत होते. वंश, वर्ग आणि जात या कल्पना समान अर्थाने हिंदू धर्मात खोलवर रुजलेल्या आहेत.



ख्रिश्चन धर्माप्रमाणे गांधीजींनी दारिद्र्याचेही आध्यात्मिकीकरण केले आहे. 'जो गरीब आहे तोच ईश्वराजवळ आहे किंवा अस्पृश्य हेच हरिजन आहेत.' 'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले' ही संतत्वाची भूमिका त्यामागे आहे. डॉ. आंबेडकरांना समाजकारणात आणि राजकारणात अशी भूमिका घेणे अत्यंत दांभिकपणाचे वाटत होते. गांधीजींनी पाश्चात्त्य संस्कृतीचा, विज्ञानाचा, यांत्रिकीकरणाचा धिक्कार केला आहे. गांधीजींनी म्हटले आहे, 'आम्हाला तंत्रविज्ञान माहीत नव्हते, असे नाही; परंतु अशा तंत्रविज्ञानामुळे आम्ही गुलाम होऊ आणि आमच्यातील नैतिक बंध कमजोर होतील, हे आमच्या पूर्वजांना माहीत होते.' तंत्रविज्ञानामुळे माणूस गुलाम होतो व समाजातील नैतिक बंध कमजोर होतात, हे म्हणणे म्हणजे आम्ही नैतिकदृष्ट्या कमजोर होतो, असे म्हणण्यासारखेच आहे. हजारो वर्षे आम्ही लाकडी नांगर वापरला, ही काही अभिमानाची गोष्ट नाही; परंतु प्रत्येक गोष्टीत धर्म व अध्यात्म आणल्यामुळे आपला नैतिक विकास तर होत नाहीच, उलट दांभिकता वाढते. गांधीजी संस्कृतीचे स्पष्टीकरण करताना लिहितात, "Now you see what I consider to be real civilisation those who want to change conditions such as I have described are enemies of the country and are sinners."

गांधीजींचे हे विचार निश्चितच देशहिताच्या विरोधी होते. कारण हा देश हजारो वर्षे अज्ञान, अंधश्रद्धा आणि राजकीय, सामाजिक व मानसिक गुलामगिरीत खितपत पडला होता. त्याला बदलणे आवश्यकच होते. गांधीविचारात अशा असंख्य विसंगती होत्या. त्यांनी जमीनदार व भांडवलदारांची बाजू वारंवार घेतलेली दिसते. शेतकऱ्यांनी जमीनदारास खंड दिला पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला होता. गांधीजींची ट्रस्टीशिपची कल्पना मूळ ॲन्ड्रू कार्नेजी (The Gospel of wealth) या उद्योगपतीची आहे. त्यामागे श्रीमंतांनी आपली श्रीमंती जनकल्याणासाठी वापरावी, असा विचार आहे. येशू ख्रिस्ताने श्रीमंतीचा व श्रीमंतांचा धिक्कार केलेला आहे, तो काही नैतिक भूमिकेतून. गांधीजींचे विचारही तसेच होते; परंतु देशात सामाजिक व धार्मिक विषमता आहे व त्यामुळे देश नैतिकदृष्ट्या अध:पतीत झाला आहे, हे त्यांनी लक्षात घेतले नाही. याचे कारण

विचारांपेक्षा (Rationality) त्यांचा श्रद्धेवर (Faith) जास्त भर होता. या देशाला विकासापेक्षा धर्माचे महत्त्व जास्त वाटत आले आहे. गांधी-आंबेडकरांमध्ये धर्मासंबंधी मूलभूत वैचारिक मतभेद होते. ते 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये आले आहेत. ते समजल्याशिवाय गांधी आणि आंबेडकर कळणार नाहीत. गांधीजींचे भंगीप्रेमदेखील वर्णाश्रमधर्माच्या प्रेमातूनच आले आहे. भंग्यांनी आपला व्यवसाय कोणत्याही परिस्थितीत सोडू नये, ते पाप आहे, असे त्यांनी वारंवार म्हटले आहे. भंग्यांच्या संपाला त्यांनी विरोध केला; परंतु त्यांच्या सेवाशर्तींमध्ये सुधारणा होऊन त्यांनी सुखी जगावे म्हणून प्रयत्न केले नाहीत. ते भंगी वस्तीत राहत; परंतु त्यांच्यासाठी सज्ज कुटीर उभारण्यात येत असे. नवीन रस्ते तयार केले जात. भंग्यांना हलवले जात असे. त्यांनी भंग्यांबरोबर जेवणास नकार दिल्याचीही नोंद आहे. (वाल्मीकी कामगारांचा इतिहास : विजय प्रसाद) वायकोम सत्याग्रहाप्रसंगी महात्मा गांधीजींची मध्यस्थी निष्फळ ठरली व त्यांनी अस्पृश्यांना (हरिजनांना) माघार घेण्यास सांगितले; परंतु त्यांनी माघार घेतली नाही. बारा वर्षे तो सत्याग्रह चालला. शेवटी त्रावणकोरच्या महाराजांनी मंदिर प्रवेशाचा आदेश काढला. त्याप्रसंगीचे सी. राजगोपालाचारी यांचे भाषण उपलब्ध आहे. त्यावरून तत्कालीन सवर्ण मानसिकता दिसते. ते भाषण २७ मे १९२८ चे आहे :

'Let not the people of Viakom feel that Mahatma wants caste abolished but holds that untouchability should be abolished. Mahatmaji does not want you to dine with Thiyas or Pulayas (untoucheble caste). What he wants is that we must be prepared to touch or go near to them as you near a cow or horse. Mahatmaji wants you to look upon so called untouchebles as you do at the cow and the dog and other harmless creatures.'

गांधीजींनी गायी आणि अस्पृश्यांना सारखेच मानले. दया व धर्मास पात्र; परंतु माणूस म्हणून त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वास ते समजू शकले नव्हते. वायकोम सत्याग्रह गांधीजींच्या पाठिंब्याविना यशस्वी झाला. त्याचे नेतृत्व जॉर्ज जोसेफ नावाच्या माणसाने केले. गांधीजींनी त्यांनाही 'हिंदूंच्या प्रश्नात पडू नका', असे सांगितले होते. गांधीजींनी हरिजनांच्या सत्याग्रहाला दुराग्रह म्हटले. भंग्यांच्या संपाला पाप. काँग्रेसची भूमिका कर्मठ हिंदूंच्या बाजूने होती. याचे एक कारण राजकीय चळवळींसाठी ते आघाडीवर होते. कम्युनिस्टांना जातीचा प्रश्न कधी कळला नाही. त्यांनीही डॉ. आंबेडकरांना विरोध केला. महात्मा गांधींनी मिठाचा सत्याग्रह केला; परंतु पाण्यासाठी सत्याग्रह करणारे डॉ. आंबेडकरच होते. गांधीजींनी राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये 'मीच हरिजनांचा प्रतिनिधी' अशी जी भूमिका घेतली होती, ती केवळ डॉ. आंबेडकरांवरच अन्याय करणारी नव्हती, तर सर्व अस्पृश्य जातींचाही अपमान करणारी होती. डॉ. आंबेडकरांनी आपल्या बुद्धिवैभवाने गांधीजींची सर्व शस्त्रे परतवून लावली; परंतु गांधीजींचे शेवटचे शस्त्र होते उपोषणाचे. डॉ. आंबेडकर यांच्याविरुद्ध काँग्रेस, सर्व सवर्ण हिंदू समाज व महात्मा गांधी होते. तो संघर्ष भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व होता. डॉ. आंबेडकरांनी त्यानंतर बऱ्याच वर्षांनी लिहिले :



'There was nothing noble in the fast. It was a foul and filthy act. It was the worst form of coercion against a helpless people to give up the constitutional safeguards of which they had become possessed under the Prime Minister's Award and agree to live on the mercy of the Hindus. It was a vile and wicked act. How can the Untouchables regard such a man as honest and sincere?'

गांधीजींचे पुणे करारातील हे उपोषण नैतिकदृष्ट्या त्यांना शोभा देणारे नव्हते. भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच अस्पृश्यांना काही घटनात्मक अधिकार मिळाले होते, तेही डॉ. आंबेडकरांना सोडून द्यावे लागले. ते अधिकार कायम स्वरूपाचे नव्हते हे जरी खरे असले, तरी ख्रिश्चन, मुस्लिम आदी सक्षम वर्गाला राजकीय आरक्षण दिलेलेच होते. गांधीजींनी अस्पृश्यांच्या या राजकीय मान्यतेला प्राणपणाने विरोध केला. याचे कारण ते घटनात्मक अधिकार वर्णाश्रमधर्माच्या विरोधी होते. गांधीजींनी 'हरिजन' वृत्तपत्र काढले. हरिजन सेवा संघ काढला; परंतु ते सर्व हरिजनांना वर्णव्यवस्थेशी बांधून ठेवण्यासाठीच होते. मंदिर प्रवेशाची चळवळ हीदेखील अस्पृश्यांची फसवणूकच होती. आजही अनेक राज्यांमध्ये अस्पृश्यांनी मंदिरात प्रवेश केला म्हणून त्यांचा छळ केला जातो. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचा हिंदू धर्मावरून व हिंदू मानसिकतेवरून जो विश्वास उडाला तो कायमचाच. त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. गांधीजी म्हणाले, 'अस्पृश्यांची बौद्धिक पात्रता गायीपेक्षा जास्त नाही. त्यांना इस्लाम, ख्रिश्चन व गुरू नानक यांच्यातील फरक कळणार नाही.' गांधीजी अस्वस्थ झाले. त्यांच्यात काही मूलभूत बदलांची शक्यता निर्माण झाली. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अस्पृश्य वर्गाच्या संमतीची गरज होती. डॉ. आंबेडकर भारतीय स्वातंत्र्यासाठी अपरिहार्य घटक झाले होते. त्यांचे राजकीय, सामाजिक व आंतरराष्ट्रीय वजन वाढले होते. त्यांनी 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये धर्माविषयी मूलभूत चिंतन केले आहे. त्यामध्ये त्यांची निखळ राष्ट्रभक्ती व द्रष्टेपण सामावलेले आहे. जे लोक धर्मावर राष्ट्राची उभारणी करू पाहतात, ते धर्म आणि राष्ट्राचे नैतिक अध:पतन घडवतात. त्यांचा सत्य-असत्याचा विवेक इतका क्षीण झालेला असतो की, ते असत्यालाच सत्य आणि अधर्मालाच धर्म मानून समाजाची वा राष्ट्राची पुनर्उभारणी करू पाहतात. ज्यांना सत्याची चाड आहे आणि राष्ट्राची काळजी आहे, ते या अभद्र युतीला विरोध करतातच. डॉ. आंबेडकरांनी तो प्राणपणाने केला. त्यामुळेच त्यांना आधुनिक भारताचे निर्माते म्हणतात. •••

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**

## माहिती, ज्ञान आणि मनोरंजन

# मराठी संस्कृती



**देशातील ३० प्रांतांपैकी २५ प्रांतांत माझी भ्रमंती झालेली आहे. मराठी माणसाच्या स्वभावाची बरीच वैशिष्ट्ये सांगता येतात. इतर कोणत्याही प्राण्यांपेक्षा तो खूप स्वाभिमानी आहे, इतर कोणाहीपेक्षा तो बऱ्यापैकी श्रीमंत आहे. मध्यमवर्गीयांची संख्या सर्वात जास्त येथे आहे, नागरी जाणीव येथे सर्वात जास्त आहे. सर्व ठीक आहे, पण महाराष्ट्रीयन संस्कृती अशी काही आहे काय? खानपान, वेशभूषा, केशभूषा वगैरे या दृष्टीने इतर प्रांतांची काही वैशिष्ट्ये आहेत, महाराष्ट्राची कोणती आहेत?**



**प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे**

साठ वर्षांपूर्वी अलाहाबाद येथे हिंदी एम.ए. करण्यासाठी म्हणून मी गेलो. त्यावेळी एका वसतिगृहात खोली मिळाली. तेथे एक पद्धत होती. रात्री कधीही नवागत विद्यार्थ्यांस उठवून त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार करण्यात येत असे. हे करणारे तेथील जुने विद्यार्थी असायचे. त्यांच्या या प्रश्नोत्तरांना जो धीटपणे सामोरे जायचा, त्याला तेथे राहण्याची परवानगी मिळायची, नसता त्याला वर्षभर त्रास दिला जायचा. परप्रांतातून आलेल्यांना त्या तुलनेने कमी त्रास दिला जायचा. मला तेथे प्रथेप्रमाणे रात्री उठवण्यात आले. अनेक प्रश्नांनंतर एक प्रश्न विचारण्यात आला. महाराष्ट्राचा असा एक खाद्यपदार्थ सांगा, जो देशभर लोकप्रिय झालेला आहे. उदाहरणार्थ, दक्षिणेतील इडली, वडा-सांबर, डोसा, उत्तप्पा किंवा पंजाबी डिशेस किंवा गुजरातचा ढोकळा किंवा बंगालचा रसगुल्ला, हिंदी प्रदेशाचे फुलके. खूप विचार केल्यानंतर माझ्या लक्षात आले, की महाराष्ट्रातील असा एकही पदार्थ नाही, जो देशभर लोकप्रिय झालेला आहे. वेशभूषेची काही वैशिष्ट्ये, तेदेखील नाही. याबद्दल प्रत्येक राज्याचे किंवा समूह राज्याचे ड्रेसकोड आहेत. महाराष्ट्राचे नाही सांगता येणार. मग प्रश्न पडला, की महाराष्ट्राची अशी कोणती बाब आहे, जी देशभर प्रचलित आहे. मी म्हणालो, छत्रपती शिवाजी महाराज. ते म्हणाले, ते राजकीय झाले. खानपानाबद्दल सांगा. मराठी संस्कृतीबद्दल बोला. मला सांगता आले नाही.

### महाराष्ट्राची कोणती वैशिष्ट्ये आहेत?

कित्येक वर्षापासून या प्रश्नाचे उत्तर मी शोधतोय. देशातील ३० प्रांतांपैकी २५ प्रांतांत माझी भ्रमंती झालेली आहे. मराठी माणसाच्या स्वभावाची बरीच वैशिष्ट्ये सांगता येतात. इतर कोणत्याही प्राण्यांपेक्षा तो खूप स्वाभिमानी आहे, इतर कोणाहीपेक्षा तो बऱ्यापैकी श्रीमंत आहे. मध्यमवर्गीयांची संख्या सर्वात जास्त येथे आहे, नागरी जाणीव येथे सर्वात जास्त आहे. सर्व ठीक आहे, पण महाराष्ट्रीयन संस्कृती अशी काही आहे काय? खानपान, वेशभूषा, केशभूषा वगैरे या दृष्टीने इतर प्रांतांची काही वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्राची कोणती आहेत?

या प्रश्नाचे उत्तर शोधताना जगप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांची छोटी पुस्तिका माझ्या हाती लागली. डॉ. इरावतीबाईंनी संस्कृतीची व्याख्या केलेली आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे, की संस्कृतीची दोन रूपे असतात. एक डोळ्याला जाणवणारे व दुसरे ज्ञानेंद्रियांना जाणवणारे. व्यक्ती, घर, कपडे, खानपान इत्यादी वस्तू हे संस्कृतीचे बाह्यरूप. संस्कृतीचे दुसरे रूप माणसाने सामाजिक जीवन जगण्यासाठी ठरवून घेतलेल्या रिती, योग्य-अयोग्याच्या कल्पना, पाप-पुण्य इत्यादींच्या संकल्पना, तसेच कौटुंबिक नाती, वागणूक, विवाह परंपरा इत्यादी गोष्टी. या पारंपरिक असतात. त्या गोष्टी माणूस एकटा निर्माण करत नाही, ती समूहाने तयार केली जातात (भारतीय संस्कृती कोशः संस्कृती). इरावती कर्वे या दोन रूपांसंदर्भात मराठी प्रदेशात राहणाऱ्यांची संस्कृती तपासण्याचा प्रयत्न करतात. या संदर्भात भारतातील अनेक समाजशास्त्रज्ञांनी, मानववंशशास्त्रज्ञांनी खूप बारकाईने अभ्यास केलेला आहे. त्यापैकी सर्वजण या निष्कर्षाप्रत आलेले आहेत, की विंध्याचलच्या वरच्या भागात (ज्यात संपूर्ण हिंदी पट्टी येते) आर्य संस्कृतीचे अवशेष सापडतात, तर विंध्याचलच्या खालच्या प्रदेशात द्रविड संस्कृतीचे. द्रविड संस्कृती ही प्रामुख्याने आजच्या तेलंगणा, आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू व केरळमध्ये आढळून येते. देशाचा पश्चिमेकडचा भाग आहे गुजरात आणि महाराष्ट्र. येथील संस्कृती मात्र आर्य आणि द्रविड संस्कृतीच्या मिश्रणातून म्हणा किंवा समन्वयातून म्हणा, तयार झालेली दिसून येईल. या दृष्टीने डॉ. इरावती कर्वे यांची एक पुस्तिका, 'महाराष्ट्र : एक अभ्यास' खूपच मूलगामी स्वरूपाची आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे यांनी ही पुस्तिका (पाने ४३, १९७१) प्रकाशित केलेली आहे. यात इरावती कर्वे अनेक पुरावे देऊन सिद्ध करतात, की महाराष्ट्राची वेगळी अशी कुठलीही संस्कृती

नाही. तर प्रामुख्याने आर्य व द्रविडांच्या सांस्कृतिक समन्वयातून ही संस्कृती घडलेली आहे. दहाव्या शतकानंतर इस्लामपासून बरेच काही महाराष्ट्राने घेतलेले आहे. विशेष असे भाषेच्या संदर्भात. बेमालूम शब्दाने मराठीला बेमालूमपणे फसवले आहे.

या पुस्तिकेच्या शेवटी त्या लिहितात, की संस्कृतीबद्दल बोलायचे झाल्यास उत्तरेकडची संस्कृती आणि द्रविड संस्कृती या दोघांमध्ये आपले पाय घट्ट रोवले आहेत. पश्चिमेकडचा विचार करायला लागले तर आपल्या इकडचा शेजारी गुजरात व खालचा कर्नाटक यांचा आपल्यावर जास्त पगडा आहे.

### संक्रमित होत गेली मराठी संस्कृती

पूर्वेकडच्या महाराष्ट्राचा विचार केला तर एका बाजूने हिंदी व एका बाजूने आंध्र या लोकांचा आपल्यावर पगडा बसलेला आहे. म्हणून आम्ही हे अमुक अशा तऱ्हेचा आग्रह धरणे जवळपास अशक्य आहे. केवळ ४३ पानांच्या या पुस्तिकेत आरंभीच इरावतीबाईनी स्पष्ट केलेले आहे, की त्यांचा शोध, हा मी कोण म्हणजे मी महाराष्ट्रीयन कोण याच्या शोधापासून सुरू होतो. या प्रश्नाच्या शोधात ते महाराष्ट्राच्या भौगोलिक अवस्थेची मांडणी खोलात जाऊन करतात. या राज्याच्या भौगोलिक रचनेवरून हे स्पष्ट होते, की महाराष्ट्राची संस्कृती ही स्वतंत्र अशी संस्कृती नसून पलीकडील संस्कृती व खाली दक्षिणेकडील द्रविड संस्कृती या दोघांकडून सर्वच बाबतीत बरेच काही घेत घेत मराठी संस्कृती विकसित होत गेलेली आहे. विठोबाबद्दल मराठी माणूस खूप भाबडेपणाने बोलतो. तो विठोबा एकाही मराठी कुटुंबाचे कुलदैवत नाही. आश्चर्य म्हणजे, जे बडवे पिढ्यान्‌पिढ्या विठ्ठलपूजा करतात, त्यांचेही कुलदैवत हे विठोबा नाही, हे अनेक पुराव्यानिशी सिद्ध केले गेलेले आहे. मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, ग्रामनामे, विवाहपद्धती, नातेगोते या सर्वांच्या आधारे एकाच प्रश्न त्या उभ्या करतात, की आमची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत काय? त्यावेळी त्यांना जाणवते, की आपली काही वेगळी वैशिष्ट्ये नाहीत. तरीदेखील आपण नेहमीच मराठी संस्कृती, महाराष्ट्रीयन संस्कृती म्हणत असतो, या शब्दप्रयोगाचा संबंध, संस्कृती ज्या अर्थाने वापरला जातो त्या अर्थाशी नसतो, तर त्याचा संबंध मराठी माणसाच्या मानसिकतेशी असतो. तर हे मराठी मन किंवा मराठी स्वभाव काय असेल?

या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात ज्यावेळी मी निघालो त्यावेळी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी भारतीय मनाचे जे विश्लेषण केले आहे, ते माझ्या कामी आले. भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील बहुसंख्यांकाचा जो स्वभाव तयार झालेला आहे, जी मनोरचना तयार झालेली आहे त्याच्या मुळात जाऊन शोध घेण्याचा प्रयत्न ते करतात. डॉक्टरांच्या मते, प्रत्येक देशातील, प्रत्येक प्रांतातील मनोरचना किंवा जीवनदृष्टी ही त्यांच्या दैवतातून किंवा त्यांच्या उपासनेतून तयार होत असते. त्यासाठी त्यांनी संपूर्ण भारताची विभागणी चार देवतांत केलेली आहे. शिवोपासनेचा प्रदेश, रामोपासना, कृष्णोपासना व देवी उपासना. शिवोपासना संपूर्ण दक्षिणेत प्रचलित आहे. शिव-शंकर देवता इतर सर्व देवतांशी फटकून वागत असतो. तो एकांतप्रेमी, कुटुंबप्रेमी आहे. आपली बायको, आपली दोन मुले व काही शिष्य घेऊन तो सर्वांपासून दूर पर्वतात, इतर समाजापासून अलिप्तपणे, आपल्याच मस्तीत जगत असतो. त्यामुळे त्याची उपासना करणाऱ्यातदेखील तीच वृत्ती-व्यक्तिवादी-दिसून येते. इतर प्रदेशाशी आमचे काही देणे-घेणे नाही. आपण आपली भाषा, आपला प्रदेश हेच त्यांच्यासाठी सब कुछ. १९५६ च्या आसपास लोहियांनी असे जाहीर केले होते, की भारतात जर कधी काळी प्रादेशिक पक्षाचा जन्म झाला तर तो पहिल्यांदा दक्षिणेत होईल आणि ते खरेही ठरले, जो रामोपासनेचा प्रदेश आहे. तेथील लोक हे पूर्णपणे आज्ञाधारी असतात. डोळे, कान व मेंदू बंद करून केवळ वरच्याची आज्ञा पाळणे हीच त्यांची प्रकृती असते. स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता रामोपासनेचे लोक गमावून बसतात. यात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहारचा काही भाग येतो आणि तेथे गेल्या कित्येक वर्षांपासून काय चालले आहे, हे आपणास माहीत आहे. प्रस्थापित व्यवस्थेची चौकट मोडण्याचा कोणीही तेथे प्रयत्न केलेला नाही. कारण रामानेदेखील तोच प्रकार केलेला आहे. प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जाऊन जर कोणी काही करू लागला, तर राम त्याची हत्या करतो (शंभूकाची हत्या). तीच मनोवृत्ती आज या हिंदी प्रदेशात दिसून येते. आपल्या विरोधात जो कोणी जाईल, त्याला संपवण्याचा प्रयत्न तेथे होतो आणि अशा प्रकारच्या संघटना तेथे वाढलेल्या आहेत किंवा अशा प्रकारच्या संघटनेची ते प्रामाणिकपणे आज्ञा पाळत असतात. •••

**(लेखक ज्येष्ठ हिंदी साहित्यिक आणि अनुवादक आहेत)**

## देवी उपासनेचे प्रांत बंगाल आणि महाराष्ट्र

ओडिशा-बिहारचा बराचसा भाग, राजस्थान, आसाम हा कृष्ण उपासनेचा प्रदेश. कृष्णचरित्र हे कोणत्याही चौकटीत न बसणारे चरित्र आहे. कुठल्याही मुद्यावर तो ठाम नसतो, तडजोडवादी असतो. परिस्थिती पाहून रंग बदलणे, साधन आणि साध्य यात कधीही मेळ नसणे, आपल्या व आपल्याला मानणाऱ्यांचा फायदा कसा होईल एवढेच पाहणे व त्यासाठी वाट्टेल ते प्रकार करणे हेच या प्रांतातील लोकांच्या जीवनात आणि त्यांच्या निर्णय प्रक्रियेत असते. शेवटचा प्रदेश हा देवी उपासनेचा. देवी ही रक्त मागत असते. रक्ताने तिची आराधना केली जाते. रक्त हे क्रांतीचे प्रतीक असते. अन्याय-अत्याचार-विषमता याविरुद्ध आक्रमक भूमिका ती घेते. ही क्रांतीची देवी आहे आणि संपूर्ण भारतात देवी उपासनेचे दोनच प्रांत आहेत, बंगाल आणि महाराष्ट्र. त्यामुळे परिवर्तनाची प्रक्रिया या दोन प्रांतांतूनच सुरू झालेली दिसून येईल. क्रांतिकारी विचार येथूनच निघालेले आहेत. आश्चर्य म्हणजे, प्रतिक्रांतीचे विचारदेखील येथूनच सुरू झालेले आहेत. अत्यंत स्वाभिमानी व जे योग्य आहे, जे सर्वांच्या भल्याचे आहे त्यासाठी प्रयत्न करणे आणि जे वाईट आहे, क्रूर आहे त्याचा शेवट करणे हे देवीचे वैशिष्ट्य असते. अगदी हीच वृत्ती या दोन प्रांतांतील लोकांची असते. स्वतः उत्तर भारतीय असूनदेखील लोहियांनी हे विश्लेषण केलेले आहे. ते आजच्या स्थितीला लागू पडणारे आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आणि महात्मा फुल्यांचा जन्म महाराष्ट्रातच होतो व राजा राममोहन रॉय व क्रांतिकारी संघटना बंगालमध्ये आकार घेत असतात. मराठीची वेगळी संस्कृती नसेल आणि ती नाहीच. पण किमान मराठी मनाचे हे जे वैशिष्ट्य आहे, त्याचा अभिमान प्रत्येक मराठी भाषिकांना असणे स्वाभाविक आहे.

# अमृतमहोत्सवी वर्षात महिला अन् गरिबांच्याही विकासाचा विचार व्हावा

**इथल्या दुर्बल घटक व गरीब माणसाच्या कल्याणाचाही विचार या अमृतमहोत्सव वर्षांमध्ये होणे आवश्यक आहे. या देशातला शेवटचा माणूस व महिला विकासाच्या मुख्य प्रवाहात आल्याशिवाय आपला देश खऱ्या अर्थाने महासत्ता होणार नाही. देश महासत्ता करण्यासाठी सर्वसामान्य गोरगरीब, दलित, आदिवासी, महिला व दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे.**



**प्रवीण मोरे**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सुरुवात १५ ऑगस्ट २०२१ पासून झाली आहे. या पार्श्वभूमीवर काही कृती कार्यक्रम आपण हाती घेण्याची गरज आहे. आज अनेक समुदायातील मंडळी या कार्यक्रमांकडे आपण विकसनशील देशापासून विकसित देशाकडे वाटचाल करत आहोत, या भावनेने पाहत आहेत. सर्वसामान्य जनता ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या या देशामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे एका नव्या पर्वाला आपण सुरुवात करणार आहोत. किंबहुना, काही अंशी आपण त्या प्रगतीपथावर जाण्याच्या मार्गावर आहोत. मात्र या घडामोडी घडत असताना गोरगरीब, मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांसाठी नेमकेपणानं आपण काही कृती कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रश्नांवर चर्चासत्र आयोजित करणे, चित्ररथ काढणे, धोरणकर्त्यांना दुर्बल घटकांच्या जबाबदारीची जाणीव करूण देणे, संविधानाने दिलेल्या हक्काचे संरक्षण करण्याची प्रक्रिया राबवणे इत्यादी गोष्टी प्रामुख्याने करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ज्या वर्गाचे आपण प्रतिनिधित्व करतो, त्या वर्गाला या विकास प्रक्रियेमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना आजही अनेक खेडी आणि काही समाजघटक विकासापासून दूर आहेत, अन्याय-अत्याचाराच्या घटना घडत आहेत, शिक्षण सामान्यांच्या आवाक्याबाहेर चालले आहे, आरक्षणातून काही प्रगती होत असताना, किंबहुना आरक्षण व्यवस्थेलाच आज थोडा धक्का लागतोय, अशी परिस्थिती आहे. राज्य कल्याणकारी व्यवस्था म्हणून पुढे येत असताना समाजाचा विकास झालेला आहे. मात्र खाजगीकरणाच्या होऊ घातलेल्या प्रक्रियेमुळे घटनात्मकदृष्ट्या संरक्षित असलेल्या समुदायाच्या दृष्टीने काय होईल, हे सांगता येत नाही. या डिजिटल क्रांतीतून समाजाला निश्चितपणे नवीन संधी उपलब्ध होत आहेत. मात्र त्याचवेळी हक्काच्या गोष्टी नाकारल्या जात आहेत. त्यामुळे सामाजिक क्षेत्रामध्ये काही बदल होणे आवश्यक आहे. आज शैक्षणिक क्षेत्रामध्येही क्रांती होत असून नवनवीन क्षेत्र खुली होत आहेत. या सर्व क्षेत्रांमध्ये दुर्बल घटकांचा अंतर्भाव करणे हे एक मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. हे जग, गाव-खेडे-शहर आज जागतिक (ग्लोबल) होत आहे. या व्यवस्थेमध्ये टिकून राहण्यासाठी व पुढे जाण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आपल्याकडे आल्या पाहिजेत, याचा विचार करणे आवश्यक आहे.

**नव्या संधींसाठी तयार करणे एक आव्हान**

आज सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठे बदल होत असून आधुनिकतेचे वारे वाहत मूलभूत मूल्यांना आज व्यापकता येत आहे. काही जुनाट पद्धतींचा त्याग करून लोक आधुनिकतेची कास धरत आहेत, ही चांगली बाब आहे. आर्थिक क्षेत्रातही मोठी उलाढाल आणि क्रांती होत आहे. काही प्रमाणात अस्तित्वात असणाऱ्या व्यवस्था टिकून ठेवणं हे जरी आव्हान असलं, तरी नव्या संधींसाठी स्वतःला तयार करणे हे एक मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. आज राजकीय क्षेत्राचे कॉर्पोरेटीकरण होत आहे. मात्र निवडणुकांमध्ये वाढणारा खर्च, घराणेशाही आणि लोकशाही मूल्ये जतन करण्याच्या हेतूने सामान्यजनातून नेतृत्वासाठी उभ्या राहिलेल्या नेतृत्वाची दमछाक होताना दिसून येत आहे. एक सधन वर्ग निवडणुकीला इव्हेंट बनवून पैसे खर्च करून मतदान विकत घेता येते, ही बाब प्रस्थापित करीत आहे. दुसरीकडे, चळवळी आणि संघटनांमध्ये काम करणारा वर्ग निवडणुकीच्या काळात आर्थिक विवंचनेमध्ये फसत आहे. तो लोकांच्या आधारावर काम करतो. मात्र आर्थिक सुबत्ता नसल्यामुळे कार्यकर्त्यापुढे जाता येत नाही. या एकूणच परिस्थितीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय या सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती साधता येईल, या दृष्टीने नियोजन, कार्यक्रमांची आखणी केली पाहिजे.

देशामध्ये विविध पातळ्यांवर आधुनिकतेची चर्चा मोठ्या प्रमाणावर चालू आहे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये जागतिक स्तरावर जाण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न होत आहेत. मात्र इथल्या दुर्बल घटक व गरीब माणसाच्या कल्याणाचाही विचार या अमृतमहोत्सव वर्षांमध्ये होणे आवश्यक आहे. या देशातला शेवटचा माणूस व महिला विकासाच्या मुख्य प्रवाहात आल्याशिवाय आपला देश खऱ्या अर्थाने महासत्ता होणार नाही. देश महासत्ता करण्यासाठी सर्वसामान्य गोरगरीब, दलित, आदिवासी, महिला व दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रकियेमध्ये आमचाही वाटा असावा, असे त्यांना वाटते. त्यांना प्रगतीपथावर आणण्यासाठी विकासाच्या नव्या संधी उपलब्ध करण्याचे प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा आज सर्व स्तरांमधून व्यक्त होताना दिसत आहे. •••

**व्यक्तिविशेष**

# लता मंगेशकर : एक दंतकथा



**वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा समर्थपणे चालवत लतादीदींनी स्वत:सह भावंडांचीही कारकीर्द या क्षेत्रात घडवली. देश-विदेशातील जवळपास ३६ भाषांमधून ३० हजारांवर गाणी गायलेली ही स्वरसम्राज्ञी जिवंतपणीच एक दंतकथा बनली होती. त्यांनी गायलेल्या असंख्य गाण्यांच्या रुपाने त्या सदैव आपल्यातच राहणार आहेत.**

प्रतिनिधी

स्वातंत्र्योत्तर काळातील प्रत्येक पिढीला सुखदु:ख आणि सर्व भावनांचा उत्सव स्वरातून पकडणाऱ्या गानप्रतिनिधी म्हणून आपलीशी वाटणाऱ्या गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर आज आपल्यात शरीररुपाने नाहीत. पण सांस्कृतिक वैभवाच्या शिखरावरील या स्वरसम्राज्ञीने गायलेली हजारो गाणी त्या आपल्यातच असल्याचे स्मरण सदैव करून देत राहतील.

**वयाच्या १३ व्या वर्षी कुटुंबाची जबाबदारी**

इंदूर येथे १९२९ साली लतादीदींचा जन्म झाला. त्यांचं बालपण सांगलीत गेलं. शिक्षणात रस नसल्याने त्यांनी शाळेतील अध्यापनापेक्षा स्वरांवर अधिक लक्ष केंद्रीत केले. वयाच्या ५ व्या वर्षी त्या स्वयंपाकघरात आपल्या आईला गाणं म्हणून दाखवायच्या. मात्र त्यांना ते फार रुचायचं नाही. तथापि, आपल्या लेकीत मोठी गायिका दडल्याचे ओळखून दीनानाथ मंगेशकरांनी मुलीला संगीताचे धडे द्यायला सुरुवात केली. दीनानाथांसह त्यांचे मित्र मास्टर विनायक यांच्या तालमीत राहून लतादीदींनी आपला स्वर उंचावण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, १९४२ मध्ये लता अवघ्या तेरा वर्षांची असताना वडिलांचे निधन झाले. यामुळे जबाबदारी शब्दाचा अर्थ माहीत नसल्याच्या वयात लतादीदींवर चार भावंडे आणि आई अशा पाच जणांची जबाबदारी आली. मात्र मंगेशकर कुटुंबाचे एक आप्त आणि नवयुग चित्रपट कंपनीचे मालक मास्टर विनायक यांनी दीनानाथ मंगेशकरांसोबतच्या संबंधांची जाणीव ठेऊन मंगेशकर कुटुंबाची काळजी घेतली. त्यांनी लताबाईंना गायिका आणि अभिनेत्री म्हणून काम मिळवून दिले. पुढे लताबाईंनी कुटुंब सांभाळत अथक परिश्रमाने स्वत:बरोबरच भावंडांचही संगीत क्षेत्रात बस्तान बसवलं.

**पहिलं आणि शेवटचं गाणं**

१९४२ साली वसंत जोगळेकर यांच्या 'किती हसाल' या चित्रपटात सदाशिव नेवरेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या 'नाचू या गडे, खेळ भारी मनी हौस भारी' हे लताबाईंचं चित्रपटासाठी ध्वनीमुद्रित केलेलं पहिलं गाणं. पण काही कारणामुळं हे गाणं चित्रपटातून वगळण्यात आलं. मास्टर विनायक यांनी लताबाईंना 'नवयुग'च्या 'पहिली मंगळागौर' या चित्रपटात एक छोटीशी भूमिका दिली होती. या चित्रपटात त्यांनी एक गाणंही गायलं. त्यामुळे त्याचवर्षी (१९४२) आलेल्या 'पहिली मंगळागौर' या चित्रपटातलं दादा चांदेकर यांचं संगीत असलेलं 'नटली चैत्राची नवलाई' हे लताबाईंचं पहिलं मराठी चित्रपटगीत ठरलं. १९४२ साली सुरू झालेली गायनाची लता मंगेशकरांची ही कारकीर्द २०१९ साली मयुरेश पै यांनी संगीतबद्ध केलेल्या 'सौगंध मुझे इस मिट्टी की' या गाण्याशी येवून पोहोचली. लताबाईंनी ध्वनीमुद्रित केलेलं हे अखेरचं गाणं.

**अनेक पिढ्यांसाठी केलं गायन**

आपल्या ७७ वर्षांच्या कारकीर्दीत लताबाईंनी आपली स्वत:चीच कारकीर्द घडवली नाही, तर पार्श्वगायनाच्या क्षेत्रात येणाऱ्या सर्वांसाठीच भलं मोठं काम करून ठेवलं आहे. फिल्मफेअर पुरस्कारांमध्ये सर्वश्रेष्ठ पार्श्वगायन या श्रेणीचा समावेश तसेच पार्श्वगायनासाठी रॉयल्टी मिळण्याचं बरचसं श्रेय त्यांना जातं. संगीतकार, गीतकार आणि अभिनेत्रींच्या अनेक पिढ्यांसाठी लताबाई गायल्या. चित्रगुप्त आणि आनंद-मिलिंद तसंच रोशन आणि राजेश

रोशन हे संगीतकार पितापुत्र, अंजान आणि समीर तसंच जाँनिसार अख्तर आणि जावेद अख्तर हे गीतकार पितापुत्र, शोभना समर्थ, नूतन तनुजा आणि काजोल या एकाच घरातल्या तीन पिढ्यांच्या अभिनेत्री, ही त्यातली काही ठळक उदाहरणं सांगता येतील.

लता मंगेशकरांनी जसा असंख्य अभिनेत्रींसाठी आवाज दिला तद्वतच आपल्या भांवडांसोबतही अनेक उत्कृष्ट गाणी केली. पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबद्ध केलेल्या संत ज्ञानेश्वरांच्या, 'पैलं तो गे काऊ कोकताहे...' यांसारख्या वीराण्या लताबाईंनी घराघरात पोहोचवल्या. लता मंगेशकर यांनी आनंदघन या टोपणनावाने संगीत दिलेले चारही चित्रपट श्रवणीय गाण्यांमुळे रसिकांच्या स्मरणात राहिले. या गाण्यांपैकी 'रेशमाच्या रेघांनी, लाल काळ्या धाग्यांनी' ही आशा भोसले यांच्या आवाजातील 'मराठा तितुका मेळवावा' या चित्रपटातील ठसकेबाज लावणी ही त्यापैकीच एक. लताबाईंचं संगीत आणि पंडित हृदयनाथांचा आवाज असलेलं लोकगीतांच्या बाजाचं, 'डौल मोराच्या मानचा रं' हे गीतही मराठी रसिकांना खूप भावलं. 'राजा शिवछत्रपती' या गीतसंग्रहातील 'हे हिंदू नृसिंहा, प्रभो शिवाजी राजा' हे स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांची रचना असलेलं शिवस्तोत्र हृदयनाथांचे संगीत आणि लताबाईंचा आवाज यामुळे अजरामर झालं आहे.

**संगीतकार आणि निर्मात्याही**

गायनाबरोबरच लता मंगेशकरांनी संगीतकार आणि चित्रपटनिर्मात्या म्हणूनही आपली वेगळी ओळख निर्माण केली. १९५० मध्ये आलेल्या दिनकर द. पाटील यांच्या 'रामराम पावणं' या चित्रपटाच्या निमित्ताने त्यांच्यातील संगीतकाराच्या प्रवासाला सुरुवात झाली. मोहित्यांची मंजुळा, मराठा तितुका मेळवावा, साधी माणसं आणि तांबडी माती या चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. 'साधी माणसं' या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार तर मिळालाच, शिवाय राज्य पुरस्कारासह सर्वोत्कृष्ट संगीतकार आणि पार्श्वगायिकेचाही पुरस्कार मिळाला.

त्यांनी काही चित्रपटांचीही निर्मिती केली आहे. यामध्ये वादळ (मराठी-१९५३), झंझार (हिंदी-१९५३, सी. रामचंद्र यांच्यासह सहनिर्मिती), कांचनगंगा (हिंदी-१९५५) आणि लेकीन (हिंदी-१९९०) या चित्रपटांचा समावेश आहे.

**कुंदनलाल सैगल आणि नूरजहाँ यांच्या चाहत्या**

आपल्या अतुलनीय गायन आणि दमदार अभिनयाने १९३० आणि १९४० ही दोन दशकं गाजवून सोडलेले कुंदनलाल सैगल आणि लतायुगाच्या उदयापूर्वी भारतीय चित्रपट संगीतात आपला दबदबा निर्माण करणाऱ्या नूरजहाँ यांच्या गायकीने लतादीदींना लहानपणी झपाटून टाकले होते. नूरजहाँ यांच्याशी त्यांची मैत्री दीर्घकाळ राहिली. एवढेच नाही तर, प्रफुल्ल पिक्चर्सच्या 'बडी माँ' या नूरजहाँ नायिका असलेल्या चित्रपटामध्ये लतादीदींनीही छोटीशी भूमिका केली होती. नंतरही त्या बराच काळ संपर्कात होत्या. मात्र सैगल यांना भेटण्याचं भाग्य लतादीदींना लाभलं नाही. लतादीदी त्या काळात रेडिओवरील कार्यक्रमात नूरजहाँ यांच्या गाण्यांसाठी फर्माईश पाठवायच्या. रेडिओवर आपलं नाव आल्यानंतर त्यांना आनंद वाटायचा. एके दिवशी कुंदनलाल सैगल यांच्या निधनाची बातमी त्यांना रेडिओवरून समजली. यामुळे त्या खूप दुःखी झाल्या. सैगल यांच्या निधनाची बातमी रेडिओवरून कळल्यामुळे यापुढे रेडिओच ऐकायचा नाही, असा निर्धार करून त्यांनी रेडिओ परत करविला.



**सामाजिक बांधिलकी**

लता मंगेशकर यांचे संगीतावर जितके प्रेम होते, तेवढीच त्यांची सामाजिक जाणीवही तीव्र होती. त्यांनी देशातील विविध सामाजिक



## नूरजहाँच्या आवाजाची उणीव कधी जाणवली नाही

चाळीसच्या दशकाच्या मध्यापर्यंत गायनक्षेत्रात अमीरबाई, शमशाद बेगम, जोहराबाई, ललिताबाई देऊळकर, बेगम अख्तर, बीनापाणी मुखर्जी, नूरजहाँ सक्रिय होत्या. त्यातही नूरजहाँच्या गाण्यांनी लोकांना अक्षरशः वेड लावले होते. नूरजहाँचा आवाज हेच के. दत्ता, श्यामसुंदर, गुलाम हैदर, सज्जाद हुसैन यांसारख्या संगीतकारांच्या संगीताचे बलस्थान होते. १९४५ मध्ये झीनत चित्रपटातील कव्वाली गाऊन कव्वाली गाणारी पहिली आशियायी गायिका बनलेल्या नूरजहाँ यांच्या आवाजानेच या संगीतकारांच्या गाण्यांना चिरंतन केले. पण १९४७ मध्ये नूरजहाँ पाकिस्तानला निघून गेल्यानंतर भारतीय चित्रपट संगीतात जी पोकळी निर्माण झाली होती, ती लताबाईंनी अशी काही भरून काढली, की नूरजहाँचा आवाज हेच ज्यांचे बलस्थान होते त्या संगीतकारांनाही तिच्या आवाजाची उणीव येथे कधी जाणवली नाही.

आणि शैक्षणिक संस्थांना जो मदतीचा हात दिला, त्यावरून त्यांच्यातल्या दायित्वाचा प्रत्यय येतो. १९५३ साली महाराष्ट्रातील दुष्काळ निधीसाठी मुंबईत गाण्यांचा कार्यक्रम घेण्याबरोबरच १९५४ मध्ये दादरा-नगर-हवेली मुक्तीसंग्रामासाठी अर्थसहाय्य केले होते. १९६१ मध्ये पुण्यातील पाणशेत धरण पूरग्रस्तांसाठी मुंबईत मदतफेरीद्वारे सहाय्यनिधी जमवण्याबरोबरच गेट वे ऑफ इंडियाच्या शिवाजी महाराज पुतळ्यास देणगी दिली होती. चीन आक्रमणाच्या वेळी राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी आणि गोवा सहाय्यक समिती निधीसाठी त्यांनी मुंबईत तसेच लंडनच्या नेहरू मेमोरिअल प्रोजेक्टसाठी निधीसंकलनार्थ अल्बर्ट हॉलमध्ये गाण्याचा कार्यक्रम घेतला. लॉसएंजेलिस येथे हरेकृष्ण मंदिरासाठी चॅरिटी शोचे आयोजन केले होते. राजस्थानातील दुष्काळपीडितांसाठी जयपूर येथे गाण्यांचा कार्यक्रम घेतला होता. २००१ साली त्यांनी पुण्यात मास्टर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय सुरू केले.

अगदी अलीकडे मराठवाड्यातील काही शैक्षणिक संस्थांनाही त्यांनी मदत केली होती. लतादीदींनी नांदेडला कधीही भेट दिली नाही. पण त्यांनी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या मदतीसाठी हैदराबाद येथे एक कार्यक्रम केला होता. नांदेडच्या पीपल्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी 'ओंजळभर पाणी' या आपल्या आत्मकथनात ही आठपण नमूद केलेली आहे. लातूर जिल्ह्याशी दीदींचे जिव्हाळ्याचे संबंध राहिले. त्यांनी औराद शहाजानी (ता. निलंगा) येथे मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या





उभारणीवेळी २८ फेब्रुवारी १९८१ रोजी कुठलेही मानधन न घेता संगीत रजनीचे आयोजन केले होते. लतादीदींचे आजोळ असलेल्या थाळनेर (जि. धुळे) येथील खंडेराव मंदिराच्या जीर्णोद्धारासाठीही त्यांनी मदत केली होती.

**क्रिकेटप्रेम अचंबित करणारे**

लतादीदींचे क्रिकेटप्रेम अचंबित करणारे होते. जगभरातील असंख्य रसिक त्यांच्या गाण्यांचे चाहते होते. लताबाई मात्र क्रिकेटपटू सचिन तेंडूलकरच्या चाहत्या होत्या. त्या नेहमीच सचिनची प्रशंसा करायच्या. सुनील गावस्कर, कपिल देव यांचा खेळ मला खूप भावतो. पण सचिन माझा आवडता क्रिकेटपटू आहे, असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते. सचिनने क्रिकेटमधून घेतलेली निवृत्ती लताबाईंच्या जिव्हारी लागली होती. सचिनचा हा निर्णय ऐकून मला खूप दुःख झाले, असे त्या म्हणाल्या होत्या. इंग्लंडमधील लॉर्ड्स मैदानावर १९८३ साली भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यात झालेला विश्वचषकाचा अंतिम सामना त्यांनी प्रत्यक्ष हजर राहून पाहिला होता. विशेष म्हणजे, सामन्यापूर्वी त्यांनी कपिल देव आणि त्यांच्या संघाला जेवणासाठी आमंत्रित केले होते.

यजमान भारताने महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली २०११ चा एकदिवसीय विश्वचषक जिंकला होता. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतापुढे पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचे आव्हान होते. हा सामना भारताने जिंकावा म्हणून लतादीदींनी दिवसभर उपवास केला होता. क्रिकेटवरील प्रेमामुळे त्या मोठेपणा बाजूला सारून क्रिकेटपटूंसोबत फोटो काढायच्या, अशी आठवण एका क्रिकेटपटूने लतादीदींना श्रद्धांजली वाहताना सांगितली.

**'भारतरत्न'सह अनेक पुरस्कारांचा मान**

लता मंगेशकर यांना संगीत क्षेत्रातील अलौकीक कामगिरीबद्दल अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' आणि महाराष्ट्र सरकारचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारांचा समावेश आहे. दादासाहेब फाळके पुरस्कारासह सर्वोत्कृष्ट पार्श्वगायनासाठी फिल्मफेअर आणि इतरही अनेक पुरस्कार त्यांना मिळाले.

# आपके पास कानून है, तो हमारे पास क्रिमिनल है

राजकारण आणि गुन्हेगारांचा अतूट होत जाणारा संबंध लोकशाहीच्या दृष्टीने खूपच चिंताजनक आहे. दुर्दैव असे, की या संबंधांना प्रतिष्ठा मिळते आहे. समाजमान्यता मिळते आहे. आम्ही आमच्या मतदारसंघात पुन्हापुन्हा गुन्हेगारांना निवडून देतो असे सांगणारे मतदार आहेत आणि आम्ही पुन्हापुन्हा निवडून जातो असे सांगणारे गुन्हेगारही आहेत. सत्तासंपादनाच्या स्पर्धेत, जिंकण्याच्या स्पर्धेत अनेक राजकीय पक्षांनी गुन्हेगारांना आपल्या पक्षात स्थान देऊन शुद्ध केले आणि सत्तेनं त्यांना पवित्र केले. लोकशाही समाजवादाच्या गप्पा मारणारे, चाल-चारित्र्याच्या गप्पा मारणारे, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या नावानं गप्पा मारणारे सगळेच पक्ष गुन्हेगारांना शुद्ध करून घेऊ लागले. गुन्हेगारांकडे असलेले बळ, दादागिरी, पैसा, दहशत तयार करण्याची क्षमता असते. ती आपल्या पक्षासाठी वापरण्याचा प्रयत्न अनेक पक्ष खुलेआम करू लागले. पूर्वी तो छुप्या पद्धतीनं व्हायचा. लोकमताचा दबाव असायचा. आता त्यापैकी काही राहिलेलं नाही. गुन्हेगारांना कोणत्या का कारणानं निवडून देणारे लोक आहेत, त्यांचे पक्ष आहेत. जिंकण्याची क्षमता आहे, पक्षाला श्रीमंत करण्याची क्षमता आहे म्हणून गेल्या दोन दशकांपासून अनेक गुन्हेगार उजळ माथ्यानं निवडणूक रिंगणात उतरू लागले. काहीजण तुरूंगात राहून निवडणुकीचा फड गाजवू लागले. पूर्वी मतदान केंद्रे ताब्यात घेणारे, मतदार पळवणारे, गुंडगिरी करणारे, खून-बलात्कार करणारे आपला काळा चेहरा लपवण्यासाठी राजकारणाच्या आश्रयाला जायचे. आता काळानं पलटी मारली. कलंकित चेहऱ्याकडेच आता राजकीय पक्ष स्वतःहून जाऊ लागले. गुन्हे दाखल आहेत पण निकाल लागलेला नाही. निकाल लागला आहे पण त्याला आव्हान देत वरवर जायचे आहे. तशी परवानगी आहे. या तरतुदींचा फायदा घेऊन गुन्हेगार राजकारणात स्थिरस्थावर होऊ लागले. त्यांच्या नावामागे भाऊ, दादा, राजा अशी विशेषणे लागली. या शब्दांविषयीचा आदर आणि विश्वासार्हता संपली. या शब्दांना अपवाद वगळता नवा अर्थ प्राप्त होऊ लागला. दादा आहे याचा अर्थ डेंजर आहे, असं समजलं जाऊ लागलं. ते खरंही ठरू लागलं. बघता बघता वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हेगार तयार झाले. पांढऱ्या कॉलरचे, भगव्या कॉलरचे, कॉलरवर तलवार ठेवणारे अशा वेगवेगळ्या जाती जन्माला येऊ लागल्या. ज्यांना हद्दपारी झाली होती तेही नेते झाले, ज्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली पण ती आव्हानात टिकली नाही ते, बलात्कार, दरोडे, खंडणी आणि संघटित गुन्हेगारीत अडकलेले, शिक्षा भोगून आलेले अनेक जण राजकारणात रूळले. ज्यांच्यावर वास्तू पाडल्याचा, बॉम्बस्फोटाचा, स्फोट घडवल्याचा आरोप आहे अशांचीही गर्दी राजकारणात वाढली. आरोप आणि गुन्हा सिद्ध होणे यातील पोकळीचा लाभ घेऊन ही मंडळी एक एक पायरी वर चढू लागली.




एक काळ असा होता, की यूपी, बिहार यांसारखी काही मोजकी राज्येच राजकारण आणि गुन्हेगारीच्या सरमिसळीबाबत आघाडीवर होती. आता कोणताही पक्ष किंवा राज्य त्याला अपवाद राहिलेलं नाही. यूपीमध्ये सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांचं पहा. पहिल्या टप्प्यात जी निवडणूक होणार आहे, त्यात जवळपास पन्नास टक्के उमेदवार कलंकित आहेत. खरे तर, गुन्हेगाराऐवजी आता कलंकित हा सोवळ्यातील शब्द वापरला जातो. तर उत्तर प्रदेशात भाजप, काँग्रेस, सपा, बसपा, आप आदी सर्वच पक्षांनी कलंकित लोकांना उमेदवारी दिली आहे आणि त्यामागं फक्त एकच कारण आहे आणि ते म्हणजे निवडून येण्याची क्षमता. मनगटशाही, हिंसा करण्याची हिंमत. या कलंकित चेहऱ्यांचं वेगवेगळ्या तऱ्हेनं समर्थन केलं जातं. उमेदवार कलंकित नाहीत, तर त्यांच्यावरचे आरोप खोटे आहेत, ते समाजसेवक आहेत, ते राजकारणातील व्यूहरचनेचे बळी आहेत वगैरे वगैरे समर्थन असतं. पण ते कलंकित आहेत हे वास्तव शिल्लक राहतेच. कुणी, कुणावर, कुठे आणि कसले रंग उडवेल हा नंतरचा प्रश्न आहे. राजकारणात, लोकशाहीत असे मूल्यांचे वस्त्रहरण वाढत असेल तर मग काळ मोठा कठीण आला, असंच म्हणावं लागणार आहे.

राज्यघटना कोणाच्या हातात जाणार आहे किंवा जाते आहे, लोकशाही कोणाच्या हातात जाते आहे यावर कसा समाज, कशी व्यवस्था जन्माला येणार या बाबासाहेबांच्या विचारांची सातत्यानं आठवण येते. लोकांनी लोकशाहीसाठी बांधलेल्या मंदिरात भलतेच कोणी घुसते आहे का आणि त्यांना रोखणाऱ्या शक्ती दुर्बल झाल्या आहेत की राजकारण, गुन्हेगारी, धर्मकारण या सर्वांची मिलीजुली आहे, याचा विचार नाही केला तर लोकशाहीच्या मंदिरात संविधानाऐवजी भलत्याच गोष्टी दिसायला लागतील. त्या दिसू

नयेत यासाठी लोकांनीच जागल्याची भूमिका घेतली पाहिजे. कारण लोकशाही त्यांनीच स्वतःसाठी तयार केली आहे. तेच तिचे निर्माते मालक आहेत. कोणी कलंकित शक्ती लोकांच्या नावाने लोकशाहीला आपल्या नावावर ओढत आहेत काय आणि लोकशाहीच्या जागी स्वतः बसताहेत का हे लोकांनी पहायचे नाही तर कुणी?

# गांधीहत्येचा हंगाम पुन्हापुन्हा का येतोय...

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची नथूराम गोडसेनं गोळ्या घालून हत्या केली तो दिवस तीस जानेवारी, म्हणजे पुण्यस्मरणाचा दिवस. भारतालाच राष्ट्रपिता आहे असं नाही. जगात अनेक राष्ट्रांत असा राष्ट्र घडवणारा पिता आहे. जसं की अमेरिकेत वॉशिंग्टन, फ्रान्समध्ये चॅप्लेन, चीनमध्ये माओ, पाकिस्तानसाठी जीना, नव्या जर्मनीचा कोनार्ड, जपानसाठी म्हणजे आधुनिक जपानसाठी फुकूझावा, जुन्या जर्मनीसाठी व्हिस्काऊंट असे राष्ट्रपिता होऊन गेले. प्रत्येक राष्ट्रात राष्ट्रपित्याचा मरणोत्तरही खूप मोठा आदर, सन्मान केला जातो. तो राष्ट्राच्या अस्तित्वाचा एक भाग बनवला जातो. लोकांची तशी मानसिकता बनवली जाते, पण आपल्याकडे थोडे वेगळे आहे. म. गांधींची एकदाच हत्या झाल्यानंतर काहींना समाधान झाले नाही. विशेष म्हणजे, हत्या झाली तेव्हा काही ठिकाणी साखर वाटली गेली होती. त्याचे कारण म. गांधी कोणी महात्मा नाहीत, राष्ट्रपिता नाहीत तर देशाची फाळणी करणारे खलनायक आहेत, हिंदू धर्माचे विरोधक आहेत या भावनेनं त्यांच्याकडे पाहणारी एक विचारधारा गांधी हत्येपूर्वीच तयार झाली आणि ती वाढत वाढत खुनी गोडसेला नायकत्व देण्यापर्यंत पोहोचली. गांधी राष्ट्रपिता नाहीत तर मग दुसरे कोण, याचे उत्तरही त्यांच्याकडे आहे. आज ना उद्या ते अगदी स्पष्टपणे देतील आणि लोकही शांतपणे ते ऐकतील.

म. गांधी यांची विचारधारा सहजासहजी कुणाला पचणारी नव्हती. काँग्रेसचा तर संबंधच नव्हता. तिला म. गांधींचे नाव हवे होते आणि तिने त्या नावाला आपल्या सात-बारावर नोंदवलेही. काँग्रेसची विचारधारा गांधीवादी नव्हे तर कुटुंबवादी राहिली. काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेल्या आणि स्वतंत्र पक्ष काढलेल्या खूप कमी लोकांनी गांधीवाद स्वीकारला. पण तो वास्तवात आणण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. राष्ट्रवादी काँग्रेसही म. गांधींचे कौतुक करते, पण त्यांची विचारधारा गांधीवादी आहे असे कोण म्हणेल? अन्य प्रादेशिक आणि डाव्या व पुरोगामी पक्षांनीही आपल्या जाहीरनाम्यात कधी राष्ट्रपित्याचे नाव येऊ दिले नाही. अगदी अलीकडे राहुल गांधी यांनी, 'जेथे सत्य तेथे गांधी' असे विधान केले. पण सत्य आहे कसे, ते कुठे आहे आणि गांधींचा त्याच्याशी संबंध कसा येतो किंवा जोडला जातो हे मात्र ते सांगू शकत नाहीत. वरपासून खालपर्यंत म. गांधी फक्त पुतळ्यापुरते, दोन ऑक्टोबर आणि तीस जानेवारीला हार घालण्यापुरतेच शिल्लक राहिले. कोणत्याही पक्षाच्या आचरणात किंवा धोरणात म. गांधींना कोणी उतरू दिले नाही. जी नोट सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेली, त्या नोटेवर म. गांधी आहेत. सीमेच्या पलिकडे गेल्यावर ओळख सांगण्यासाठी गांधी, बुद्ध, आंबेडकर आहेत. पण इथं कोठे आहेत? गांधींच्या विरोधकांची आणि हिंदुत्वाची धारा बाळगणाऱ्या नेत्यांची मरणोत्तर किती चलती सुरू आहे, हे सारे जग बघतेच आहे. देशातले सर्वोच्च पुरस्कार त्यांच्या गळ्यात पडत आहेत आणि त्यांच्या पुतळ्याच्या उंचीचे जागतिक विक्रम होत आहेत. याउलट म. गांधी जाणीवपूर्वक अडगळीत टाकण्याचा प्रयत्न होतोय. आता तर त्यांच्या आश्रमाचेच खाजगीकरण करण्याचा घाट रचला जातोय. धर्मवाद, नवा राष्ट्रवाद आणि नवी भांडवलशाही हे सगळे म. गांधींचे जानी दुश्मन झाले आहेत. त्याचबरोबर चित्रपट, नाट्य, साहित्य आणि संन्याशी क्षेत्रही गांधींच्या विरोधात गेले आहे. 'वैष्णव जन तो तेने कहिये...' ही म. गांधींची प्रार्थनाही काळाआड गेली आणि मरणापूर्वी त्यांनी उच्चारलेले 'हे राम' या शब्दांचे बघता बघता राजकारण झाले. गांधी 'हे राम' म्हणाले तर यांनी 'जय श्रीराम' म्हणत सत्तास्थाने बळकावली. 'हे राम' आणि 'जय श्रीराम' या दोन शब्दांच्या उच्चारात, आशयात आणि त्यानिमित्ताने व्यक्त होणाऱ्या भावनांमध्येही खूप फरक आहे.

आपल्या देशात म. गांधींवर किती चित्रपट निघाले, किती नाटके झाली आणि गोडसेवर किती.. आपल्या देशात मनुचा पुतळा सुरक्षित राहतो आणि गांधींचा पुतळा फुटतो. आपल्याकडे नायकाची भूमिका मांडण्यासाठी स्पर्धा सुरू आहे. मी गोडसेची भूमिका केली तर मी



कलेशी प्रामाणिक आहे. मी माझ्या अभिव्यक्तीचं रक्षण करतो, असं खासदार अमोल कोल्हे सांगतात आणि शरद पवार समर्थन करतात. कलेशी बांधिलकी असेलही, पण नैतिकतेशी बांधिलकी कोणी ठेवणार की नाही, कलेला मूल्यांचा आधार कोणी देणार की नाही आणि गांधी मांडणारी भूमिका करणार की नाही? कलेच्या आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यालाही काही नैतिक मूल्ये असतातच असतात. मुळात अमोल कोल्हे काय आणि त्यांचा पक्ष राष्ट्रवादी काय किंवा म. गांधींचा वध झाला ही संघाची भाषा बोलणारे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले काय, यापैकी कुणाचा गांधींच्या विचारांशी संबंध आहे, असा प्रश्न सहजच तयार होतो. 'व्हाय आय किल्ड गांधी'च्या निर्मात्या तर रोज छाती बडवून सांगतायेत, की एकदा चित्रपट बघाच, म्हणजे गोडसेंनी गांधींना का मारलं हे कळेल.. आता बोला! मुळात प्रश्न आहे तो गोडसेने गांधींची हत्याच करायला नको होती. तर या बाई सांगतात, की हत्या का केली हे बघा.. यातून एका खुनी माणसाचे गौरवीकरण आणि राष्ट्रपित्याचे विद्रुपीकरण होणार नाही तर दुसरे काय होणार, हेही या बाईनं सांगावं. कुणी सांगावं, गांधींच्या हत्येमागचं कारण सांगणारा हा चित्रपट गल्ला भरून पैसाही कमवेल. उद्या या बाई पुन्हा अमोल कोल्हेंना गोडसेची भूमिका देतीलही. आपण खासदार नसताना भूमिका स्वीकारली असेही कोल्हे सांगतील. पण खासदार असण्या-नसण्याचा आणि गोडसे साकार करण्याचा संबंध काय? गोडसे राष्ट्रपित्याचा खुनी आहे की नाही आणि अशा भूमिका केवळ कला स्वातंत्र्याच्या नावाखाली करायच्या का, हे कोल्हेंना कोण विचारणार? आळंदीत जाऊन आत्मक्लेश केला की सारे संपते का? गोडसेची भूमिका केल्यानं कुणाची भावना दुखावली असेल तर दिलगिरी व्यक्त करतो असंही हा कलाकार म्हणाला. पण चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच्या पश्चातापाचा काय उपयोग? हा तर पुतना मावशीचा पान्हा झाला. त्याचा अभिनय त्यांनी करावा. कोणत्या कला स्वातंत्र्याची कसली बात ते करत आहेत, हे त्यांनाच ठाऊक? एक झाले, की त्यांची वैचारिक विश्वासार्हता संपली, जी आता जुन्या भांड्याला कितीही कलई करून येणार नाही.

गेल्या दहा वर्षांच्या कालखंडात गांधीवादी विचारसरणी राजकारणात आणि बाहेर क्षीण होत गेली. एखाद्या मोठ्या गांधीवादी नेत्याचे नाव सांगा, असा प्रश्न एखाद्या स्पर्धेत आला तर पोरं काय उत्तर देतील. या उलट गोडसेवादी नेत्याचे आणि त्यातही मोठ्या नेत्याचे, अभिनेत्याचे नाव सांगा असा प्रश्न आला तर नावं लिहायला उत्तरपत्रिकेचा कागद अपुरा पडेल. काँग्रेसच्या काळात राजस्थानात मनुचा पुतळा उभा राहिला, पण ती काही करू शकली नाही. उलट हिंदुत्ववादाच्या लाटेत तीही भांबावली आणि सौम्य हिंदुत्वाच्या नावाखाली या पक्षाचे नेतेही देवदेव करू लागले. मंदिराच्या जीर्णोद्धाराला जाण्यासाठी ज्या नेहरूंनी विरोध केला त्या नेहरूंच्या काँग्रेसमधील हे नेते आहेत. बिगरभाजप पक्षांतील बहुतेकांना गांधीवादाशी काही देणेघेणे राहिलेले नाही. कारण शक्तिमान बनलेल्या हिंदुत्ववाद, राष्ट्रवाद आणि भांडवलवादाने गांधीवादाभोवती चक्रव्यूह तयार झाला आहे. म. गांधींचे आणखी एक वैशिष्ट्य आहे आणि ते म्हणजे, त्यांच्या विरोधकांनी कितीही गोळ्या घातल्या तरी गांधी मरणार नाहीत. पण तेव्हाच त्यांना धोका बसतो, जेव्हा स्वतःला सज्जन समजणारे, गांधीवादी म्हणणारे लोक निष्क्रिय होतात किंवा कोमात जातात. विरोधक गांधींची पुन्हापुन्हा हत्या करण्याचा प्रयत्न करतच राहतील. शंभर वर्षांपासून तो चालू होता आणि यापुढेही चालूच राहणार. गांधींची निंदा, पुन्हापुन्हा प्रतिकात्मक हत्या यातून विरोधकांना टॉनिक मिळते. अमोल दूध पिऊन जाहिरातीतल्या पोरांप्रमाणे सशक्त होण्याची गरज त्यांना नसते, तर या सर्व गोष्टी गांधींना विरोध करून मिळवतात. आता पुन्हा तोच प्रश्न येतो, की गांधींवादाचे समर्थन करून अशी शक्ती गांधींवादाचे खरे-खोटे चेले का मिळवत नाहीत? सत्तेसाठी त्यांनाही प्रवाहपतीत व्हायचे आहे का, याचे उत्तर आज ना उद्या त्यांना द्यावे लागणार आहे. गांधी आमच्यापर्यंत का आणला नाही, त्यासाठी प्रयत्न का केले नाहीत आणि महत्त्वाचे म्हणजे गांधीहत्येचा हा हत्येनंतरचा हंगाम पुन्हापुन्हा का येत राहतो, हेही नवी पिढी विचारत राहणार आहे. ज्यांना राष्ट्रपिता जपता येत नाही तो समाज, ते नागरिक काय पात्रतेचे असतील, हेही अर्थातच विचारलं जाणार आहे.



## नसं कामधंदा तर बघा की, २०२५ सालाची निवांत वाट

गावाकडची लंगोटवाली पोरं गळक्या शाळेसाठी कौल मागतात, तर सरकार त्यांना देणार आहे डिजिटल स्कूल. विद्यापीठातील पॅन्टेतील तगडी पोरं नोकऱ्या मागतात तर त्यांना मिळणार आहे डिजिटल विद्यापीठ. गावाकडचा गरीब, कुपोषित जगण्यासाठी अन्न मागतोय पण त्याला मिळणार आहे हगण्यासाठी जागा म्हणजे संडास. जनता महागाई कमी करा म्हणून बोंबलतेय तर तिला मिळणार आहे मॉलमध्ये स्वस्त दारू, घरपोच दारू. ऑनलाईनसाठी पोरं रेंज मागत आहेत, मोबाईल नावाचं डबडं मागत आहेत तर त्यांना मिळणार आहे शंभर टी.व्ही. चॅनल. लोकं औषधं स्वस्त करा म्हणतात तर त्यांना मिळणार आहे कॅमेऱ्यासाठी स्वस्त लेन्स. अजून बरंच काही काही सांगू शकेल हा पंक्चरवाला... अनेक वर्षांपासून तो बजेट ऐकतोय, रुपया कसा येतो आणि कसा जातो हेही चित्रात पाहतोय. पण हे असं का घडतं, हे मात्र त्याला कधी कळलं नाही.



नव्या हिंदू राष्ट्राकडे वाटचाल करणाऱ्या जुन्या सरकारनं बजेटविषयी जे काही सांगितलं ते ऐकून कुठं तर पारावर ऐकलेल्या गीता प्रवचनाची आठवण पंक्चरवाल्याला झाल्याशिवाय राहिली नाही. तर हा गीतेतला कर्मयोग आहे. कोणताही प्रश्न न विचारता, कार्यकारण भाव याचा विचार न करता ज्याच्या वाट्याला जे कर्म आले आहे ते त्यानं करत रहायचे आहे. फळ कधी आणि कुणाला मिळेल याचा विचार करायचा नाही. जेवढे आपल्या नशिबात असते, तेवढेच आपले असते बाकीचे अंबानी-अदानीचे असते हीच शिकवण जणू बजेटकर्त्यांनी दिली आहे. नुकतच जे बजेट जाहीर झालं आहे, त्याची फळे २०२५ वर्षांपासून मिळणार आहेत. पेरणी झाली आहे. पीक पाच वर्षांनी येणार आहे. पण त्या काळात पाऊसच पडला नाही आणि पेरा उगवलाच नाही तर... पीक उगवले पण महापुरात वाहून गले तर, पीक आले आणि बाजार कोसळला तर... या तर तर ला कोणी उत्तर देत नाही. पंक्चरवाल्याला एक मात्र कळलंय, की हे बजेट म्हणजे २०२४ सालात येणाऱ्या निवडणुकीसाठीची तयारी किंवा पेरणी आहे. गीतेतल्या उपदेशावर श्रद्धा ठेऊन पाच वर्षे वाट बघायची आहे. त्यानंतर अजून काही पेरणी होईल आणि २०३० सालचा वायदा दिला जाईल. आपण संयम ठेवायचा. कॅलेंडरची पाने कशी आणि का हलतात हे बघत रहायचं. २०२५ साल पीककापणीचं यावं म्हणून २०२४ ला पुन्हा यांनाच निवडून द्यायचं. २०३५ सालात काही उगवावं म्हणून २०३० मध्ये पुन्हा यांनाच निवडून द्यायचं. पेरा उगवेल की नाही याचा विचार करायचा नाही. फक्त वाट बघायची... प्रतीक्षा करणे सुंदर असते, त्यातून येणारी फळे गोमटी असतात. पंक्चरवाल्याचं डोकं चालत नाही. दहा कोटी पोरं बेकार असताना साठ लाख नोकऱ्यांत कुणाकुणाचं भागवायचं हेही कळत नाही. वरचं झाकलं की खालचं उघड आणि खालचं झाकलं तर वरचं उघडंच... हा उघडानागड्याचा खेळ कधीपर्यंत चालणार, हे तर कुणाला ठाऊक आहे. भांडवलशाहांची संपत्ती वाढली की शेअर बाजारातला बैल पळतो; मग गरिबांच्या चुली गप्पगार का पडलेल्या असेनात. या धावणाऱ्या बैलानं आपल्या शिंगावरून कोरोनाकाळात कधी प्राणवायूचं सिलिंडर आणलं नाही. या धावणाऱ्या बैलानं आपल्या पाठीवरून कधी औषधांची ओझी वाहिली नाहीत. या धावणाऱ्या बैलानं चौकात मिळणाऱ्या अन्नाच्या थाळीत तिखट-मीठ कसं आहे हे कधी बघितलं नाही. उद्या पुन्हा कोरोना महामारी आलीच तर लॉकडाऊनशिवाय दुसरा मार्ग काय आहे हेही बजेटकर्त्यानं सांगितलं नाही. सारं कसं अध्यात्माच्या पातळीवर चालू आहे. बरंय, जगणं निरर्थकच आहे हा सिद्धांत काशीतल्या भगव्याधारकांनी अजून गल्लीबोळापर्यंत आणलेला नाही. पंक्चरवाला या गोष्टीबद्दल बजेटकर्त्यांना धन्यवाद देतो. वाढती बेकारी, वाढती बेरोजगारी, वाढती असुरक्षितता आता नित्याचीच झालीय. पंक्चरवाल्याच्याच नव्हे तर सुया-बिबं विकणाऱ्यांपर्यंत सर्वांच्याच अंगवळणी ते पडलंय. सर्वजण आपापल्या कपाळावर चिकटवलेल्या सटवीला प्रश्न विचारून मन मोकळं करतात. बजेटमधून १ रुपया दिल्लीतून निघाला की पाड्या-वाड्यावर पोहोचेपर्यंत त्यातले चार-पाच पैसेच शिल्लक राहतात. न्हाणीला बोळा घालणाऱ्यांना दरवाजा किती दिवसांपासून मोकळा हे अजून कळतच नाही. एक बरं झालं आपल्या महान देशातील दुर्बल माणसांची एकहाती किंवा एकगठ्ठा माहिती मिळवण्यासाठी आपण हेरव्यवस्था तयार करतोय. माणूस आतून-बाहेरून समजून घ्यायचा असेल तर अशी व्यवस्था आवश्यकच होती. बजेटनंतर काय, कोणते दिवस, अच्छे की लुच्चे कुणालाच काही सांगता येणार नाही... आणि हो विचारायचं धाडसं तर कुणाकडं आहे? माणसाला मोकळं मोकळं, कंटाळल्यावानी वाटायला लागलं की त्यानं हा कर्मयोगाचा सिद्धांत चघळायचा. झालंच तर रवंथ करायची... तोंडात अन्न नसतानाही ते असल्यासारखं वाटत राहणं लय भारी असतं. अर्थात, हा पंक्चरवाल्याचा अनुभव. तुमचा तुम्ही पहा. नसंल तर मन की बात ऐका... तीही भारीच असते की देवा...

•••

**ग्रंथपरिचय**

# चळवळीची दिशा अन् दशेवर सडेतोड भाष्य करणारा ग्रंथ



**किरण डोंगरदिवे**

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी साहित्यिक क्षेत्रामध्ये स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे बुलडाणा जिल्ह्यातील साहित्यिक सुरेश साबळे यांचा, 'परिवर्तनवादी चळवळी : चिंतन आणि प्रबोधन' हा ग्रंथ नुकताच वाचनात आला. अस्मितादर्श, वृत्तरत्न सम्राट, परिवर्तनाचा वाटसरू अशा विविध वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा हा संग्रह आहे. या पुस्तकाचे समाज, साहित्य आणि प्रबोधन असे तीन भाग केले असून यात परिवर्तनवादी चळवळीचा सूक्ष्म आणि सखोल आढावा घेतलेला आहे. ग्रंथात १९९० ते २०१० या काळात वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले एकूण चोवीस लेख समाविष्ट आहेत. हा ग्रंथ म्हणजे चळवळीच्या अंगाने सुरेश साबळे यांनी मराठी साहित्याला ग्रंथरूपाने दिलेला एक दस्तऐवज आहे.


**प्रबोधनावर समर्पक भाष्य**

लेखकावर होणाऱ्या संस्काराचे, अनुभवाचे, दैनंदिन जीवनातील व्यवहाराचे प्रतिबिंब त्याचा लेखनामध्ये उमटत असते. सुरेश साबळेही याला अपवाद नाहीत. मात्र ते कुणासमोर रडगाणे गात नाहीत किंवा आक्रस्ताळेपणाने विरोधासाठी विरोध करत नाहीत. आपले अनुभव, आपले वाचन, आणि आपला अभ्यास यांचा समन्वय साधत आपली नेमकी भूमिका मांडून या व्यवस्थेतील सामान्य कार्यकर्त्याच्या भूमिकेतून परिवर्तनवादी चळवळीतील साहित्य, चळवळ आणि समाज यांची परस्पर आंतरक्रिया आणि चळवळीतून होणारे प्रबोधन यांवर समर्पक भाष्य केले आहे.

या ग्रंथातील पहिला भाग समाज या घटकाशी निगडित आहे. यात परिवर्तनवादी चळवळीमुळे सामाजिक जीवनात स्थित्यंतरे कशी घडतात याविषयीचे विवेचन लेखकाने केले आहे. आपली भूमिका मांडताना ते म्हणतात, ''भारतात बुद्ध काळापूर्वी आणि बुद्धानंतरच्या काळात वाढलेली मंदिरे, शोषक पुरोहितशाही व विषमता पेरणारी धर्मशास्त्रे, कर्मकांड यांनी धुमाकूळ घातला होता. आजही तो धुमाकूळ थांबला असे म्हणणे धाडसाचे होईल. त्यामुळे इथे माणसापेक्षा देवाला महत्त्व प्राप्त झाले, धार्मिक हिंसा वाढली.''

**संविधान आणि धम्म यांचा समन्वय**

भूतकाळापासून तर आजच्या अस्वस्थ वर्तमानापर्यंत सुरू असलेले धार्मिक हिंसेचे गाभाघटक म्हणजे धर्म, देव आणि




धर्मांध व्यक्ती होत, असे साबळे सांगतात. बौद्ध सिद्धांतातील सद्धम्माविषयीचे चिंतन या प्रकरणामधून चित्ताची शुद्धी असणारा, दैनंदिन जीवनात बुद्धविचार ठेवणारा प्रत्येकजण हा बुद्ध आहे, असे त्यांनी निक्षून सांगितले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये या देशात बौद्धधम्म पुनरुज्जीवित केला. अज्ञानात भटकलेल्या समूहाला त्यांनी समता व स्वातंत्र्याची जाणीव करून दिली. या सर्व घटनांचा ऊहापोह साबळे यांनी केलेला आहे. सामाजिक परिवर्तनासाठी धम्मदीक्षा घेणाऱ्या बाबासाहेबांनी स्वतंत्र भारताचे संविधान लिहिताना आपले धम्मानुयायी आपसूकच संविधानाचे पालन करतील अशा रितीने संविधान आणि धम्म यांचा समन्वय साधलेला दिसून येतो. नेमका हाच धागा धरून बौद्धधम्म हा नैतिक मूल्यांचे संवैधानिक शिक्षण देणारा आहे, असे विवेचन साबळे यांनी केले आहे. तथागत गौतम बुद्ध स्वतःला सामान्य माणूस असे संबोधतात. ते स्वतःला परमेश्वर अथवा ईश्वराचा पुत्र मानत नाहीत, ते स्वतःला ईश्वराचा प्रेषित म्हणजे दूत म्हणवून घेत नाहीत. त्यामुळे बुद्धाचा विचार माणसाला जास्त जवळचा व कल्याणकारी वाटतो, असे लेखकाने म्हटले आहे.

**तरूण चळवळीपासून दूर जातोय**

जागतिकीकरणाच्या काळात वैचारिक गोंधळ कसा सुरू आहे हे सांगत असताना कालच्या समस्यांमध्ये नवनवीन समस्यांची भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर जगातील विचारवंत पुन्हा एकदा बौद्ध तत्त्वज्ञानाकडे आकर्षित होत आहेत. असे असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मूलमंत्राचे आज विस्मरण होत आहे. त्यामुळे आंबेडकरी चळवळ ही राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांसाठी परस्परपूरक न राहता, ती एक वेगळी आणि विद्रोही चळवळ म्हणून समोर येते आहे, यावरही समाजाने चिंतन केले पाहिजे. शिवाय आजचा तरुण हा परिवर्तनवादी चळवळीपासून स्वतःची सुटका करून घेत निव्वळ स्वप्रपंच आणि स्वप्रतिमेत अडकून

पडला आहे, याचादेखील विचार करणे गरजेचे आहे, असे लेखक म्हणतो.

समाज या भागात 'सत्यशोधक समाज : शोध आणि बोध' हा एक महत्त्वपूर्ण लेख आहे. परिवर्तनवादी चळवळीबद्दल मत नोंदवताना साबळे म्हणतात, ''आधुनिक काळातील माणसांची मांडणी भगवान गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानातून उगम पावत, जोतीराव फुले यांच्या चळवळीच्या मार्गाने पुढे जात तिचे शेवटचे टोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र लढ्यात आणि चळवळीत येऊन मिसळते.'' यातून बुद्ध-फुले-आंबेडकर हा मार्ग एकच आहे, असे लेखक सांगतो. महात्मा फुल्यांच्या आद्यचरित्रग्रंथाच्या प्रस्तावनेत नारायणराव अमृतकर यांचे महत्त्वाचे टिपण असो, की सत्यशोधक समाजाची गतिशीलता अग्रक्रमित करण्यासाठी कार्यरत कार्यकर्त्यांच्या नावाच्या नोंदी असोत, महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक धर्माबाबतची अभ्यासपूर्ण मते लेखकाने तर्कसंगत आणि सुसंगत रितीने मांडली आहेत.

**मुस्लिम जगताविषयी**

'भारतीय मानस मुस्लिम समाज' या लेखात साबळे यांनी, आपल्या इच्छेनुसार बरेवाईट कर्म करावे, आपल्या कर्मांना मनुष्य स्वतःच जबाबदार आहे, अल्लाह नाही, असे म्हटले आहे. निर्बलावर अन्याय करा, शोषण करा असे अल्लाह सांगत नाही, या गोष्टींचा ऊहापोह करत मुस्लिम धर्माची प्रमुख शिकवण आणि त्यामागील उदात्त हेतू यावर सविस्तर चर्चा लेखात केली आहे. त्याशिवाय भारतीय मुस्लिमांच्या चालीरिती, सय्यद, गाझी, मेमन अशा अनेक नावांमागील कारणमीमांसा देताना त्यांनी भारतभरातील मुस्लिम धर्मियांचा आढावा घेतला आहे.

'भटके, विमुक्त, आदिवासींच्या विकासवाटा' यामध्ये आदिवासी हा जंगलाचा राजा राहून चालणार नाही, त्यासाठी त्याला बदलत्या काळाची जाण आणि भान ठेवून मार्गक्रमण करावे लागेल, असा मोलाचा सल्ला लेखक देतो. जगाच्या पाठीवर केवळ शिवधर्म हा असा एकमेव धर्म आहे, जो एका स्त्रीला म्हणजे जिजाऊंना प्रेरणास्थान मानून पुढे आला आहे, असे नमूद करणारे सुरेश साबळे शोषित स्त्रियांच्या विकासासाठी या लेखात 'भारतीय संस्कृतीतील स्त्रियांच्या काल, आज आणि उद्या' वर जे भाष्य करतात ते स्त्रियांच्या परिवर्तनवादी भूमिकेची आणि संघर्षाची नांदी आहे.

**संविधानसंस्कृती : नवीन संकल्पना**

सर्व धर्माच्या पल्याड संविधानसंस्कृती ही नवी संकल्पना लेखकाने या ग्रंथातून समोर आणली आहे. आजवर कुणीही संविधानसंस्कृती हा शब्दप्रयोग केलेला नाही, तो साबळे यांनी केला आहे. भीमशक्ती-शिवशक्ती युतीच्या राजकीय भूमिकेच्या अनुषंगाने शिवसैनिक आणि भीमसैनिक यांच्या विचारांबाबत राजकीय आणि सामाजिक पातळीवर मंथन लेखकाने केले आहे. याशिवाय आंबेडकरी चळवळीतील घडामोडी, अंतर्गत आणि बाह्य संघर्ष यावरील विवेचनासह आंबेडकरी चळवळीने सावरणे कसे गरजेचे आहे, हे सांगणारा हा उद्‌बोधक लेख आहे. लेखकाच्या मते, विचारांच्या आणि निष्ठेच्या सैरभैरतेला आवर घालणे गरजेचे आहे, हे सांगणे सोपे असले तरी प्रत्यक्षात तो दिवस कधी येईल याबाबत स्वतः लेखकासह सर्व आंबेडकरी जनता कायम साशंक असेल, असे मला वाटते. समाज या भागात सुरुवातीला लेखकाने आंबेडकरी चळवळ, संविधान, शोषित आदिवासी घटक, महिला इत्यादींच्या प्रश्नांना वाचा फोडल्याचे दिसते.

परिवर्तनवादी चळवळीतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे आंबेडकरी आणि विद्रोही साहित्य होय. सुरेश साबळे यांनी आंबेडकरी साहित्य चळवळीतील प्रेरणा आणि वाटचाल यांचा मागोवा घेताना, गौतम बुद्धांनंतर ११३८ मध्ये जन्मलेल्या चक्रधर स्वामींनी स्त्रियांना सन्मान दिल्याचे सांगितले. मात्र कोणताही आध्यत्मिक, ऐतिहासिक लेखक त्यांना साहित्य प्रांतात नायकत्व देऊ शकलेला नाही, हे निरीक्षणही त्यांनी नोंदवले आहे. साहित्यावर कुणाचे वर्चस्व आहे, यावरून समाजकारणाच्या वर्चस्वाची पातळी ठरत असते, असे ते सांगतात. वर्तमानकाळात माणूस कोणत्या धर्मात जन्मास आला, त्यावरून त्याची देशभक्ती आणि देशद्रोही अशी भूमिका ठरते. अशा वेळी फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेला मानणारेच साहित्यिक समाजाला दिशा देऊ शकतात, असे साबळे सांगतात.

**रंगभूमीवरही चर्चा**

आंबेडकरवादी रंगभूमीवरही लेखकाने भाष्य केले आहे. प्रा. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी अशा नाटककारांशिवाय इतरही काही नाटककारांचा नामोल्लेख आवर्जून करत लेखबद्दलची जिज्ञासा वाढत जाते. मात्र आंबेडकरी काव्यलेखन हा विषय जितका जास्त प्रमाणात लेखक चर्चेला घेतात तितका रंगभूमीचा विषय विस्तृतपणे येत नाही, कदाचित दलित नाटक लिखाण मोजकेच असल्याने ही मर्यादा आली असावी. 'आंबेडकरवादी कवयित्रींचे काव्यलेखन' या अभ्यासपूर्ण लेखामुळे आंबेडकरी कवयित्रींचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. मराठी साहित्यातील वऱ्हाडी भाषेचे योगदान हा खूप वेगळा विषय लेखकाने मोठ्या ताकदीने हाताळला आहे. काही तथाकथित वऱ्हाडींच्या शिलेदारांनी वऱ्हाडी भाषा ही निव्वळ हास्य आणि विनोदापुरती मर्यादित करून ठेवली आहे, त्या अनुषंगाने हा लेख वऱ्हाडी भाषेचा परिवर्तन चळवळीतील उपयोग तसेच वऱ्हाडी भाषेचा संक्षिप्त इतिहास, त्यातही सीमावर्ती वऱ्हाडी भाषा, वऱ्हाडी आणि महानुभाव साहित्य, स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील वऱ्हाडी साहित्य आणि वऱ्हाडातील साहित्य या बाबींचा चिकित्सक लेखाजोखा मांडला आहे.

कालकथित गंगाधर पानतावणे यांच्या संपादकत्वाखालील अस्मितादर्श या नियतकालिकाने घडवून आणलेल्या साहित्यमंथनाचा आढावाही लेखकाने घेतला आहे. प्रबोधन या तिसऱ्या भागात सत्यशोधक जलसे आणि आंबेडकरी जलशांच्या माध्यमातून घडवून आणलेल्या प्रबोधनावर समर्पक भाष्य लेखकाने केले आहे. •••

**(लेखक साहित्याचे अभ्यासक आहेत)**

| |
|---|
| **परिवर्तनवादी चळवळी : चिंतन आणि प्रबोधन** |
| **लेखक : सुरेश साबळे** |
| **प्रकाशक : अथर्व प्रकाशन, जळगाव** |
| **किंमत : ३०० रुपये** |
| **पृष्ठ : २१२२** |

कविता

# महागाई



महागाई आली दादा, महागाई आली
सरकारी सुलतानी महागाई आली
गरिबांच्या जगण्याची पंचायत झाली
महागाई आली दादा, महागाई आली

राशन बी मिळंना, राकेलबी गावंना
जगावं आता कसं तेबी कळंना
गरिबांची चूल बंद पडायची वेळ आली
महागाई आली दादा, महागाई आली

साहेबाला नियमानं मिळतो भत्ता
पुढारी मिरवतो आपलीच सत्ता
गरिबांची सांगा की कोणती हाय यत्ता
खऱ्याची माय बघा वनवासी झाली
महागाई आली दादा, महागाई आली

स्टॉल झाले गायब, मोठे मॉल आले
फडे, टोपलेबी आता ऑनलाईन झाले
टाटा, बिर्ला, अंबानीची लै मजा झाली
महागाई आली दादा, महागाई आली

जगणं झालं महाग, मरण झालं स्वस्त
इमानदार उपाशी, बैमान मस्त
बस झालं, आता तरी पेटवा मशाली
महागाई आली दादा, महागाई आली

**– मारोती कसाब,**
उदगीर, जि. लातूर

# मला फारसं वाईट वाटत नाही...

मला फारसं वाईट वाटत नाही
अन्यायकारी कायद्याचं
वाटेत लोखंडी खिळे रोवल्याचं
पाण्याचा मारा केल्याचं
महागार्ग खोदून अजस्त्र वाहनं
आडवी लावल्याचं...
लाठीमार केल्याचं

नाही वाटत फारसं वाईट मला...
शेतकऱ्यानं हे सगळं सोसत
आंदोलन केलेल्याचं...

मला फक्त सतत वाटतं
मी शिवाजींच्या भूमीतला
मी फुलेंच्या भूमीतला
मी शाहूंच्या भूमीतला
मी बाबासाहेबांच्या भूमीतला

आपण यांच्या भूमीतले आहोत,
आपण यांच्या भूमिकेतले नाही
असंही वाटत राहतंय...

आपण खाल्लं त्यांच्या सात्त्विक भूमीतलं अन्न
पोसल्या ना पिढ्या आपल्या
तरी मला पोसणाऱ्याविषयी काहीच वाटत
नाही

मला काहीच वाटत नाही...
याचा अर्थ मी जीवंत नाही
किंवा
माझं जीवंत असणं ज्वलंत नाही

मला काहीतरी वाटायला हवं...
पोशिंद्याविषयी
आणि
पोशिंद्याला नागविणाऱ्याविषयी...

**– इंद्रजित घुले,**
मंगळवेढा, जि. सोलापूर

# हे तेच लोक होते...

हे तेच लोक होते,
ज्यांचे लोंढे दिसताहेत आज
महामार्गावरून मरणयातना सोसत
घरवापसी करताना

हे तेच लोक होते,
जे घेऊन आले होते केवळ
भुकेची अन् पोटाची आग
आणि ती विझविण्यासाठी
त्यांनी विझवून टाकली कायमची
इथल्या कामगार चळवळीचीही आग

हे तेच लोक होते,
खरे तर ते आले होते
बुद्धाच्या पवित्र भूमितून
पण निव्वळ पोटासाठी
पाठीचा कणा मोडून...

हे तेच लोक होते,
केवळ वितभर पोटासाठी
ते शोषकांचीच ढाल झाले
आणि कामगारांच्या हितासाठी
लढणाऱ्या
लढवय्यांचे हालहाल झाले

हे तेच लोक होते,
जे आले होते बुद्धाच्या कर्मभूमीतून
पण बुद्धाला तेथेच सोडून

हे तेच लोक होते,
जे घेत होते बाबासाहेबांचेही नाव
पण नाही चालले ते कधीच
बाबासाहेबांच्या मार्गावरून

हे तेच लोक होते,
ज्यांची कधीच
विद्रोहाशी ओळख झाली नाही

हे तेच लोक होते,
जे आले होते पराभूतासारखे
हे तेच लोक आहेत,
जे जात आहेत पराभूतासारखे...

**– प्रदीप नारायण जाधव,** नाशिक

# ग्रेट थॉट्स



**ज्याला अनुभव नाही त्याच्यासाठी पुस्तकातून मिळणारे ज्ञान निरर्थक आहे. संपत्तीच्या विनियोगाबाबतही अननुभवी लोकांची हीच गत असते**

**– संत तुकाराम महाराज** (१७ व्या शतकातील कवी आणि एक महान विठ्ठलभक्त)

---



**राजकीय सौदेबाजीचे रहस्य म्हणजे तुम्ही खरोखर काय आहात, त्यापेक्षा अधिक मजबूत दिसते**

**– सुभाषचंद्र बोस** (भारतीय क्रांतिकारक, प्रखर देशभक्त)

---



**तुम्ही जिथे जाल तिथे आनंद पसरवा. आनंदी राहिल्याशिवाय कोणासही तुमच्याकडे येऊ देऊ नका**

**– मदर तेरेसा** (अल्बेनियन–भारतीय रोमन कॅथॉलिक नन आणि धर्मप्रचारक)

---



**आपण कमावलेले धन केवळ स्वत:पुरते न वापरता ते समाजासाठीही वापरले पाहिजे**

**– महात्मा बसवेश्वर** (१२ व्या शतकातील तत्त्वज्ञ, समाजसुधारक)

---



**माणसाला अपयश तेव्हाच येते, जेव्हा त्याला त्याच्या कल्पना, उद्देश आणि तत्त्वांचा विसर पडतो**

**– पंडित जवाहरलाल नेहरू** (भारताचे पहिले पंतप्रधान, भारतीय राष्ट्रीय चळवळीतील प्रमुख नेते)

---



**जगातील सर्वोत्तम आणि सर्वात सुंदर वस्तू पाहिल्या जाऊ शकत नाहीत किंवा स्पर्शही करता येत नाही**

**– हेलन केलर** (अमेरिकन लेखिका, राजकीय कार्यकर्त्या)

---



**जगभरातील सर्वात मोठे वैभव कधीही न पडण्यात नसून, प्रत्येक वेळी आपण पडताना उठण्यात आहे**

**– डॉ. नेल्सन मंडेला** (द. अफ्रिकेचे माजी अध्यक्ष, वर्णभेदविरोधी लढ्यातील क्रांतिकारी नेते)

---



**देशाचा खरोखर विकास करायचा असेल तर आम्ही सर्व जाती–धर्मांच्या लोकांना सोबत घेतले पाहिजे**

**– बिरसा मुंडा** (भारतीय स्वातंत्र्यसैनिक)


---



**९) जे इतरांसाठी सर्वात फायदेशीर असतात, तेच सर्वोत्कृष्ट लोक असतात**

**– प्रेषित मोहम्मद** (इस्लाम धर्माचे संस्थापक)

---



**ओळख किती काळापासून आहे यावर मैत्रीची खोली अवलंबून नसते**

**– रवींद्रनाथ टागोर** (भारतीय कवी, समाजसुधारक व तत्त्वज्ञ)

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

